अन्तर्गत खगोलीय निर्देशाधारें

संशोधनात्मक प्रबन्ध

# महाकवि कालिदास-काल.

[ इ. स. २००-३०० ]

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. १११८

– लेखक –

दत्तात्रेय वेंकटेश केतकर.

REFBK-0009453

मूल्य ३ रुपये.

मेघदूत-त्रिविक्रमा

यांतील

१ कविकाल, २ समश्लोकी व ३ विवरण

यांपैकीं १ ला,

महाकवि

# कालिदास-काल.

[ इ. स. २००–३०० ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 23024 दि.
क्रमांक 997 नों. दि.
ह. क्र. ८८४३
REFBK-0009453

दत्तात्रेय वेंकटेश केतकर,

सेवानिवृत्त, बी. ए., बी. टी.

विजापूर.

मूल्य ३ रुपये.

## प्रस्तुत लेखकाचे इतर ग्रन्थ.

### संस्कृत

१ अयनांशनिर्णयः । २ पंचांगसंशोधनम् ।
३ पौष्णान्तनिर्णयः। ४ केतकरपद्यचरित्रम् ।
५ केतकी-परिमल-वासनाभाष्यम् ।
६ श्रीराघवेन्द्रयतिचरित्रम् । (श्लो. ५५५)
७ केतकरचरित्रं पद्यमयं (१-९० श्लो.)

### मराठी

१ ज्यो. वें. बा. केतकर-चरित्र.
२ जान्हवीटीकेसह ज्ञानेश्वरी १ ला अध्याय.
३ कालिदास-काल-निर्णय (संशोधनात्मक).
४ जिज्ञासोद्यान– गुच्छ १ ला.
(ज्ञानेश्वरी-संशोधन.)

### मराठी काव्य

१ सुनांनो, स्वयं उद्धरा आपणांसी, श्लो. ७००.
२ समवृत्त सयमक गीता, अध्याय १-२.
३ संपन्न शिक्षण, १-४० श्लोक.
४ मेघदूतानुवाद, सयमक-सटीप.

अनुक्रम 22024 विः
क्रमांक 1118 नों: दिः 28-3-78

# पुरस्कार

मला प्रस्तुत ग्रंथाचें जें महत्त्व वाटतें, तें कालिदासाच्या कालनिर्णया-संबंधींच्या श्री. केतकर यांच्या निबंधामुळें होय. आजपर्यन्त डॉ. केतकर यांच्यापासून तर म. म. मिराशी यांच्यापर्यन्त अनेकांनीं कालिदासाचा कालनिर्णय करण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्या कोणीही ज्या प्रमाणाचा वापर केला नाहीं त्या, म्हणजे ज्योतिर्विषयक प्रमाणाचा वापर करून कालि-दासानें सांगितलेल्या खगोलस्थ घटनांच्या आधारें कालिदासाचा कालनिर्णय करण्याचा विचार श्री. केतकर यांनीं केलेला हा पहिलाच प्रयत्न होय. इतर सर्व प्रमाणें विवाद्य राहूं शकतात. पण ज्योतिर्विषयक प्रमाणें या सर्व प्रमाणांत अधिकाधिक निश्चित असूं शकतात. ज्योतिर्विषयक पद्धतीमध्यें अडचणी नाहींत असें नाहीं. पण इतर पद्धतींत सर्वांत अधिक निर्दुष्ट पद्धति हीच आहे, हें वेदकालनिर्णयासंबंधींच्या विवादावरून ध्यानांत येईल. इतर संशोधकांपैकीं कोणी कालिदासाचा काल सहावें शतक, कोणी पांचवें शतक तर कोणी चवथें शतक असा ठरविला आहे. पण ज्योतिर्गणिताच्या पुराव्या-वरून श्री. केतकर यांनीं इ. स. चें तिसरें शतक हा कालिदासाचा काल ठरविला आहे व त्यासाठीं आधार म्हणून रघुवंशकाव्याच्या १६ व्या सर्गां-तील ४३, ४४ व ४५ या तीन श्लोकांत वर्णिलेली खगोलस्थ स्थिति विवेचून दाखविली आहे. श्री. केतकर यांच्या प्रस्तुत विवेचनानें रूढ समजुतीपेक्षां कालिदासाला दोन शतकें तरी अधिक प्राचीन ठरविलें आहे. भौगोलिक उल्लेख, ऐतिहासिक संदर्भ. सामाजिक परिस्थिति, शिलालेख इत्यादि प्रमाणापेक्षां श्री. केतकरांचें प्रमाण अधिक भक्कम स्वरूपाचें आहे, यांत शंका नाहीं. श्री. केतकर यांच्या विवेचनावर त्यांचे समानधर्मी कांहीं आक्षेप घेतीलही. कारण संशोधनशास्त्रांत शेवटचा शब्द असा कोणाचाच नसतो. पण केतकर यांनीं आजवरच्या समजुतींना धक्का देऊन कालिदासीय संशो-धनाचें पाऊल भक्कम प्रमाणाच्या आधारें अधिक गतिशील केलें आहे, हें त्यांच्या विपक्षीयांनाही मान्य करणें भागच आहे. आम्हीं श्री. केतकर यांना याविषयीं अंतःकरणपूर्वक धन्यवाद देतों व रसिकांनीं व विद्वानांनीं त्यांच्या परिश्रमाचें चीज करावें, असें इच्छितों.

दि. २-११-१९५६
श्री दक्षिणामूर्ति मंदिर,
स. ७ महाल, नागपूर

— बाळशास्त्री हरदास,
साहित्याचार्य, नागपूर.

॥ सादर समर्पण ॥

विजापूर येथील व्यापकबुद्धि, सूक्ष्मविमर्श, सद्विचार काव्यगायनादि कलाप्रेम ऐतिहासिक कुतूहल इत्यादि गुणालंकृत विख्यात वकील

**श्रीमान् कृष्णराव गणेश,**

अगर श्री. **काका अजरेकर**

यांना प्रस्तुत "**कालिदास-काल**" हा संशोधन-प्रचुर ग्रंथ विनयपूर्वक अर्पण केला आहे.

—द. वें. केतकर,

ग्रंथकर्ता.

## श्रीमान् कृष्णराव अगर काका अजरेकर

नामवन्त (आज वय ९०) वयोवृद्ध वकील, विजापूर.

# ग्रन्थोद्गम.

सात जानेवारी १९५५ च्या 'दैनिक काळ' या वृत्तपत्रांत "कालिदास-काल" हा लेख प्रसिद्ध केला. त्यानंतर– Bhandarkar, O. R. Institute, Vol. XXXVI, Part I-II, pages 150–156 यांत Date of Kalidas हा छोटा इंग्लिश लेख प्रसिद्ध झाला. पुढें क्रमानें गणितप्रवीण व काव्यप्रवीण यांनीं पत्रव्यवहार सुरू केला.

कालिदासकालासारख्या तमोग्रस्त प्रश्नावर नवीन खगोलीय प्रमाणाचा प्रत्यक्ष व यथार्थ प्रकाश पाडून– ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकांत कालिदास नांदला– हा आपण काढिलेला निष्कर्ष अभिनंदनीय आहे, अशीं गणित-काव्य-प्रवीणांचीं कांहीं अभिनंदनें आलीं.

तीर्थ, अलंकार, विशारद, महामहोपाध्याय व साहित्यप्रवीण इत्यादि पदवीलांछित साहित्यपटूंनीं मात्र आक्षेपांची व तर्कटांची झोड उठविली. आक्षेपांतील क्षुद्रता, बालिशता व नामधारित्व त्यांच्या त्यांच्या नजरेला आणून देतांच त्यांचीं जीं विवरणात्मक पत्रोत्तरें आलीं, तीं फारच मनोरंजक वाटलीं. एक-दोन उदाहरणें देतो– (१) श्लो. ४५ तील– प्रवृद्धतापो दिवसोऽतिमात्रं । अत्यर्थमेव क्षणदा च तन्वी । – यांत दिवस परम दीर्घ झाला तो अयननिवृत्तीमुळें नसून, विभिन्न दंपतीला तो परम दीर्घ वाटला व मीलन होतांच रात्र परम लघु वाटली. या विवरणावरून त्याचें साहित्य-पाटव व्यक्त झालें. (२) अत्यर्थमेव तन्वी म्हणजे परम तन्वी नव्हे– असें एका कृत्रिम उपाध्यायानें ठांसून सांगितलें. यावरून त्याच्या संस्कृत ज्ञानाची कसोटी लागली. पुढें पुढें हा घोटीव पंडित कालिदासाचें अभिप्रेत स्वतःच सांगू लागला. म्हणून त्याचा नाद सोडला. सारांश या सर्वांना पत्रानें उत्तरें देत बसण्यापेक्षां सर्वंकष प्रबंध लिहिलेला बरा, या कल्पनेंतूत हा प्रस्तुत प्रबंध उगम पावला आहे.

**व्यवस्था–** सूचीच्या ऐवजीं विस्तृत अनुक्रमणिकाच दिली आहे. त्यायोगें स्वीकृत विषयाची प्रगति, परिपोष, समर्थन व निर्णय यांची सुयोग्य कल्पना येईल.

# अनुक्रमणिका


लें० विषय

प्रकरण १ लें.

पृ. ९-१६

**प्रास्ताविक निवेदन.**

कालसूचक अगस्त्यचिन्हामुळें हर्ष (कालिदासाच्या आरतीनें,मंगलाचरण.
१ अन्तर्गत प्रमाण विश्वसनीय.
२ खगोलीय निर्देश श्रेष्ठतम प्रमाण.
३ इतर प्रमाणें तर्काश्रित.
४ रघु. सर्ग १६, ४४-४५ पद्यगत अन्तर्गत खगोलीय प्रमाण.
५ हें अकल्पित पण अचूक प्रमाण.
६ इ.स.२८० हें स्वतंत्रसिद्धच आहे
७ साधनांची श्रमपूर्वक संपादणी.
८ सुज्ञांनीं परीक्षण करावें.
९ निबंध-विभाग. एकूण पांच.
१० नामूलं लिख्यते किंचित् ।
११ साहाय्यकांचे आभार.
१२ विविध प्रतिबंधकें.
१३ विक्रमादित्य कोण? माझें मत.

**भाग १ ला (अ)**

प्रकरण २ रें.

पृ. १७-४०

**दिङ्मात्र कालिदास-काल.**

लें० विषय

१४ भारतीयांचें कालविषयक औदासिन्य.
१५-१६ इतर अभ्यासूंचे कालनिर्देश.

**अलीकडील मर्यादा.**

१७ आधीं मध्यम, मग स्पष्ट काल.
१८ मालव-गणना, निर्देश पद्धत.
१९-२१ इ.स. ४७३, मंदसोर शिला-लेख. तुलनेवरून निर्णय. कालिदास इ.स.४७३ च्या पूर्वीं.
२२-२३मुद्राराक्ष व बृहत्संहिता तुलने-वरून विशाखदत्त इ. स. ४५०. अर्थात् कालिदास इ.स. ४५० पूर्वीं.
२४ भारवि व मुद्राराक्षतुलना.भारवि इ. स. ४००,कालिदास ४०० पूर्वीं.
२५ काव्यांतील नवीन वळण.
२६ मुनि-लेखक व नृ-लेखक.
२७ पुष्पित वाङ्मयाचा आरंभ.
२८ कौमुदीमहोत्सव इ.स. ३५०, कालिदास इ. स. ३५० च्या पूर्वीं.
२९ हरिषेणाचा रघवंश-अभ्यास, अभ्यास-काल इ. स. ३३०, कालिदास इ. स ३३० च्या पूर्वीं.
३०-३४ रघु. सर्ग, ६-५९, पांड्य-देशांतील कायकुटी नदीवरील नागपूर (उरगपूर)

ग्रंथ संग्रहालय, ठाणे


| लें० | विषय |
|---|---|
| ३५ | इ. स. ३०० च्या अंत परत मदुरेपूर्वी नागपूर तात्पूर्तिक राजधानी, म्हणून कालिदास ३००पूर्वी. |
| ३६ | इ. स. ४७३-३०० पर्यंत आकुंचन. |
| | **पलीकडील मर्यादा, इ. स. ८०** |
| ३७-३८ | सिद्धांत-पंचक, वराहोक्त. |
| ३९ | पैतामह युगारंभ इ. स. ८० ज्यौतिष-परिस्थिति, वराहोक्त, सूर्यसिद्धान्त "स्पष्टतर" |
| ४० | संहितोक्त ग्रहणादिक विवरणांचें वराहोक्त त्याज्यत्व. |
| ४१ | इ. स ८० दीपगृहासारखें. यानंतर सूर्यसि. ग्राह्यपदवीला आला. |
| ४२ | कालिदास इ. स. ८० नंतर |
| | **कालिदास इ. स. १०० नंतर.** |
| ४३-४५ | अश्वघोष, भास व कालिदास यांचा आधार सूर्य सि० म्हणून तीघेही इ. स. ८० नंतर. |
| ४६-५० | ज्योतिषाधारें तीघांचा संघटित कालक्रम. |
| ५१-५८ | अश्वघोषानंतर कालिदास. |
| ५९ | कालिदासाला गुप्तकालांत टाकतां येत नाहीं. |
| ६० | अश्वघोषाचें कालिदासाला सहाय्य |
| ६१-६३ | अश्वघोष व कालिदास मध्यें भास म्हणून कालिदास इ. स. २०० च्या पूर्वी नाहीं. |
| ६४-६६ | नूपुरकाव्य, मणिमेखला काव्य सीलोनं गजबाहु, इ. स. १७४-१११ |
| ६७-६८ | मणिमेखला काव्यांतील श्लेषानें सूचना, रघु. सर्ग ६-२३, मणि-मेखला इ.स. २००नंतर, व्हिन्सेण्ट स्मिथच्या मतें. |
| ६९ | म्हणून कालिदास इ.स. २००नंतर व इ. स. ३०० च्या पूर्वी. अर्थात् |
| | **कालिदास तिसऱ्या शतकांत झाला** |
| ७० | कालिदास क्वचित् श्लेष करतो. |
| ७१ | खगोलाशीं चांगला परिचय. |
| ७२-७३ | शब्दघटित संख्यानिर्देश, बिचकण्याचें कारण नाहीं. |
| ७४-७९ | मालविकाग्निमित्र यांतील श्लेष. चतुर्मुखी निर्णय. |


## भाग १ ला (ब)

### प्रकरण ३ रें.

पृ. ४१-५४

## ससंदर्भ मूलाधार श्लोक विवेचक टीपा श्लोकगत सार.


| | |
|---|---|
| ८० | घर्मागम-घर्मान्तिक रविसंचार. कविसंकेताचें ग्रीष्मवर्णन. |
| ८१ | घर्मागम-घर्मान्त या अवधीत अचेतन सृष्टीवर झालेला परिणाम |
| ८२ | घर्मागम-घर्मान्त या अवधींतील चेतन प्राण्यांचे शैत्योपचार. |

| लेॅ० | विषय |
| --- | --- |
| ८३ | आदित्यचारांतील ग्रीष्मान्तसमय. कवीचें ग्रीष्मवर्णन संपलें. |
| ८४ | नवीन प्रकरण– जलक्रीडा. |
| ८५ | उद्बोधक टीपांची प्रतिज्ञा. |
| ८६ | घर्म = घर्मप्रसवी ग्रीष्म. |
| ८७ | उदगयननिवृत्ति, अयननिवृत्ति. |
| ८८ | परमोत्तरप्रापण = उदगयननिवृत्ति |
| ८९ | श्लो. ४४ अलंकारिक अर्थ. |
| ९० | श्लो. ४४ खगोलीय अर्थ. |
| ९१ | श्लो. ४४ खगोलीय विवरण. |
| ९२ | साहित्य-खगोल-एकवाक्यता. |
| ९३ | मतभेद (साहित्य व खगोल) |
| ९४ | अगस्त्यचिन्ह = D बिंदु. आकृतिद्वारा मतभेद-निरास. |
| ९५ | अगस्त्यचिन्ह = दक्षिण. हा टीकाकारांचा अर्थ कां अनुपपन्न? |
| ९६ | चिन्ह = सदृश, अनुपपन्न. |
| ९७ | उत्तरेच्या आनंदाचें उपपन्न कारण |
| ९८ | दिवसः– क्षणदा, श्लो. ४५ तील एकवचनी प्रयोग सशास्त्र. |
| ९९-१०० | श्लो. ४४, ४५ हे दोन्ही श्लोक परस्परपूरक. |
| १०१ | पुन: ग्रीष्मांत निर्देश. ग्रीष्मान्त समय-परिणाम. विसंगति नाहीं. टीकाकारांचा द्राविडी प्राणायाम |
| १०२-१०३ | भूतकालानें ग्रीष्म-परिणाम कथन, काल आषाढ १-१५. |
| १०४ | कुमुद्वतीप्राप्तीच्या रोखानें जलक्रीडेचें नवें प्रकरण. |
| १०५-११० | ग्रीष्म-वर्णन- श्लोक-सार. |
| १११-११२ | ग्रीष्मवर्णनांतील सुसंगतता |


## भाग २ रा.

### प्रकरण ४ थें.

पृ. ५५-६०

### श्लो. ४४, केवळ पारिभाषिक


| लेॅ० | विषय |
| --- | --- |
| ११३ | श्लो. ४५, दिवस, क्षणदा, याचा बहुवचनी अर्थ विसंगत, तें कवीचें अभिप्रेत नाहीं. |
| ११४ | एकवचन, तर मग पूर्वी अयननिवृत्ति पाहिजे, तशी श्लो. ४४ मध्यें आहे |
| ११५ | टीकाकारांचा पारिभाषिक अपरिचय, त्यायोगें त्यांचा श्लो. ४४ चा अप्रस्तुत अर्थ. |
| ११६ | इतर शास्त्रोक्त पारिभाषिक शब्द कालिदास वापरतो कां ? |


### प्रकरण ५ वें.

पृ. ६१-६४

### परिभाषा.


| लेॅ० | विषय |
| --- | --- |
| ११७ | होय, इतर पारिभाषिक शब्द वापरतो, उदाहरणें पहा. |
| ११८ | तसेंच खगोलीय पारिभाषिक शब्दही कालिदास वापरतो, हे पहा शब्द. |
| ११९ | खगोल परिभाषेचे टीकाकारांचे |

लें० विषय

अप्रस्तुत अर्थ, उदाहरण १ लें.

१२० उदा. २ रें, योगतारा, अप्रस्तुत अर्थ.

१२१ उदा. ३ रें, नक्षत्रताराग्रह.

१२२ उदा. ४ थें, सूक्ष्म पूर्णोपमा.

१२३ या पूर्णोपमेचा आधार, सूर्यसि०

१२४-१२७ कालिदासोक्ति पूर्ण यथार्थ. विपरीत असा शेरा उच्छृंखल.


प्रकरण ६ वें.

पृ. ६५-६६

## परिभाषा.

## श्लो. ४४, संनिवृत्ति, प्रवृत्ति यांचा कवीचा पूर्ण परिचय.


१२८-१२९ वरील दोन्ही शब्दांशीं कवीचा सशास्त्र परिचय, उदा. पहा.

१३० स्वतःचें अज्ञान कवीच्या माथीं कां ? ल्यब्लोपे पंचमी.


प्रकरण ७ वें.

पृ. ६७-७०

## परिभाषा.

## श्लो. ४४, अगस्त्यचिन्हात्


१३१-१३२ याला टीकाकार साहित्यिक शब्द समजले. त्यायोगें अर्थात्-

लें० विषय

१३३ पंचमुखीं कोडें निर्माण झालें.

१३४-१३७ कोड्याचा उलगडा, टीका. चा अर्थ उडून जातो व शेवटीं-

१३८ पारिभाषिक तेवढाच अर्थ उरतो.

१३९, १४०, १५८ संनिध असले तरी स्वतंत्र शब्द, स्वतंत्र प्रयोजनें.


प्रकरण ८ वें.

पृ. ७१-७६

## खगोलवेत्ता प्रमाण कसें पारखतो ?


१४१ वराह, कालिदास उक्तिद्वयाची तुलना.

१४२ उक्तिद्वयाचें शब्दशः अर्थ

१४३ तुलनेची फलश्रुति, श्लो. ४४ केवळ पारिभाषिक. साहित्याचा संबंध नाही.

१४४ दोहोंत परमोत्तरप्रापण = अयननिवृत्ति.

१४५-१४६ दोहोंत निवृत्तिस्थानकथन.

१४७-१४८ कालिदासोक्तीचें साधार परीक्षण.

१४९-१५२ निवृत्तिस्थानाचा निर्देश.

१५३ निवृत्तिस्थान म्हणजे काय समजायचें ? उदाहरण पहा

१५४-१५६ श्लो. ४४ व ले.१४३ तील उदाहरण व तंतोतंत साम्यदर्शन.

| लें० | विषय |
|---|---|
| १५७ | अगस्त्यचिन्ह सहज येऊन गेलें हें सुदैव. खगोलवेत्त्याला अचूक गमक लाभलें. |
| १५८ | मागें घेतलें आहे. (ले. १३९) |
| १५९ | गंभीर घटना आहे. |

## प्रकरण ९ वें.

### पृ. ७७-८४

## अचूक गमक व अचूक कालसाधन.

| | |
|---|---|
| १६० | काव्यांत खगोलीय अगस्त्यचिन्ह कां ? |
| १६१ | कालिदासाचा अगस्त्यविषयक आदर. |
| १६२ | अगस्त्यकंकण. |
| १६३ | दृष्टांताची पार्श्वभूमि. |
| १६४ | दृष्टांताचा आद्यंत. |
| १६५ | कृश व सूर्य यांचा पूर्ण दृष्टांत. |
| १६६ | दृष्टांत-पोषक अतिरिक्त निर्देश. |
| १६७-१७१ | दृष्टांतांतील रसग्रहण. |
| १७२ | काव्यांत खगोलीय निर्देश कसा? तें पहा. |
| १७३-१७५ | खगोलवेत्ता दृष्टांतबाह्य अतिरिक्त निर्देश अपेक्षितो. |
| १७६ | काल काढण्याची अपेक्षा फोल नाहीं. अत्यंत सुफल आहे. |
| १७७-१८० | **कालिदासाचा काल. इ. स २८० जून २१.** |

| लें० | विषय |
|---|---|

## भाग ३ रा. खगोल विभाग.

## प्रकरण १० वें.

### पृ. ८५-९१

## खगोल.

| | |
|---|---|
| १८१-१८२ | सूर्य संचार, अयननिवृत्ति. |
| १८३ | घर्म, आकृतीत स्थान-दर्शन. |
| १८४ | दिनरात्रिमान–वैपम्यदर्शन. |
| १८५-१८८ | निवृत्ति व दिनमान संबंध |
| १८९ | निकटसंबंध. श्लोक ४४–४५ लागोपाठ |
| १९० | विभिन्नौ याचा अर्थ. |
| १९१ | विरोधिक्रिया याचा अर्थ. |
| १९२-१९३ | विरोधिक्रिया एकच दिवस म्हणून एकवचनी प्रयोग सशास्त्र. |
| १९४-१९६ | अत्यर्थमेव = परम |
| १९७-१९८ | उभौ याचा अर्थ- विरोधक्रिया, विभिन्नौ |
| १९९ | टीका-केवल अलंकारिक विवरण. |

## प्रकरण ११ वें.

### पृ. ९२-९४

## खगोल. परिभाषा.

| | |
|---|---|
| २००-२०२ | चिन्ह याचा पारिभा. अर्थ |
| २०३ | येथें षष्ठीतत्पुरुष हाच विग्रह. |
| २०४ | चिन्ह व स्थान समानार्थक. |
| २०५ | अगस्त्यचिन्ह-दर्शन. |
| २०६ | अगस्त्यचिन्ह = १ आकृतींतील D बिंदु. |

| लें० | विषय |
|---|---|
| २०७ | हा शब्द इतरत्र कां आला नाहीं? |

प्रकरण १२ वें.

पृ. ९५-९७

**उपलब्ध निवृत्ति निर्देश.**

२०८-२१० यांत अगस्त्यचिन्हांकित निवृत्ति, काल व स्थानाच्या दृष्टीनें सुसंगत बसते. ही केवळ कवि-कल्पना नसून सत्य-दृश्य घटना आहे.

प्रकरण १३ वें.

पृ. ९८-११०

**पहिली सीमा-वेदांग-ज्योतिष.**

२११-२२६ नीलकंठ सोमसुत्वा. वराहोक्ति. वे.ज्यो.काल १४०० इ स.पूर्व

प्रकरण १४ वें.

पृ १०२-१०६

**खगोलदृष्टचा कालसाधन.**

२२७-२२९ निवृत्तीच्या चार अटी.

२३० चारी अटी सिद्ध.

२३१ अटीसह चित्रदर्शन.

२३२ चारी अटीचा योग कोणत्या वर्षी ?

२३३-२३५ अयनप्रवास कोष्ठक.

२३६ कोष्ठकांतील ड-पंक्ति.

२३७ निवृत्तीचें सर्वलक्षणयुक्त दर्शन.

| लें० | विषय |
|---|---|
| २३८ | कालिदास- तिसरें शतक. |
| २३९ | विवेकोक्ति. |

भाग ४ था.

**टीकाकार विभाग.**

प्रकरण १५ वें.

पृ. १०७-११२

**टीकाकारांच्या अर्थाचा विमर्श**

२४० मूळ श्लो. ४४

२४१-२४२ सपत्नी-साम्य, मल्लिकभट्ट चारित्र्यवर्धन, व मल्लीनाथ.

२४३-२४४ गमन-साम्य, दक्षिणावर्त-नाथ व हेमाद्रि.

२४५-२४६ संदर्भवैषम्य, शब्दार्थ-वैषम्य.

२४७ वाक्यार्थवैषम्य.

२४८ आनंदहेतु वैषम्य.

२४९ चौघांचीही तारांबळ.

२५० म्हणून अगस्त्यचिन्ह, अपरिचित.

२५१ त्यामुळें अप्रस्तुत अर्थ व

२५२-२५४ मम्मटोक्त अनुचितार्थदोष

२५५ कालिदासाभिप्रेत शुद्ध अर्थ.

२५६ आजपर्यंत लोपलेला अर्थ साधार मांडला आहे.

प्रकरण १६ वें.

पृ. ११३-११५

**टीकाकारांचा अप्रस्तुत अर्थ.**

लें० विषय

२५७ कृत्रिम अर्थाकडे धांव.

२५८ अगस्त्यचिन्ह = दक्षिण याची चतुर जुळवाजुळव.

२५९ लक्षणा–स्वीकार.

२६० लक्षणेमुळें विवाद्य–स्थळें.

२६१-२६२ लक्षणा असिद्ध, सर्व असिद्ध

२६३ कारण दिशेची जरूरी नाहीं. दिशा उद्दिष्ट असती तर उदाहरणें.

२६४ अगस्त्य हा अयनाचें चिन्ह नाहीं, दक्षिणदिशेचें चिन्ह आहे.

२६५-२६६ दक्षिण या अर्थाला साहित्य वाङमयांत आधार नाहीं.


## भाग ५ वा.

### प्रकरण १७ वें.

### पृ. ११६-१२५

### तर्क व समाधान.


२६७ तर्क १ ला. पुनर्वसूवर निवृत्ति सांगितली असती. समाधान- सांप्रतकालीन आक्षेपकाचा अपेक्षे- प्रमाणें अयनस्थान कालिदासाला सांगावयाचें नव्हतें. स्वकालीं जेथें अयन होतें. तें स्थान (अगस्त्य- चिन्ह) कवीनें बरोबर सांगितलें आहे. म्हणून केलेला निर्देशच बरोबर आहे.

लें० विषय

२६८ तर्क २ रा. ज्योतिषोल्लेख केवल विवाद्य. समाधान–निर्विवाद.

२६९-२७१ दूत काव्यांत क्रमांक दोन कोणाचा? कोटिजित्, मेधारुद्र, रघुकार– हे पर्याय.

२७२ कालिदास प्रथम कवि– बरोबर.

२७३-२७८ एक गंभीर गैरसमज. समाधान–सेनगुप्ता, शावरभाष्य

२७९-२८५ एक मार्मिक शंका. मार्मिक प्रतीतिकारक उत्तर.


### प्रकरण १८ वें.

### पृ. १२६-१३६


२८६-३०१ कालिदास गुप्तकालीं मुळींच नव्हता.

३०२-३०४ अपाणिनीय प्रयोगावरून कालिदास अश्वघोषाजवळ.

३०५ गिरनार शिला-लेख, गैरसमज

३०६-३१३ पूर्व शास्त्रांची व्यर्थ ओढाताण– समीचीन उत्तर.

३१४-३१६ कालिदास–पठित पूर्व शास्त्रांतील लालित्य.

३१७ गुप्तकालांत कालिदासाचीं काव्यें होतीं. कालिदास नव्हता.

३१८ अ, इतर मतें– १) उदयनकथा, २) मालविकाग्निमित्र, ३) विदिशा राजधानी.

३१८ ब, कालिदासः तृतीयशतकेऽभूत् ।

# रघुवंश सर्ग १६.

अगस्त्यचिन्हादयनात्समीपं । दिगुत्तरा भास्वति संनिवृत्ते ॥
आनंदशीतामिव बाष्पवृष्टिं । हिमस्रुतिं हैमवतीं ससर्ज ॥४४॥

## महाकवि कालिदास

जो कालिदास-वच हे न यथार्थ वाची ।
तोहे तदर्थ मम ही रचना श्रमाची ॥
देईल काव्य-गणितीं पटु निर्णयाला ।
काला नसे अवधि, भूहि असे विशाला ॥

# संदर्भ ग्रंथ.


१ सूर्यसिद्धांत-रंगनाथीटीकेसह वेंकटेश्वर स्टीम प्रेस, मुंबई इ.स. १९०६
२ सिद्धांत-शिरोमणि–ग्रहगणित– आनंदाश्रम, पुणें ,, १९३९
३ ,, गोलाध्याय मरीचिसह. पुणें ,, १९५२
४ खंडखाद्यक-ब्रह्मगुप्त-आमशर्माटीका, कलकत्ता विद्यापीठ ,, १९२५
५ भारतीय ज्यो. इतिहास-शं बा. दीक्षित, आर्यभूषण ,, १९३१
६ पंचसिद्धांतिका-थीबोसंपादित E J. Lazarus ,, १८८९
७ बृहत्संहिता–भट्टोत्पलीटीकेसह ,, ,, १८९५
८ आर्यभटीय-नीलकंठटीकेसह- त्रिवेंद्रम सीरीज् ,, १९३१
९ Ancient Indian Chronology–प्रा. सेनगुप्ता ,, १९४७
१० Indian, Foreign Chronology–श्री. केतकर वें बा. ,, १९२१
११ काव्यप्रकाश-भीमसेन-टीका, चौखंबा, बनारस ,, १९२७
१२ भगवद्गीता परमार्थप्रपाटीका- गोंधळेकर, पुणें ,, १८९०
१३ Saltore- Life in Gupta age ,, १९४३
१४ कौमुदीमहोत्सव-दक्षिण भारती सं. सीरीज् ,, १९२९
१५ प्राचीन महाराष्ट्र- श्री. वें. केतकर, ज्ञानकोश ,, १९३५
१६ Vincent A Smith Early History of India ,, १९२४
१७ पुसाळकर- भासाचा अभ्यास व प्रा. मिराशी-कालिदास ,, १९३४
१८ नंदुर्गीकर रघुवंश- प्रदीर्घ प्रस्तावना उपयुक्त ,, १८९७
१९ ग्याझेटीअर मुंबई विभाग व भासाचीं नाटकें- श्री. देवधर
२० पं. महादेव शास्त्री जोशी–' मणिमेखला ' ,, १९५६
२१ शाबरभाष्य, कुमारसंभव चारित्र्यवर्धनटीकेसहित, मेघदूत शाश्वत टीकेसहित, दक्षिणावर्तनाथ, अरुणगिरि, नारायण यांचे टीकाखंड, हेमाद्रि, मल्लिकभट टीका-खंड– वगैरे विपुल संदर्भ फार उपयोगी पडले. रामायण, मुद्राराक्षस, किरात वगैरे
२२ कन्नड कविचरित्र, S. S. Shriniwas Ayangar या ग्रंथाचाही बराच उपयोग झाला. इ. स, १९२८

# प्रकरण १ लें : प्रास्ताविक निवेदन.

●●●

ज्योतिःशास्त्रीय सेवा सतत घडतसे आजही होत आहे ।
काव्यादि ग्रंथ नाना पठत पठत मी ज्ञानगंगेंत नाहे ।
' उद्बाहुर्वामनाचा ' निजसमययुत श्लोक जो आकळीला ।
येथें तो वर्णियेला गणित-विधि-बलें 'क्षम्यतां बाललीला' ।।१।।

स्पर्शोनी घटयोनि-चिन्ह मिथुनप्रांतस्थ त्याच स्थलीं ।
पूषा ये परमोत्तरीं म्हणुनियां ती उत्तरा तोषली ।।
ग्रीष्मीं संतत चालत्या हिमनग-स्रावाचिया रूपकें ।
हर्षें शीतल अश्रुपूर जणुं कीं ती वाहवी कौतुकें ।।२।।

श्लोकें या कविकालिदासरचितें ज्योतिर्विदाच्या मनीं ।
अन्यर्थ प्रकटे, करी गणित तो, अत्यंत संतोषुनी ।।
लाभे काळ तया सुसंगत, म्हणे– तो नांदला भारतीं ।
खिस्तानंतरच्या तृतीय शतकीं– त्याची करूं आरती ।।३।।

१ कालिदासाच्या कालासंबंधीं निश्चित पुरावा तत्कालीन वाङ्मयांत किंवा कोरीव लेखांत सांपडेल, तेव्हांच तो मिळाला असें होईल–असें तज्ज्ञ म्हणतात. याच्यापुढें जाऊन आम्हीं म्हणतो कीं, प्रत्यक्ष कालिदासाच्या काव्यांतच, त्याच्याच लेखणींतून उतरलेला पुरावा मिळाला तर तीं इतर बाह्य प्रमाणेंही निष्प्रभच होतील. तसा अंतर्गत पुरावा आम्हांला मिळाला आहे.

२ काल निर्णयांत खगोलीय प्रमाणाचा बलवत्तर अधिकार ओळखूनच मी हा यत्न करीत आहे. या अन्तर्गत खगोलीय प्रमाणाचें विचारी संशोधक आपुलकीनें निरीक्षण करतील अशी आशा आहे.

३ इतर प्रमाणांत व गाणितिक प्रमाणांत फरक हाच कीं, पहिल्यांत निर्णायक प्रमाणाभावीं निरालंब तर्क प्रधानत्वानें वावरतो तर दुसऱ्यांत गणित-बद्धता काम करते. पहिल्यांत कल्पनाचें जाळें तर दुसऱ्यांत अंकाश्रित सोपान लाभतो. पहिल्यांत आभास तर दुसऱ्यांत प्रत्यक्ष दर्शन घडतें. या वैशिष्टयामुळें कार्य सुलभ होतें.

४ रघुवंश सर्ग १६, श्लो. १-४२ व श्लो. ४३, ४४ व ४५ या दोन गटांच्या आधारें कालिदासकालाची साधना केली आहे.

५ कुशराजा, अगस्त्यकंकण ( काव्यदृष्टया अगस्त्यचिन्ह ), त्याचा उत्तर-संचार, अयोध्याप्रापण व अयोध्येचा आनंद या सर्ग १६, १-४२ श्लोकोक्त पंचकाशीं, सूर्य, अगस्त्य (नक्षत्र) चिन्ह उदगयन, उत्तरा-प्रापण व उत्तरेचा आनंद, या पंचकाच्या साम्याधारें (ले. १६५) स्वाभिप्रेत असा एक दृष्टांत ४३, ४४ या श्लोकांत कालिदासानें सजविला आहे. त्यांतच एक खगोलीय घटना ग्रथित झाली आहे. एकीकडे काव्यदृष्टया चतुर दृष्टांत सजला तर दुसरीकडे खगोलवेत्याला अकल्पितपणें त्याच्या कालाचें एक अचूक ( प्रकरण ९ ) गमक लाभलें. या अकल्पित व अचूक गमकावरून प्रस्तुत निबंधांत काल साधन केलें आहे.

२३०२६ ११२८ दि. -१३-

६ टीप- वराहोक्त आद्य सूर्यसिद्धांतांतील कर्कटारंभींच्या अगस्त्यचिन्हावर इ. स. २८० या वर्षीं अयन-निवृत्ति झाली, हें पूर्वींच स्वतंत्र गणितानेंच सिद्ध होतें. कालिदासानें या अगस्त्य-चिन्हाचा व तन्निष्ठ निवृत्तीचा निर्देश केलेला पाहून इ. स. २८० हें वर्ष आम्हीं कालिदासोक्त घटनेला लागू केलें आहे इतकेंच. ( प्रस्तुत निबंधांत ती लागू करून दाखविली आहे. )

७ अशा प्रकारची सिद्धि नेहमीच हातीं लागणाऱ्या सामग्रीवर अवलंबून असते, हें आम्हांस प्रथमपासूनच विदित असल्यामुळें ती सामग्री मिळविण्याचें कामीं श्रमाकडे किंवा द्रव्याकडे आम्हीं पाहिलें नाहीं. बरेचसे श्रम व द्रव्य व्यर्थ झाले तरी प्रयत्नांत कमतरता पडूं दिली नाहीं. प्रयत्नांचें फल म्हणून कांहीं साधनें उपलब्धही झालीं. विजापूरसारखें कोपऱ्यांतलें गांव. त्यामुळें उपयुक्त ग्रंथ मिळूं शकले नाहींत. खगोलीय घटनच्या सामर्थ्यावर कार्यभाग निश्चितपणें साध्य झाला आहे.

८ वरील निर्णय सुसंबद्ध असेल तर सर्वांमुखीं होईल. नसेल तर निवातपणें या निबंधांतच राहील. विद्वानांनीं मात्र याचा प्रांजळ परामर्श घ्यावा, अशी प्रार्थना आहे.

## निबंध-विभाग.

९ या निबंधांत १) दिङ्मात्र कालिदास-काल, २) परिभाषा-विभाग, ३) गणित-विभाग, ४) टीकाकार-विभाग व ५) शंका-समाधान-विभाग- असे पांच विभाग दिले आहेत. आकृतीच्या

सहाय्यानें विवरण केलें आहे. सामान्य वाचकांना सहज समजेल अशा यत्नांत क्वचित् पुनरुक्तीही होऊं दिली आहे.

ले. १२४, १३०, १४६, १५० व १५१ वगैरेंतील प्रत्युत्तरें, आमच्या प्रस्तुत संशोधन–निबधावरील आक्षेपांना अनुलक्षून दिलीं आहेत.

## नामूलं लिख्यते किंचित् ।

१० आम्हीं या निबंधांत १) निराधार असें एकही प्रमाण घेतलेलें नाहीं. २) प्रत्येक निर्णय आधार-पुरस्कृतच घेतला आहे. ३) गृहीत किंवा अध्याहार कोठेंच केला नाहीं. ४) केवळ कल्पनेला थारा दिलेला नाहीं. ५) ओढाताणीचा प्रसंगच पडला नाहीं.

११ हस्तलिखितसंग्रह मद्रास, म्हैसूर, बनारस, तंजावर व पुणें येथील अधिकारी वर्गानें उतारे पाठवून अनुपम सहाय्य केलें. तसेंच आमचे मित्र श्री. ना. ब. जोशी यांनी दोन चांगलीं पुस्तकें दिलीं. प्रा. कुलकर्णी, प्रा. भिडे, प्रा. इनामदार व श्री. मुळगुंद यांनीं उपयुक्त सूचना केल्या. या सर्वांचा मी आभारी आहे

प्रस्तुत ग्रंथांतील सर्व ब्लॉक्स अत्यन्त सुबक तयार करून दिल्याबद्दल दाभोळकर ब्रदर्स, २८८, काळबादेवी रोड, मुंबई- २ यांचाही आभारी आहे. त्यांचा वक्तशीरपणा प्रशंसनीय असून कामही उठावदार आहे.

'श्री मुद्रणालया'चे चालक श्री. गुर्जर बंधु यांनीं अत्यंत हौसेनें प्रस्तुत मुद्रण अंगिकारिलें व आम्हीं दिलेला त्रास सहन

करूनही काम उठावदार रीतीनें पुरें केलें, हें कौतुकास्पद आहे.

१२ संदर्भ ग्रंथांची अप्राप्यता, ग्रंथ विकत घेण्याची मर्यादित पात्रता, तज्ज्ञसंपर्काची शून्यता, श्रीमंतांची अविवेकिता, विद्यापीठांची उदासीनता, विद्वानांची अहंमन्यता, विद्यारतांची क्षुद्रता, सामान्यांची दीनता, उदरंभरू कालाची अनानुकूलता, मासिकांची स्वार्थपरायणता, वृत्तपत्रांची पक्षप्रतिपन्नता व शेवटीं लक्ष्मीची पराङ्मुखता– या प्रतिबंधकांचा, संशोधनप्रमुख जान्हवीसह– ज्ञानेश्वरी १ ल्या अध्यायाचें संपादत करितांना चांगला आघात बसला होता. तरी देखील कालिदासकाल हा विषय हातीं घेतला व बावीस महिने खपून तो गणितबद्ध, सप्रमाण व संशोधनात्मक प्रबंध सिद्ध केला.

१३ परंतु विक्रमनृपतीचें संशोधन मी हातीं घेऊं शकलों नाहीं. केवळ माझ्या कल्पनेची दिशा येथें देतो. ' मालवानां जय, मालवगणस्य जय ' या शब्दप्रयोगांतील जय = विक्रम व त्याला अनुलक्षिणारा शक तो मालविकशक किंवा विक्रमशक असावा. मालवगणांच्या नेत्याचें नांव विक्रम असून मालवगणांच्या रक्तानें लाभलेंल्या पराक्रमांचा निर्देश व्यक्तीच्या नांवानें न करितां, मालवगणाच्या नांवानेंच शोभनतर दिसेल, या त्याच्या उदारभावनेचें प्रतिबिंब म्हणजेच ' मालवगणस्थिति ' होय. कालिदासानेंही ' मालविक ' असाच प्रयोग केला आहे, हें ले. ७५ यांत दर्शविलें आहे. या मालविकशकाचा काल ख्रि. पूर्व ५७ हें सुलभ आहे. ज्या नेत्यानें आपला विक्रम सहाय्यक गणांच्या नांवावर

प्रसिद्ध केला त्याचा ‘ अनुत्सेक ’ उघड आहे. म्हणून कालिदासानें अनुत्सेकः खलु विक्रमालंकारः– असा त्या दूरांतरित, उदार व निगर्वी विक्रमाचा कालांतरोचित सुलभ व सहज गौरव केला आहे. एखाद्या विक्रमाच्या पदरीं असतां तर तो गौरव निराळाच झाला असतां.

आमचे प्रेमळ स्नेही श्री. बापूराव बोंदरे, प्रसिद्ध वकील, बेळगांव, यांनीं, जणों कालिदासाच्याच प्रेरणेनें विजापुरास येऊन, बंधुभावनेनें, प्रस्तुत निबंधाच्या प्रकाशनाची, श्रीमान् काकासाहेब अजरेकर यांच्या औदार्यानें एक यशस्वी योजना आंखली, हा खरोखरीच महोत्सव होय.

साहित्यांतील अनेक शास्त्री, पंडित, उपाध्याय - अलंकार वगैरे पदवीलांछितांनीं पत्रव्यवहारानें आपापले आक्षेप आमच्या-समोर मांडले. त्यांनाही माझें वंदन. कारण त्यायोगें या निबंधाला सर्वसमीक्षक वळण देतां आलें. सोज्ज्वळ मनाच्या आक्षेपकांना आमचें विवरण पटलेंही. आग्रहग्रस्तांची व अहंमन्यांची ब्रह्मदेव-देखील उपेक्षा करितो. म्हणून मीही तेंच केलें. असो.

कविना प्रेरितस्तस्मात् तस्यैव पदपंकजे ।
निबंधमर्पयित्वाऽहं कर्मनिर्लेपतां भजे ।।

–द. वें. केतकर.

## कवि कालिदास-काल.

# भाग १ ला.

(प्रकरणें २)

## दिङ्मात्र कालिदास-काल.

(ले. १४–७९)

# प्रकरण २ रें :　　　　भाग १ ला (अ)

## अ- कालिदासकाल-विषयक इतर निर्देश.

१४ काल-प्राधान्यामुळें खगोलीय ग्रंथांत ग्रंथारंभ-वर्ष जसें सांगावेंच लागते, तशी इतर शास्त्रांची गोष्ट नाहीं, हें खरें असलें तरी भारतांतील ग्रंथकारांना ऐतिहासिक कुतूहल फारच कमी आहे, हें सत्य आहे. त्यामुळें ग्रंथकाराचा काळ काढतांना अंधारांत टांचणी शोधण्याचे श्रम पडून शेवटीं संदिग्धताच पदरीं येते.

१५ एवढा महाकवि **कालिदास,** पण त्यानेंहि आपला काळ प्रत्यक्ष असा कोठेंही सांगितलेला नाहीं. म्हणूनच गत एक शतकभर अनेकांनीं अनेकविध तर्क लढविले आहेत. ते सर्वही अनिर्णीत अवस्थेंत असल्यानें त्यांचें परीक्षण करण्याच्या भानगडींत न पडतां, तीं तीं मतें व त्यांचे पुरस्कर्ते यांचाच केवळ उल्लेख येथें करितो.

### १६　　कालिदास-कालाचे निर्देश.

अ– इसवी सन् पूर्व ८ वें **शतक. पुरस्कर्ता-** एम्. हिपोलायिट फौचे. हें मत अनाथावस्थेंतच राहिलें आहे.

ब –इ. स. पूर्व **१ लें शतक. पुरस्कर्ते**- जोन्स, वैद्य, परांजपे, रॉय, के. वी. शंकर, जयस्वाल, शेंबवणेकर.

(मध्यंतरीं ३०० वर्षांचा खंड.)

**म– इ. स. नंतर ४ थें शतक. पुरस्कर्ता-** म्याक्डोनल.

क– इ. स. नंतर **५ वें शतक. पुरस्कर्ते-** विल्फ्रेड, मनमोहन चक्रवर्ती, डॉ. कीथ, स्मिथ, मिराशी.

ड- इ. स. नंतर ६ वें शतक. **पुरस्कर्ते**- फर्ग्यूसनसाहेब, डॉ. कर्न, डॉ. भाऊ दाजी, म्याक्समुल्लर, डॉ. भांडारकर, प्रा. के. बी. फाटक, प्रो. कोवेल, प्रा. सेनगुप्ता, श्री. मुजुमदार वगैरे.

(मध्यंतरीं ४०० वर्षांचा खंड.)

इ- इ. स. नंतर **११ वें शतक. पुरस्कर्ता**- जॉन बेंट्ली.

**सूचना-** कांहीं कांहीं निर्णयांतील आधारांची दूरान्वितता, असंभवनीयता व दौर्बल्य, प्रतिपादनांतील पंगुत्व व विधानांतील फोलपणा दाखविणें भाग पडलें, म्हणून प्रकरण १८ वें जोडिलें आहे.

---

## प्रकरण २ रें- चालू- भाग १ ला (ब)

## ब- दिङमात्र कालिदास-काल.

### पहिली पायरी- कालिदास इ. स. ४७३ च्या पूर्वी.

१७ ग्रहगणितांत प्रथम मध्यम स्थान व नंतर एका संस्कारानें स्पष्ट ग्रह सिद्ध होतो. याच पद्धतीनें क्रमिक आकुंचनांची एक मध्यम काल-मालिका तयार करून कालिदासाच्या स्वनिर्दिष्ट श्लेषोक्तीच्या संस्कारानें स्पष्ट काल आह्मीं सिद्ध करणार आहों. ती साधना अशी—

कालिदास-कालाच्या **दोन मर्यादा**- एक इ. स. ८० व दुसरी इ. स. ४७३. यापैकीं अलीकडील मर्यादा- **मंदसोर शिलालेख**- इ. स. ४७३.

१८ निर्देश- **वत्सरशतेषु पंचसु विंशत्यधिकेषु नवसु चाब्देषु ।**

यांत ५२९ चा निर्देश आहे. प्रथम शतकांक (५) नंतर वीस (२०) व नंतर नऊ (९) असा क्रम आहे. मालवगणनेचा ५२९ = इ. स. ४७३ येतो. (ले. २१ पहा.) शिलालेखांतील दहावा श्लोक असा आहे- (अधिक पुराव्या-प्रीत्यर्थ प्रा. मिराशी- पृष्ट ३४ पहा)-

**चलत्पताकान्यबलासनाथान्यत्यर्थशुक्लान्यधिकोन्नतानि ।**
**तडिल्लताचित्रसिताभ्रकूट तुल्योपमानानि गृहाणि यत्र ॥**

१९　आतां उत्तर-मेघांतील १ ला श्लोक पहा–

**विद्युत्वन्तं ललितवनिताः सेन्द्रचापं सचित्राः ।**
**संगीताय प्रहृतमुरजाः स्निग्धगंभीरघोषम् ।**
**अन्तस्तोयं मणिमयभुवः तुंगमभ्रंलिहाग्राः ।**
**प्रासादास्त्वां तुलयितुमलं यत्र तैस्तैर्विशेषैः ॥**

| मंदसोर | तुलना | मेघदूत |
|---|---|---|
| १ अबलासनाथाः | | ललितवनिताः । |
| २ तडिल्लताः | | विद्युत्वन्तम् । |
| ३ चित्र | | सचित्राः । |
| ४ अधिकोन्नतानि | | अभ्रंलिहाग्राः । |
| ५ गृहाणि | | प्रासादाः |
| ६ अत्यर्थशुक्लानि | | मणिमयभुवः । |

## इ. स. ४७३ च्या पूर्वी कालिदास.

२०　या दोन्ही पद्यांतील उत्तुंग गृहांची व मेघांची तुलना वाचली असतां शिलालेखांतील श्लोक मेघदूतांतील श्लोकाचा निःसंशय अनुवाद आहे याची साक्ष पटते. यावरून इ. स. ४७३ च्या पूर्वी कालिदास होऊन गेला.

२१　कालिदासानेंही ले. ७६ मधील आपल्या श्लेषोक्तींत प्रथम शतकाचा आंकडा व नंतर वरचा अंक सांगतांना मालविक-निर्देश-पद्धतीच अनुसरली आहे. त्यावरून त्याचें वर्ष-प्रतिपादनाचें अभिप्रेत स्पष्ट दिसतें. (ले. १८)

## दुसरी पायरी– कालिदास इ. स. ४५० च्या पूर्वी.

२२　मुद्राराक्षसकर्ता **विशाखदत्त** थोडाफार कालिदासानंतरचा आहे. म्हणून त्याचा काल काढूं. मुद्राराक्षस अंक १ श्लोक ६ वा–

**क्रूरग्रहः स केतुः चंद्रं संपूर्णमंडलमिदानीम् ।**
**अभिभवितुमिच्छति बलात् रक्षत्येनं तु बुधयोगः ।**

हा श्लोक बृ. सं. पृ. १२६ वर भट्टोत्पलोद्धृत वृद्ध गर्गाच्या (साध्या गर्गाचाही असाच एक श्लोक आहे. असो) श्लोकानुरूप आहे. पहा–

**ग्रहपंचकसंयोगं दृष्ट्वा न ग्रहणं वदेत् ।**
**यदि न स्यात् बुधस्तत्र तं दृष्ट्वा ग्रहणं वदेत् ।**

म्हणजे, बुधग्रह नसेल तर ग्रहण वर्तवावें व बुध असेल तर ग्रहण वर्तवूं नये, या वराहानें (इ. स. ५२० मध्यें) खंडन केलेल्या (ले. ४० पहा) अवास्तव प्रतिपादनाच्या श्लोकाचा स्पष्ट अनुवाद आहे. अर्थात् विशाखदत्त वराहकृत (इ. स. ५००) खंडन कालापूर्वी म्हणजे सुमारें इ. स. ४५० च्या सुमारास येतो.

२३ स्मिथ पृ. ४५, टीपेंत, अनेक दुरुस्त्या होत आल्यानंतर, अभ्यासूंच्या मतें इ. स. ४०० व स्मिथच्या मतें, पृ. १२६, इ. स. ५००, असा विशाखदत्ताचा काल दिलेला आहे. आमच्या केवल खगोलीय प्रमाणाधारें काढलेला काल ४५० हा उपर्युक्त दोहोंच्या मध्यावर आल्यानें तो गणितदृष्टया ग्राह्यतर ठरतो. म्हणून कालिदास इ. स. ४५० च्या पूर्वी होऊन गेला.

## तिसरी पायरी– कालिदास इ. स. ४०० च्या पूर्वी.

२४ विशाखदत्तापूर्वी भारवि व भारविपूर्वी कालिदास. म्हणून भारवीचा काल काढणें प्राप्त आहे. मुद्रा. अंक ४ श्लोक १०–

**सद्यः क्रीडारसच्छेदं प्राकृतोऽपि न मर्षयेत् ।**
**किमु लोकाधिकं तेजो बिभ्राणः पृथिवीपतिः ॥**

हा श्लोक किरातार्जुनीयांतील सर्ग २ श्लोक ४७–

**सहते न जनोऽप्यधःक्रियाम् ।**
**किमु लोकाधिकधाम राजकम् ।**

या श्लोकाशीं समरूप आहे. अनुवाद करण्याइतकी लोकप्रियता व कीर्तिविस्तार होण्यास ५० वर्षे तरी अवश्य आहेत. म्हणून भारवीचा काल इ. स. ४०० सुमारे येतो. म्याक्समुल्लरनें त्याचा काळ इ. स. ३९० काढिला आहे. म्हणून कालिदास इ. स. ४०० च्या पूर्वी झाला.

## काव्यरचनेंतील नवें वळण.

२५ (क) ........ ऐवजीं ........ (ख)

| | (क) | (ख) |
|---|---|---|
| १ | स्फुट शब्द- संघटना | शब्दावडंबर। |
| २ | सहज- रमणीयता | कृत्रिम सौंदर्य। |
| ३ | कोमलाविष्कार | समास-प्राचुर्य। |
| ४ | ललित-कल्पना | अघटित-कल्पना। |
| ५ | चित्त-प्रसन्नता | कर्ण-प्रसन्नता। |
| ६ | अर्थगौरव | अलंकारगौरव। |

२६ प्राचीन मुनि-लेखक व नृ-लेखक तसेंच अश्वघोष, भास, कालिदास यांच्या ग्रंथांत व काव्यांत उपर्युक्त क-वर्गांतील गुणसमुच्चय बऱ्याच अंशानें गोचर होतो. परंतु कालिदासाच्या नंतरच्या काव्यांत हळुं हळुं ख-वर्गांतील गुणांचा प्रवेश होऊं लागलेला दिसतो.

२७ या पुष्पित वाङ्मयाला, उपलब्ध असलेल्या अशा हरिषेणापासूनच आरंभ झाला आहे. त्याच्या प्रशस्ति-काव्यांत ख-वर्गांतील नं. २, ३ गुणांचा प्रवेश दिसतो. पुढें **कौमुदीमहोत्सवांत** श्लोकप्रौढीबरोबरच व किराता-र्जुनीयांत अर्थगौरवाबरोबरच ख-वर्ग नं. २, ५, ६ यांची छटा दिसते. यांपुढील काव्यांत ख-वर्गच वाढला व प्रसाद-हानि झाली. (हीं सारीं विधानें सापवाद समजावींत.)

## चवथी पायरी– कालिदास इ. स. ३५० च्या पूर्वी.

२८ **कौमुदीमहोत्सवाचा** छोटा आकार पाहिला तर, नांवापुरत्या एका प्रेम-कथेंत आच्छादिलेल्या ताज्या अन्यायाला प्रकाशांत आणण्याच्या रोखानें व रोपानें केवळ प्रासंगिक महोत्सवाकरितांच चटकन् लिहिलेलें हें नाटक आहे. तें रंगभूमीवर आणलें असो वा नसो. पण त्यांतील– १ वागर्थयोरिव समवायं करोमि, २ शैलेयगंधिमि शिलातले, ३ अस्या वपुर्न खलु शिल्पफलं विधातुः, ४ वहन् रेवतीमुखमधुमदं, ५ कलिंदकन्येव पयः प्रवाहम्, ६ अविमारकमिव कुरंगी....इ. लीलेनें केलेल्या कालिदासाच्या शब्दांच्या

व कल्पनांच्या अविरत अनुवादावरून तिचें कालिदास-कालाशीं निकट सांनिध्य प्रतीत होतें. कालावधीनें कोप शांत झाल्यावर उसन्या कोपानें हें नाटक रचिलेलें दिसत नाहीं. त्यांतील '**म्लेच्छाः**' या संतप्त गालिप्रदानानें युक्त अशा **लिच्छवींचा** निर्देश व रोषाचा जिवंत सूर पाहिला तर त्याचा लेखन-काल इ. स. ३५० च्या पुढें जात नाहीं. अर्थात् कालिदास इ. स. ३५० च्या पूर्वीं झाला.

## पांचवी पायरी– कालिदास इ. स. ३३० च्या पूर्वीं.

२९ हरिषेणाच्या लेखनांत पुष्पित वाचेला कांहींसें स्थान लाभलें आहे हें त्याच्या समुद्रगुप्ताच्या दिग्विजयाच्या वर्णनावरून समजतें.

> " उदयनाच्या दिग्विजयाच्या हकीकतीवरून रघूच्या दिग्विजयाची हकीकत बनविल्याचें स्पष्ट दिसतें."– असें " प्राचीन महाराष्ट्र " पृ. ३८० वर श्री. केतकर लिहितात.

अर्थात् कालिदासाचा रघु-दिग्विजय वाचूनच हरिषेणानें समुद्र-गुप्ताचा दिग्विजय वर्णिला आहे, हें रघु. सर्ग ४ श्लोक ४३– **गृहितप्रतिमुक्तस्य**– या श्लोकाच्या अलाहाबाद-प्रशस्तींतील अनुवादावरूनच स्पष्ट होतें. हरिषेणानें कालिदासाच्या काव्यांचा चांगला अभ्यास केला होता. म्हणून अलाहाबाद-प्रशस्ति (इ. स. ३५०) कालाच्या पूर्वीं वीस वर्षें, हरिषेणाच्या अभ्यासाचा काळ इ. स. ३३० येतो. म्हणून कालिदास इ. स. ३३० च्या पूर्वीं होऊन गेला.

## रघु. सर्ग ६, ५९ उरगपुर.

## कालिदास इ. स. ३०० च्या पूर्वीं.

३० पांडयांच्या दक्षिणराज्यांतील (१) मलयपर्वत, (२) तमाल, वेलदोडे सुपारी वगैरे भूसंपत्ति, (३) मोतीं, रत्नें वगैरे समुद्रजन्य विपुलता यांचें वर्णन व (४) विशेषत: दक्षिणपथाचा सर्वांगीण उत्कर्ष व्हावा म्हणून मलयपर्वतावरील आश्रमांत तपश्चर्या करणाऱ्या, दक्षिणभागांत अति वंद्य

अशा मंगलधाम **अगस्त्याचा** निर्देश- यावरून आपल्या प्रवासांत हा देश कालिदासानें पाहिला होता व त्या कालीं पांड्यांची राजधानी-**उरगपुर**- येथें असलेली पाहूनच त्यानें वरील निर्देश केला आहे, कारण नागपूर हें गांव पूर्वीं होतें असें खालील टीकावचनांवरून स्पष्ट दिसतें. त्या टीका अशा-

३१ टीकाकार लिहितात-

**दक्षिणावर्तनाथ**- उरगाख्यस्य । पांडयदेशे कायकुटिका कापि नदी विद्यते । तस्यास्तीरे नागपुरं नाम नगरम् । तदुरगपुरमित्युच्यते इति अनुसंधेयम् ।

**अरुणगिरिटीका**- पांडयेषु कायकुटी नाम नदी । तत्तीरे नागपुरम् । तदुरगपुरमित्युच्यते ।

**नारायण**(पदार्थ)- उरगाख्यं पुरं नागपुरम् । उरगस्य आख्या नाम यस्येति विग्रहः । पांडयदेशे कायकुढी नाम नदी प्रवहति । तस्याः तीरे नागपुरं तत् उरगपुरमित्युच्यते ।

(मल्लीनाथाच्या टीकेंत 'कान्यकुब्जतीरे' असा चुकीचा पाठ आहे. म्हणून तेथें 'कायकुढीतीरे' असा शुद्ध पाठ पाहिजे.)

३२ टी. एम्. एस् एस्. एम्. लायब्ररी **तंजावर** येथील सेक्रेटरींचें माझ्या पत्राला ६४।५६।५७ / २४-४-५६ या क्रमांकाचें उत्तर आलें तें असे-

कावेरीच्या एका शाखेवर दोन शहरें आहेत. एक नागूर म्हणजे नागपूर. (कारण कानडींत ऊर = पूर असा विख्यात अर्थ आहे.) तसेंच दुसरें नागापट्टनम्. दोन्ही शहरें समुद्रकिनारीं असून पहिलें दुसऱ्याच्या चार मैल दक्षिणेला आहे. नदीचें नांव **कडुवाई** असें आहे.

३३ **मद्रास** विश्वविद्यालयांतील इतिहास-प्राध्यापकाचेंही ता. १६-५-५६ च्या उत्तरांत दक्षिण- भारतांत नागूर, नागापट्टनम् अशीं शहरें आहेत, असा मजकूर आहे. असो.

## अन्य पुराव्याची जरुरी नाहीं.

३४ प्रत्यक्ष कालिदासाचीच ही ऐतिहासिक उक्ति असल्यानें अन्य पुराव्याची

तितकीशी जरुरी नाहीं. शिवाय त्या इतक्या प्राचीन काळचा इतका बारीक तपशील इतिहासाला सांपडणेंही कठीणच आहे. तरी सांपडल्यास निःसंशय हवाच आहे.

## पांडयांचें पुनः प्राबल्य । तात्पूर्तिक राजधानी नागपूर.

३५ ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत पांडयराजधानी **मदुरा येथें** होती. ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकाच्या द्वितीय अर्धांत ( or perhaps in the Second Century-स्मिथ पृ. ४८२)**कारीकल** चोळ-नृपतीनें पराभव करी-पर्यंत पांडयराजे दक्षिणेंत फार प्रबळ होते. पराभवानंतर सुमारें शें-सव्वाशें वर्षांच्या अवधींत ते पांडयराजे ' दिशि मंदायते तेजो दक्षिणस्यां रवेरपि '-(४.५९) इतके पुनः प्रबळ झाले व **तिसऱ्या शतकांत** राजधानी पुनः परत **मदुरेला** कायमची हलविण्यापूर्वीं **तिसऱ्या शतकांतच** त्यांची तात्पूर्तिक राजधानी **नागपूर** येथें असलेली प्रत्यक्ष पाहूनच कालिदासानें– **अथोरगाख्यस्य पुरस्य नाथम्** । रघु. ६, ५९ । या पंक्तींत पुनः प्रबळ होऊन सिंहासनारूढ असलेल्या **नागपूर-नाथाला** कवीनें स्वयंवराला आणलें, यांत प्रकृष्ट औचित्य आहे. अर्थात् कालिदास इ. स. ३०० च्या पूर्वीं होऊन गेला, असें प्रत्यक्ष कालिदासाच्याच ऐतिहासिक पुराव्यावरून स्पष्ट होतें.

३६ **आकुंचन-** याप्रमाणें अलीकडील मर्यादेचें **इ.** स. ४७३ पासून ३०० पर्यंत साधार आकुंचन झालें आहे. आतां पलीकडील मर्यादेचा विचार करूं.

## आतां पलीकडील मर्यादा.

३७ **वराहमिहिर** (इ. स. ५०५–५८७) पंचसिद्धान्तिकेंत लिहितो–

**पौलिश-रोमक-वासिष्ठ-सौर-पैतामहास्तु सिद्धान्ताः ।**
**पंचभ्यो द्वावाद्यौ व्याख्यातौ लाटदेवेन ॥ ३ ॥**
**पौलिशकृतः स्फुटोऽसौ तस्याऽऽसन्नस्तु रोमकः प्रोक्तः ।**
**स्पष्टतरः सावित्रः परिशेषौ दूर विभ्रष्टौ ॥ ४ ॥**

पं. सि. अ. पहिला.

३८ **अर्थ–** पौलिश, रोमक, वासिष्ठ, सौर, पैतामह हे पांच सिद्धांत असून

पहिल्या दोहोंवर **लाटदेवाची** व्याख्या आहे. (२) पौलिश स्फुट आहे. त्याच्याजवळ रोमक; सूर्यसिद्धांत मात्र **स्पष्टतर** आहे; बाकीचे दोन वासिष्ठ व पैतामह निकामी झाले आहेत.

## इ. स. ८०.

३९ या आद्य पंचकांपैकीं वासिष्ठ व पैतामह हे निकामी झाले म्हणूनच वेदांगज्योतिषांतील पुराण-पद्धतीचा संदर्भ तरी जिवंत असावा, या हेतूनें वराहानें शकानुसारें इ. स. नंतर ८० माघ शुद्ध प्रतिपदा मंगळवार, असा वेदांगानुसारी **पैतामहाचा** युगारंभ व पांच आर्या मात्र देऊन ठेविल्या आहेत. वसिष्ठ-कश्यपादिकांच्या संहिता अगोदरच झाल्या होत्या. गर्गाचार्यांची संहिता इ. स. आरंभाच्या सुमारास झाली होती, हें त्यांतील काण्वांच्या राजवटीच्या वर्णनावरून स्पष्ट आहे. या सर्व संहितांत शुभाशुभ कथनांचा बराच विस्तार आहे. त्याच्याबरोबरच कांहीं कांहीं प्रत्यक्ष खगोलीय घटनांचेंही प्राचीन वर्णन त्यांत दिलें आहे परंतु हें अवास्तव, अनुपपन्न स्वरूपाचें असल्यामुळें स्फुट गणिताचे ग्रंथ तयार होऊं लागून त्यांतील गणित क्रमशः प्रौढावस्थेकडे चाललें होतें, असें वराहानेंच वरील ४ थ्या आर्येंत क्रमवार सांगितलें आहे. सूर्यसिद्धांताच्या -स्पष्टतर- या विशेषणावरून तो पौलिश-रोमकांच्या नंतरचा आहे, हें स्पष्ट दिसतें. ग्रहयुद्धाध्याय, रोहिणीयोगाध्याय वगैरे नवीन अध्यायही त्यांत कालक्रमानें घातले गेले आहेत हें बृहत्संहितेवरून स्पष्ट होतें. शिवाय–

**स्फुटगणितविदः कालः कथंचिदपि नान्यथा भवति ।**

अशी बृहत्संहितेंत (पृ. १३१) स्फुटगणिताची प्रशंसाही त्यानें केली आहे. यावरून इ. स. आरंभापासून (६ व्या शतकाच्या अर्धापर्यंत) वराहकालापर्यंत राहु, केतु व रविचंद्रग्रहणादिकांच्या अवास्तव उपपत्तीनें युक्त अशा गर्ग-वृद्धगर्ग-तंत्राबरोबरच या स्फुटगणितप्रवृत्तीच्या सिद्धांतांचें व स्पष्टतर आद्य सूर्यसिद्धांताचें साहचर्यही होतें. कारण स्वतः वराहानेंच या आद्य सूर्यसिद्धांतोक्त कांहीं श्लोकांचा (बृ. सं) अनुवाद केला आहे. म्हणूनच टीकेंत

(इ. स. ९००) भट्टोत्पलानें आद्य सू. सि. तील मूळ वचनेंच पुष्ट्यर्थ दिलीं आहेत.

## अवास्तव कल्पनांचें खंडन (वराहमिहिर).

४० त्याबरोबरच अविचक्षण जनतेंत बद्धमूल झालेल्या गर्गादींच्या अवास्तव प्रतिपादनांचें **"न विचिन्त्यमिदं विपश्चिद्‍भिः"**– म्हणजे पंडितांनीं त्याचा अंगिकार करूं नये, असें पृ. ११६ ते १२६ बृ. सं. वराहानें खंडनही केलें आहे. याचा अर्थ स्फुटगणिताबरोबरच कांहीं प्रामादिक खगोलीय कल्पना वराहापर्यंत चालत आल्या होत्या. पुढें ब्रह्मगुप्त, श्रीपति वगैरे महान् गणितज्ञ निर्माण होऊन पूर्वींची अवास्तव मतें निष्प्रभ झालीं. (याचा उपयोग ले. २२ मधील निर्णयांत केला आहे.)

## वराहोक्त इ. स. ८० या वर्षाचें महत्व.

" **द्व्यूनं शकेन्द्रकालं** "- - पं. सि. अ. १२

शक २ + ७८ = इ. स. ८०.

४१ वराहोक्त इ. स. ८० हें अधिकृत वर्ष एखाद्या दीपगृहाप्रमाणें मार्गदर्शक झालें आहे. त्यायोगें इ. स. पूर्व व इ. स. नंतरच्या प्रदीर्घ कालावर प्रकाश पडला आहे. (१) या प्रदीर्घ कालावधींत ले. ३०७ यांत दिलेलें मुनिलेखक व नृ-लेखक क्रमानें चमकलें हें कळतें. (हा काळ इ. स. पूर्व ५००-इ. स. ३०० म्हणजे सुमारें ८०० वर्षांचा येतो.)

(२) नवीन शास्त्रें निर्माण झाल्यावर -अतिविस्तृतत्व व प्राचीनत्व- यामुळें हीं पूर्व पूर्व शास्त्रें(उच्छित्तिभयात्)उच्छिन्न होऊन नामशेषत्वाकडे चालल्यामुळें वराहानें आपल्या बृहत्संहितेंत त्यांचा संक्षेप (स्वल्पतरं) करून ठेविला.

(३) भट्टोत्पलानेंही आपल्या टीकेंत **-पूर्वशास्त्रदृष्टत्वात्, पूर्वशास्त्रदृष्टत्वात्-** असा वारंवार उल्लेख केला आहे. त्यायोगें **पूर्वशास्त्रें** व **उत्तरशास्त्रें** यांचा स्पष्ट बोध होतो.

(४) खगोलीय पंचसिद्धांतांपैकीं १] पैतामह २] वासिष्ठ हे दोन्ही सिद्धांत अतिप्राचीनत्वामुळें निकामी झालेहोते हें कळतें. तसेंच ४] पौलिश ५] रोमक या दोन प्राचीन स्फुट सिद्धांतावर लाटदेवाची व्याख्या होण्याइतका प्राचीन काळचा त्यांचा प्रचार कळतो.

(५) पांचवा.... ग्रहयुद्धाध्याय, रोहिणीयोगाध्याय वगैरे नाविन्यानें युक्ततर व सूक्ष्मत्वानें स्पष्टतर सूर्यसिद्धांत तयार होऊन ग्राह्य पदवीला पोंचला होता तरी सुसंपन्न टीकाकाराची वाट पहात होता कारण तो "स्पष्टतर" अत एव **पौलिश-रोमकानं**तरचा म्हणजे नवीन होता हें कळतें.

(५) परंतु हे पांच सिद्धांतही वराहकालीं (इ. स. ५२०) प्राचीनच (पूर्वशास्त्रें) झाले होते. कारण अंकचिति, विजयनंदि वगैरेचे अर्वाचीन पंचसिद्धांत त्याच नांवानें प्रचारांत येऊं लागले होते. म्हणूनच त्या प्राचीन पंचकांतील तत्त्वेंही उच्छिन्न होऊं नयेत म्हणून त्यांचाही सारभूत संक्षेप पंचसिद्धांतिका या अनुरूप संज्ञच्या ग्रंथांत वराहानें करून ठेविला हें समजतें. (या लेखांकाची पुरवणी ले. ३०६ वगैरे यांत पहा.)

## ग्राह्यांश.

अतिप्राचीन पैतामह व वासिष्ठ निकामी झाल्यावेळीं प्राचीन काळीं १] पौलिश व रोमक हे स्फुटसिद्धांत, २] त्यांचा प्रचार दर्शविणारी लाट-देवी व्याख्या व ३] इ. स. ८० नंतर " स्पष्टतर " अत एव नवीन सूर्य-सिद्धांत– यांचा प्रचार होता एवढा भाग आमच्या कामाला पुरेसा आहे.

या गाणितिक पार्श्वभूमीच्या आधारें पलीकडील मर्यादा इ. स. ८० येते, ती अशी–

## पहिली पायरी– कालिदास इ. स. ८० च्या पूर्वीं नाहीं.

४२ कालिदासानें मार्मिक दृष्टांतप्रसंगानें जे थोडे परंतु यथार्थ खगोलीय निर्देश केले आहेत, ते पूर्वोक्त आद्य-सूर्य-सिद्धांताधारेंच केले आहेत. पहा–

रघु. ३, २२- पुपोष वृद्धिं हरिदश्वदीधितेः।
अनुप्रवेशादिव बालचन्द्रमाः ॥

याच्या पुष्टीकरणार्थ **मल्लीनाथानें**-

**सलिलमये शशिनि रवेः दीधितयो मूर्च्छितास्तमो नैशम्।**
**क्षपयंति दर्पणोदरनिहिता इव मंदिरस्यान्तः ॥**

असें वराहसंहिता (अ. ४, २) वचन दिलें आहे, तर वराहवचनाच्या पुष्टयर्थ श्रीभट्टोत्पलानें (पृ. १००)- **तथा च सूर्यसिद्धांते** - असें म्हणून-

**तेजसां गोलकः सूर्यः ग्रहर्क्षाण्यंबुगोलकाः।**
**प्रभावन्तो हि दृश्यन्ते सूर्यरश्मिविदीपिताः ॥**

असें सूर्यसिद्धान्ताचें वचन दिलें आहे. सारांश, यथार्थ खगोलीय निर्देश या स्पष्टतर सूर्यसिद्धांताच्या आधारें कालिदास नेहेमींच करतो, हें पुढेंही स्पष्ट दिसेलच. हा नंतरचा स्पष्टतर सूर्यसिद्धांत इ. स. ८० नंतर ग्राह्य पदवीला आल्यामुळें इ. स. ८० च्या पूर्वी कालिदास नव्हता हें उघड आहे.

## दुसरी पायरी- कालिदास इ. स. १०० च्या पूर्वी नव्हता.

४३ अश्वघोष बुद्धचरित्र, सर्ग २, श्लोक २०-

**ततः स बालार्क इवोदयस्थः। समीरितो वन्हिरिवानिलेन ॥**
**क्रमेण सम्यक् ववृधे कुमारः। ताराधिपः पक्ष इवातमस्के ॥**

हा श्लोक वरील रघु. ३, २२ या श्लोकाशीं व त्याच्या सूर्यसिद्धांताच्या आधाराशीं समरूप आहे. अर्थात् **अश्वघोष** हा देखील इ. स. ८० च्या नंतरचाच आहे. परंतु सुदैवानें आमच्या या स्वतत्र गाणितिक निर्णयाचें औचित्य दाखविणारा त्याचा मध्यम काळ, **कनिष्काच्या** साहचर्यानें इ. स. १०० हा उपलब्ध आहे. म्हणून **कालिदास इ. स. १०० च्या पूर्वी नव्हता.**

## भास देखील इ. स. ८० च्या पूर्वी नव्हता.

( उतारे फार देत बसत नाहीं. )

४४ उल्का, निर्घात, भूमिकंप वगैरेंचा निर्देश अथर्वसंहितेंत दिला असला

तरी त्यांच्या शुभाशुभत्वांचें विस्तृत वर्णन प्रथम शतकांतील गर्गादिसंहितांत आहे. भास, कालिदास यांचे निर्देश गर्गादीवरच आधारले आहेत पहा—
**संहितेंतील वचनें**— ( गर्ग, वसिष्ठ वगैरे )—

(१) **निमित्तभूता लोकानां उल्का-निर्घात-भूचलाः ।**
(२) **निशार्धे तु यदा पूर्वे उल्का-निर्घात-भूचलाः ।**
(३) **निर्घातोल्का-महीकंपाः स्निग्ध-गंभीर-निःस्वनाः ।**

४५ **भासाचे उल्लेख**— दूतघटोत्कच १, २६; दूतवाक्य १-५०—

**भूमिकंपः सशब्दोऽयं कुतो नु सहसोत्थितः ।**
**उल्काभिश्च पतंतीभिः प्रज्वालितमिवांबरम् ॥**

तसेंच राहु सर्पमूर्तिक असून चंद्रार्कांना तो मुखानें ग्रासतो ही वसिष्ठ-कल्पना भासाच्या बालचरित १, ११—

**किं द्रष्टव्यः शशांकोऽयं राहोर्वदनमंडले ।**

या पद्यांत प्रतिबिंबिली आहे.

**सारांश**— भास देखील (अश्वघोष, कालिदासाप्रमाणेंच) इ. स. ८० च्या नंतरच होऊन गेला, हें साधार स्पष्ट केलें आहे.

## अश्वघोष, भास व कालिदास यांचा परस्पर कालक्रम.

४६ या तिहींच्या परस्पर कालक्रमाबद्दल बरेच मतभेद आहेत. म्हणून आम्हीं येथें त्यांच्या खगोल निर्देशांच्याद्वारें एक त्रोटक पण साधार कालक्रम देतों. सतत वेध, निरीक्षण, परीक्षण यांच्याद्वारें ससंकेत ग्रहगणित ग्रंथ १००, २०० वर्षें प्रौढावस्थेकडे जात जात प्रचारांत येऊं लागले होतें, हें मागें (ले. ३९) सांगितलेंच आहे. कवीही उपमा, रूपक, दृष्टांतांत खगोल निर्देश करीत असतात. या निर्देशांत एक क्रम गोचर होतो, तो असा—

४७ **अश्वघोष**— चंद्र, सूर्य, राहु व नक्षत्रें यांचाच अलंकारिक निर्देश करतो. पहा—

**ताराधिपः पक्ष इवातमस्के; दिवाकरेणेव विनाकृतं नभः; पुनर्वसू योगगताविवेंदोः; अगस्त्यजुष्टां दिशमप्रयाताम्; बालार्क इवोदयस्थः ।** इत्यादि.

४८ **भास**– चंद्र, सूर्य, नक्षत्रे, राहु– यांशिवाय **ग्रह**, **ग्रहगण**, **भगण**– हे नवीन निर्देश. जसें–

**नवशशिनमिवार्यम्**(प्रतिमा ७, १२)। **चंद्रं सनक्षत्रमिवोदयस्थम्**(७, १४)। **ग्रहगणचरितं वायुमार्गं प्रयाति** (दूतवाक्यं १, ४४) । **ग्रहमिव भगणेशम्** (अभिषेक ६, ९)। **राहोर्वदनमंडले** (बालचरित १, ११) ।

यांतील ग्रह, ग्रहगण, भगणेश, हे नवीन अधिक निर्देश स्फुटग्रहगणिताचा अल्पसा कविकर्णगोचर प्रचार दाखवितात.

४९ **कालिदास**– चंद्र, सूर्य, नक्षत्रें, राहु, ग्रहगणाऐवजीं साक्षात् संकेतित **-ताराग्रह- योगतारा, तरलबिंब,** अयन, प्रवृत्ति, निवृत्ति, ग्रहणें, रोहिणी-योग, अगस्त्यचार वगैरे **पारिभाषिक, यथार्थ** व **अधिकृत** असे विपुल निर्देश आहेत. या विविध व संपन्न संदर्भावरून ग्रहगणितशास्त्राचा प्रचार कवि-कर्णगोचरच केवल नव्हें तर त्याची **परिभाषाही कालिदासाच्या काव्यांत समाविष्ट** झाली होती, हें उघड आहे. अर्थात् या सीघांत कालिदासाचा क्रमांक **तिसरा** लागतो.

५० भासानें ग्रहगण, ग्रह, भगण, भगणेश असे अश्वघोषाच्या नंतरचा काल दाखविणारे पारिभाषिक खगोलीय शब्द वापरले आहेत. याचा अर्थ भासकालीं **ग्रहगणित** कविकर्णगोचरत्वाच्या सीमेंत आलें होतें. म्हणून भास-कवीचा क्रमांक **दुसरा** लागतो. अश्वघोषाच्या कालीं, इ. स. पहिल्या शतकांत **ग्रहगणित** अद्याप मार्गस्थ असल्यानें कविकर्णगोचरता प्राप्त नव्हती, या खगोलीय साधार प्रमाणावरून १) अश्वघोष, २) भास, ३) कालिदास असा क्रम लागतो.

## दुसऱ्या रीतीनें कालक्रम.

**अश्वघोषानंतर कालिदास**– (प्रा. मिराशीच्या आधारे)–

५१ त्यांच्या ग्रंथांतील आम्हांला पटलेलें असें एकच **प्रमाण** आहे आणि तेंही त्यांच्यापेक्षां आम्हांलाच अधिक उपयुक्त आहे तें असे– अश्वघोषाच्या काव्यांत -"प्रागेव"- हा शब्द किमुत = मग .. विषयीं काय विचारावें– या अर्थी अनेकदां आढळतो. पहा–

**एवमाद्या महात्मानो विषयान् गर्हितानपि ।**
**रतिहेतोर्बुभुजिरे प्रागेव गुणसंहितान्** ॥ बुद्ध. ४, ८१

याचा अर्थ–अशा प्रकारें मोठमोठ्या लोकांनीं भोगलालसेनें निंद्य विषयांचाही उपभोग घेतला आहे. मग चांगल्या विषयांविषयीं तर बोलावयास नको.

५२ बुद्ध ४, १०; जातकमाला पृ. ५१, वगैरेंत ' प्रागेव ' हा शब्द बौद्ध-वाङमयांत आढळतो. पण हिंदु वाङमयांत, **आपटे** कोशांतही हा शब्द आढळत नाहीं. तरी आश्चर्य हें की ऋतुसंहार ६-२३ यांत कालिदासानें हा शब्द **एकदांच** वापरला आहे, तो असा– ( कुंदपुष्पोज्ज्वल उपवनें ) **चित्तं मुनेरपि हरंति निवृत्तरागम् । प्रागेव रागमलिनानि मनांसि यूनाम्** । म्हणजे हीं कुंदपुष्पोज्ज्वल उपवनें मुनींचेंही विरक्त चित्त हरण करितात. मग अनुरागयुक्त तरुणांचीं मनें आकर्षितील, यांत काय नवल ?

५३ टीकाकारांनाही हा शब्द अपरिचित असल्यानें, एकानें– मुनिचित्ताप-हरणात्प्रागेव– असा कांहीं तरीच अर्थ दिला आहे.

५४ यावरून कालिदासाचें स्वपूर्व संस्कृत **बौद्ध ग्रंथांचें** वाचन सिद्ध होतें. ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकांत महायान पंथाचा उत्कर्ष झाल्यावरच बौद्ध लोक संस्कृत ग्रंथरचना करूं लागले. तत्पूर्वी त्यांचे ग्रंथ पालीभाषेंत होते, हें विद्वानांना मान्य आहे. म्हणून कालिदासाला ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत

घालतां येत नाहीं. (आमचें गाणितिक प्रमाण ले. ४२-४३ पहा ) अर्थात् **अश्वघोषानतर कालिदास झाला.**

५५ तसेंच **धिष्ण्य** शब्द **वासस्थान** या-अर्थी पुष्कळ वेळां ( बुद्ध १, २; ४, १०२; ८, ४०; ९, २ वगैरेस्थळीं )त्यांत वापरला आहे कालिदासानें (रघु. १५, ५९ व शाकुन्तल ४, ८) केवळ दोनदांच वापरला आहे. अर्थात्– **अश्वघोषानंतर कालिदास झाला.** (हें आमचें प्रमाण आहे.)

## अश्वघोष व कालिदास (तुलना).

५६ उभयतांच्या अभ्याससंपन्नतेंत– (१) सांद्र विद्यार्जन, अनवरत व्यासंग, (२) नानाशास्त्रसमालोचन, (३) सुसंस्कृत बुद्धीचे असंख्य प्रवृद्ध अंकुर, (४) उत्स्फूर्त ओजस्वी काव्यनिबंधन व स्वतंत्र विकास, (५) लेखनप्रवाहांत अखंड अनुबंध व स्वतंत्र विलास– हा गुणसमुच्चय समानत्वानें दृग्गोचर होतो. तरी कांहीं ठळक भेद आहेत, ते असे–

५७ अश्वघोषाचा विशिष्ट पद्धतीचा तर कालिदासाचा स्वेच्छाप्रेमाचा अभ्यास, एकाची प्रचार-प्रवृत्ति तर दुसऱ्याची कर्मण्येवाधिकार-प्रवृत्ति, एकाचे लेखनाचे आवेशांत सुचतील ते शब्द व प्रयोग तर दुसऱ्याचे भावनासिद्धीकरतां निवडलेले शब्द व प्रयोग. पहिल्याचे श्लोकांत द्रुतगति, तर दुसऱ्यांत निवांत गति. पहिल्याची व्यापक प्रतिभा, तर दुसऱ्याची सखोल प्रतिभा. पहिल्यांत लोकचित्तसंशोधनाच्या कांक्षेमुळें अल्पप्रसाद तर दुसऱ्यांत लोकरंजक प्रचुर प्रसाद, पहिल्यांत गंभीर कथन, तर दुसऱ्यांत चित्तहारी कथन, पहिल्यांत रंजननिराकांक्षेमुळें अनन्यपरतंत्रता, तर दुसऱ्यांत कवियश:प्रार्थित्वामुळें अन्यपरतंत्रता– अशी तुलना होईल.

अश्वघोष– **तस्मात् प्रमाणं न वयो न कालः ।**

कालिदास– **तेजसां हि न वयः समीक्ष्यते ।**

५८ या एकाच उदाहरणांत वरील तुलनेचें संपूर्ण प्रतिबिंब उमटलेलें दिसेल. म्हणून येथें प्रथम पंक्ति पूर्व व द्वितीय पंक्ति अपर होय. हेंच पौर्वापर्य त्या उभय कवींत आहे. म्हणून अश्वघोष पूर्व व कालिदास अपर होय.

५९ **दीप**– अश्वघोषानंतर कालिदास, एवढयावरूनच त्याला गुप्त कालांत टाकतां येणार नाहीं. गुप्त कालांत, इतर कवीप्रमाणें, कालिदासानें **-प्रागेव-** हा शब्दच योजिला नसता. त्या शब्दाचा संस्कार ताजा असण्याच्या अवधींतच कालिदास होऊन गेला. अश्वघोषादिकांच्या बुद्धवाङमयीन उद्यानांतून वरींच कल्पनापुष्पें स्वत:च्या काव्य-माला-ग्रंथनांत कालिदासानें गुंफिलीं आहेत, असें ४थ्या शतकांतील दिङ्नागाचार्यानें म्हटलें आहे. (दक्षिणावर्त०)

६० स्वपूर्वकालीन ग्रंथांतील प्रत्यक्ष घडलेल्या बुद्धकालीन प्रसंगांचीं पाळी भाषेंतील अनेक सविस्तर वर्णनें वाचून अश्वघोषानें मनोहर बुद्धचरित रचिलें. त्या वर्णनांची, प्रसंगांची व शैलीचीं मदत घेऊन स्वत:च्या काव्यांतील प्रसंगांत तत्सम शैलीचीं वर्णनें रमणीयतर करून कालिदासानें नी यथास्थानीं नाविन्यानें गुंफिलीं, याला कमी चातुर्य लागतें असें नाहीं. वृक्ष, मूळांच्या मुखानें दहा दिशांचें पाणी पितो तरी स्वतंत्र उंचीनें ऐटींत उभा राहतो. **" मणौ वज्रसमुत्कीर्णे सूत्रस्येवास्ति मे गतिः "** हें स्वतः कवीच मुक्त मनाने सांगत आहे ना ?

## अश्वघोष, कालिदास–मध्यें भास.

६१ तरी देखील कालिदासाला अश्वघोषाच्या पूर्वी टाकावें म्हटलें तर **भास** कवि मध्यें येतो म्हणून या दोघांना अश्वघोषापूर्वी घालावें म्हटलें तर भास कवि अश्वघोषाच्या नंतरचा आहे हें त्याच्या खालील श्लोकसरणीवरून स्पष्ट दिसतें. तें असें– बुद्धचरित्र १३, ६० पहा–

**काष्ठं हि मथ्नन् लभते हुताशं । भूमिं खनन् विंदति चापि तोयम् ।**
**निर्बन्धिनः किंचन नास्त्यसाध्यं । न्यायेन युक्तं च कृतं च सर्वम् ॥**

हा श्लोक भासाच्या प्रतिज्ञायौगं० अं. १, १८–

**काष्ठादग्निर्जायते मथ्यमानात् । भूमिस्तोयं खन्यमाना ददाति ।**
**सोत्साहानां नास्त्यसाध्यं नराणां । मार्गारब्धाः सर्वत्रयत्नाः फलंति ॥**

या श्लोकाशीं अत्यंत समरूप आहे. शब्दही तेच आहेत.

६२ पहिल्या श्लोकांत अंतःस्फूर्ति, तिचा वेग, अविलंबित पदन्यास व सहजोद्गार दिसतात, तर दुसऱ्यांत याच्या उलट प्रवाह असून केवळ निराळ्या वृत्तांत केलेला तो अनुवादच आहे अशी प्रतीति येते. म्हणून पहिला श्लोक **पूर्व** व दुसरा **अपर** होय. (हाच क्रम ले. ५० पहा.)

६३ मागें ले. २, प्रतिपादिलेल्या भारवि-विशाखदत्तांच्या विदित पौर्वापर्याच्या पंक्तिद्वयांत जो आविष्कारभेद गोचर होतो, त्याच प्रकारचा भेद येथेंही गोचर होतो व त्यायोगें पौर्वापर्य निश्चित होतें. अर्थात् अश्वघोष **पूर्व** व भास **अपर**. सारांश, मागें खगोलीय संदर्भानें दाखविल्या-प्रमाणें प्रस्तुत परीक्षणानें देखील **अश्वघोष, भास** व **कालिदास** हाच क्रम सिद्ध होतो अश्वघोष इ. स. १०० तर भास इ. स. २००; म्हणून **कालि-दास इ. स. २०० च्या अगोदर नव्हता.** तो भासानंतरचा आहे.

## चवथी पायरी– कालिदास इ. स, २०० नंतर.
## नूपुर-काव्य व मणिमेखला-काव्य.

—o—

**माझें पत्र ४-५-१९५६, प्रत्युत्तर ता. १५-५-१९५६**
T. M. S. S. M. Library- Tanjore; No. 129/56-57
Shri K. V. Shastri, **महावंशाच्या आधारें.**

—o—

६४ चोळराज्यनिष्ठ **पुहार**-राजधानीतील लक्ष्मीसंपन्न **माशात्तुवान्** व्यापा-ऱ्याचा पुत्र व स्नुषा, **कुवलयन्** व **कण्णगी**, जणू हंस व हंसी. सुखवैभव सदैव सामोरे होतें. पण मध्येंच पाल चुकचुकली. कुवलयन् नर्तकी- माध-

वीच्या नादीं लागला. संपत्तिसर्वस्व त्यानें माधवीच्या ओटींत ओतलें. एक दिवस **माधवी**च्या गाण्यांतील कठोर विनोदानें **कुवलयन्** अस्वस्थ होऊन घरीं परतला. त्याला पश्चात्ताप झाला. आपल्या निष्प्रभ पत्नीला ( कण्णगीला ) पाहून म्हणाला, " कण्णगी, मला क्षमा कर ". कण्णगीनें त्याला " जाऊं दे, झालें गेलें गंगेला मिळालें. माझ्याजवळ एक बहुमूल्य **नूपुरांची जोडी** आहे. तिच्यावर आपला संसार थाटूं.", असा उलट कुवलयन्ला तिनें धीर दिला. पुढें तें दोघे **पांडयदेशांत मदुरेला** गेले. परंतु दुर्दैवी गैर-समजुतीनें पांडयराजाकडून निर्दोषी कुवलयन् मारिला गेला. संतप्त कण्णगीनें आपल्या पातिव्रत्यानें **मदुरा जाळून** भस्मसात् केली. पुढें **चेरराजानें** सती कण्णगीच्या स्मरणार्थ **देवालय** बांधविलें. त्याच्या उद्‌घाटनोत्सवांत सीलोनचा राजा प्रथम **गजबाहु** हजर होता असा "**महावंश**" काव्यांत उल्लेख आहे. नर्तकी माधवीची कुवलयन्पासून झालेली **मणिमेखला** नामक रूपवान् कन्या होती. आपल्या मातेच्या तोंडून स्वजन्मकथा व पित्याची हत्या ऐकून वैराग्यानें ती बुद्धभिक्षुणी झाली.

६५ **चेर** घराण्यांतील राजपुत्रानें "**नूपुरकाव्य**" व त्याचेंच सूत्र पुढें ओढून **सित्तनार**कवीनें **मणिमेखले**लाच नायिका कल्पून "**मणिमेखला-काव्य**" अशीं हीं दोन महाकाव्यें लिहिलीं गेलीं. हीं दोन्हीं काव्यें शेवटच्या **तिसऱ्या संगमान्तर्गत** समकालीन आहेत, असा "**महावंश**"टीकाकाराचा उल्लेख आहे.

६६ स्मिथ पृ. ४७२ वर, **गजबाहूचा** राज्यकाल इ. स. १७३-१९१ व टीपेंत- तिसऱ्या संगमाचाही हाच काल-असा निर्देश आहे. यावरून वरील दोन्हीं **महाकाव्यें** इ. स. १९१ नंतरच्या काळांत लिहिलीं जाण्याचा संभव आहे. अर्थात् हीं काव्यें इ. स. २०७ नंतर प्रसिद्धीस आलीं. मणिमेखलेच्या (रघु. ६, ६३) श्लेषाधारें कालिदास-काल इ. स. २०० नंतरचा येतो तो असा-

६७ वरील प्रतिपादनावरून दक्षिणेच्या पांडयराजान्तर्गत ( संगम ) विद्वत्परिषदा व त्यांच्या द्वारें बाहेर पडणारें उच्च साहित्यवाङ्मय पुरातन

कालापासून विख्यात आहे. इ. स. २०० **नंतर** (स्मिथ पृ. ४७२) **"नूपुर-काव्य"** व **"मणिमेखला पुराण"** नामक सित्तनाराचें महाकाव्य फार प्रसिद्ध होतें. कालिदासानें आपल्या दक्षिण प्रवासांत हें काव्य पाहिलें किंवा ऐकिलें असणें नितांत संभवनीय आहे. रघु. सर्ग ६, ६३-

**रत्नानुविद्धार्णवमेखलायाः । दिशः सपत्नी भव दक्षिणस्याः ।**

या श्लोकांत **मणिखचितसमुद्रमेखला- तिनें शोभणारी दक्षिणदिशा** किंवा पांडयदेशविभूषक-**मणिमेखला** या विख्यात **महाकाव्यानें शोभणारी दक्षिण-दिशा** असा जवळ जवळ **मणिमेखला-काव्याचाच** श्लेषात्मक उल्लेख केला आहे. यावरून **कालिदास इ. स. २०० नंतर झाला.**

६८ **शतकात्मक दिङ्मात्र निर्णय**- ले. ३५, कालिदास इ. स. ३०० च्या आंत झाला. ले. ६७, तो इ. स. २०० नंतर झाला. यावरून कालिदास इ. स. २००-३०० या अवधींत होऊन गेला.

६९ ले. ६७ प्रमाणें इ. स. २०० नंतर व ले. ३५ प्रमाणें इ. स. ३०० च्या आंत, म्हणजे **कालिदास तिसऱ्या शतकांत होऊन गेला.**

## प्रमाण दुसरें— श्लेषमूलक संभवनीय काळ.

७० कालिदास कधीं कधीं श्लेषाचा उपयोग करतो, हें मान्य झाल्यावर सारे श्लेष वाचकांच्या छंदानुसारीच असले पाहिजेत किंवा असतील, हें शक्य नाही. इष्ट तें श्लेष करून कवि मुक्त झाला आहे. फलावरून परीक्षा हाच मार्ग योग्य होय.

७१ तसेंच खगोलीय परिभाषेशीं कालिदासाचा परिचय होता (पहा-प्रक. ५ वें) हें पटल्यावर इतरांनीं स्वतःवरून कवीच्या खगोलीय आटोक्याचें मापन करणें अयोग्य होईल. **हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ**-हा राजमार्ग जरूर अनुसरावा.

७२ **शब्दघटित संख्यानिर्देश**- (१) कुमारसंभव-टीकेच्या अंतीं चारित्र्य-

वर्धनानें, -दृङ्नन्दमन्वन्विते (विक्रमसंवत् १४९२) असा शब्दांनीं काल दिला आहे. (२) एका महानुभावी रुक्मिणी-स्वयंवराच्या पोथींत - भैरव-इंदु-शास्त्र-क्षिति (१६१८) व श्री हर्षे-संपादित ज्ञानेश्वरीं पृ. २४ वर पोथी-लेखनकाल- बाणशैलांगभूशके (१६७५) असा शब्दघटित दिला आहे.

७३ **बिचकण्याचें कारण नाहीं**- टीकाकार, पोथीलेखक देखील जर या रीतीचा लीलेनें उपयोग करतात; तर **महाकवि कालिदासानें** तसा निर्देश केला तर बिचकण्याचें कारण नाहीं, किंवा हें असंभवी आहे अशा भ्रांतीचेंही कारण नाहीं. स्वतःला येत नाहीं तें कालिदासालाही येत नसलेंच पाहिजे, ही समजूत वेडगळपणाची ठरेल.

## मालविकाग्निमित्र.

७४ **अनुत्सेकः खलु विक्रमालङ्कारः** - या श्लेषांत विक्रमाची जशीं ओळख पटते असें तज्ज्ञ म्हणतात तसेंच - **मालविकाग्निमित्र** - या संज्ञेंत कोणता श्लेष आहे तो पाहूं-

७५ (१) मालविका + अग्निमित्र = मालविकाग्निमित्र.
यांना अनुलक्षून रचिलेलें नाटक तें मालविकाग्निमित्र- हा एक अर्थ झाला.

७६ **(२) मालविक + अग्नि + मित्र = मालविकाग्निमित्र.**

**मालविक** = मालवगणस्थितीचा; **अग्नि** = तीन (सुप्रसिद्ध);

**मित्र** = बारा (सुप्रसिद्ध). म्हणजे मालवगणस्थितीचें ३१२ वें वर्ष. या ३१२ व्या वर्षाला अनुलक्षून रचिलेलें नाटक तें मालविकाग्निमित्र. मालव-गणनेच्या ३१२ या वर्षीं कालिदासानें मालविकाग्निमित्र हें नाटक रचिलें.

७७ आरंभी (ले. १७, १९) यांत दिलेल्या शिलालेखामधील मालव-गणनेच्या निर्देशांत प्रथम शतकाचा आंकडा व नंतर वरची संख्या सांगण्याच्या सरणीप्रमाणेंच या निर्देशांत कालिदासानेंही प्रथम शतकाचा तीन ह

आंकडा सांगून नंतरच वरचा बारा हा आंकडा सांगितला आहे, हें लक्षणीय आहे.

७८ मालवगण-निर्देशपद्धतीवरून कालिदासाचें कालगुंफनाचें विशिष्ट अभिप्रेत स्पष्ट होतें व श्लेष असल्याकारणानेंच त्यांत प्रच्छन्नता असणारच.

७९ मालवगणना व विक्रमशक हे दोन्ही एकच असल्यानें ३१२–५७=२५५ इ. स. या वर्षी कालिदासानें मालविकाग्निमित्र हें नाटक रचिलें व पुढें (ले. १७९) गणितानें सिद्ध केलेल्या इ. स. २८० या वर्षी रघुवंश-लेखन चालू होतें. **एकंदरींत इ. स. २५५-२८० या पंचवीस वर्षांच्या अवधींत** कालिदासाचा लेखन-व्यवसाय चालू होता.

## चतुर्मुखी निर्णय.

(१) कालिदास इ. स. २०० नंतर.

(२) कालिदास इ. स. ३०० च्या आंत.

(३) मालविकाग्निमित्र इ. स. २५५.

(४) रघुवंशलेखन चालू इ. स. २८०.

## सारांश.

**कालिदास खिस्तोत्तर तिसऱ्या शतकांत होऊन गेला.**

# कवि कालिदास-काल.

## भाग १ ला [ब]

### प्रकरण ३ रें.

(१) कालनिर्देशाचे ससंदर्भ मूलाधार श्लोक.
(२) विवेचक टीपा.
(३) श्लोकगत सार.

(ले. ८०-११२)

टीप– कालिदासाचा खगोलपरिचय व तदनुरूप त्याची ग्रीष्मवर्णन-व्यवस्था व्यक्त करण्याकरितां लेखांक ८०, ८१, ८२, ८३, ८४ यांतील श्लोकांवरील शीर्षकें आम्हीं दिलीं आहेत. कारण कवि या नात्यानें, कालिदासानें तीं गर्भितच ठेविलीं आहेत.

## - सस्नेह सूचना -

ले. ७९ अखेर दिङ्मात्र-कालिदास-कालाचें विवेचन करून इ. स. नंतर तिसरें शतक सिद्ध केलें. आतां यापुढें लेखांक ८० पासून रघुवंशांतील अंतर्गत प्रमाणाधारें कविकालनिर्णय सुरू होत आहे. वाचकांनीं सावधान चित्तानें व निर्मल आकांक्षेनें पुढील लेखांक वाचावेत, अशी सस्नेह सूचना आहे. विषय स्पष्ट होण्याइतका विस्तार मी केलाच आहे. तो न गडबडतां पुनः वाचावा, म्हणजे शंका आपोआपच निरस्त होतील. आकृतींच्या द्वारें प्रगति सुलभ होईल, अशी दृढ आशा आहे.

संग्रहालय, ठाणें.

# प्रकरण ३ रें — भाग १ ला (ब)

## (१) कालनिर्देशाचे ससंदर्भ मूलाधार श्लोक.

### रघुवंश सर्ग १६.

८० घर्मागम - घर्मान्तापर्यन्तचा आकाशांतील स्वकक्षानिष्ठ आदित्यचार.

अथास्य रत्नग्रथितोत्तरीयम् । एकान्तपांडुस्तनलंबिहारम् ।
निःश्वासहार्यांशुकमाजगाम । घर्मः प्रिया वेशमिवोपदेष्टुम् ॥४३॥

अगस्त्यचिन्हादयनात् समीपम् । दिगुत्तरा भास्वति संनिवृत्ते ।
आनंदशीतामिव बाष्पवृष्टिम् । हिमस्रुतिं हैमवतीं ससर्ज ॥४४॥

प्रवृद्धतापो दिवसोतिमात्रम् । अत्यर्थमेव क्षणदा च तन्वी ।
उभौ विरोधक्रियया विभिन्नौ । जायापती सानुशयाविवास्ताम् ॥४५॥

८१ आदित्यचाराच्या अवधींतील ग्रीष्मान्ताचा अचेतन सृष्टीवर झालेला परिणाम.

दिने दिने शैवलवंत्यधस्तात् । सोपानपर्वाणि विमुंचदंभः ।
उद्दंडपद्मं गृहदीर्घिकाणाम् । नारीनितंबद्वयसं बभूव ॥४६॥

वनेषु सायंतनमल्लिकानाम् । विजृंभणोद्गंधिषु कुड्मलेषु ।
प्रत्येकनिक्षिप्तपदः सशब्दम् । संख्यामिवैषां भ्रमरश्चकार ॥४७॥

स्वेदानुविद्धार्द्रनखक्षतांके । भूयिष्ठसदष्टशिखं कपोले ।
च्युतं न कर्णादपि कामिनीनाम् । शिरीषपुष्पं सहसा पपात ॥४८॥

८२ आदित्यचाराच्या अवधींत
चेतन-प्राण्यांनीं केलेले शैत्योपचार.

यंत्रप्रवाहैः शिशिरैः परीतान् । रसेन धौतान्मलयोद्भवस्य ।
शिलाविशेषानधिशय्य निन्युः । धारागृहेष्वातपमृद्धिमन्तः ॥४९॥

स्नानार्द्रमुक्तेष्वनुधूपवासम् । विन्यस्तसायंतनमल्लिकेषु ।
कामो वसंतात्ययमंदवीर्यः । केशेषु लेभे बलमंगनानाम् ॥५०॥

आपिंजरा बद्धरजःकणत्वात् । मंजर्युदारा शुशुभेऽर्जुनस्य ।
दग्ध्वापि देहं गिरिशेन रोषात् । खंडीकृता ज्येव मनोभवस्य ॥५१॥

८३ आदित्यचारांतील ग्रीष्मान्तसमय.
खालील श्लोक ५२.

( निदाघावधिः- ग्रीष्मान्त । निदाघावधिना– ग्रीष्मांतानें )

मनोज्ञगंधं सहकारभंगम् । पुराणशीधुं नवपाटलं च ।
संबध्नता कामिजनेषु दोषाः । सर्वे निदाघावधिना प्रमृष्टाः ॥५२॥

जनस्य तस्मिन्समये विगाढे । बभूवतुर्द्वौ सविशेषकान्तौ ।
तापापनोदक्षमपादसेवौ । स चोदयस्थौ नृपतिः शशी च ॥५३॥

८४ 'अथ' शब्दानें नवीन प्रकरण (श्लो. ५४-७३).

अथोर्मिलोलोन्मदराजहंसे । रोधोलतापुष्पवहे सरय्वाः ।
विहर्तुमिच्छा वनितासखस्य । तस्यांभसि ग्रीष्मसुखे बभूव ॥५४॥

महत्त्वाच्या टीपा अवश्य.

८५ पूर्वोक्त ग्रीष्मवर्णनाचें श्लोकगत सार देण्यापूर्वी खालील प्रश्नांवर कांहीं अर्थबोधक टीपा अवश्य आहेत. जसें–(१)श्लो. ४३, घर्म; (२)श्लो ४४, उद-गयननिवृत्ति; अयन-निवृत्ति; (३) अगस्त्यचिन्ह; (४) समीरं; (५) उत्तर-

दिशेचा आनंद, (६)श्लो. ४५, परमगुरुलघु दिनरात्र; (७)श्लो. ५२, ग्रीष्मान्त-निर्देश; (८)श्लो. ५३, पौर्णिमा-निर्देश; (९)श्लो. ५४-७३, जलक्रीडा.

## १ ली टीप- घर्म म्हणजे घर्मप्रसवी ग्रीष्म.

८६　श्लो. ४३– घर्म-प्रसवी ग्रीष्म आला. **आधार**- पूर्वमेघ श्लो. ६१– " बा मेघा, घर्म-समयीं प्राप्त झालेल्या तुला त्या सुरयुवति बांगड्यांनीं टोंचून यंत्रधारागृह बनवितील."– या वर्णनावरून घर्म शब्दानें चौफेर जलधारांची आकांक्षा निर्माण करणारा घर्म-प्रसवी ग्रीष्मच सूचित होतो. म्हणून आम्हीं हाच अर्थ वर दिला आहे व ले. १६६ मधील आकृतींत **२ रा सूर्य श्लो.** ३– असें तत्कालीन सूर्याचें स्थानही दाखविलें आहे.

## २ री टीप- उदगयननिवृत्ति व अयननिवृत्ति.

८७　श्लो. ४४, **उदयननिवृत्ति = परमोत्तरीं आगमन.**



आकृति १

उदगयननिवृत्ति म्हणजे परमोत्तरीं आगमन– या अर्थाची सिद्धि अशी- आकृति १ पहा. डावीकडे NORTH जवळचा D बिंदु पहा. तो G बिंदूपासून परमउत्तरेकडे म्हणजे **परमोत्तरीं** स्थित आहे. ABCD या मार्गानें गेलेला सूर्यही D बिंदूला पोंचलेला दाखविला आहे. अर्थात् **सूर्यही परमोत्तरीं** पोंचला आहे. या परमोत्तरींच्या D बिंदूला पोंचतांच सूर्याच्या उत्तर अयनाची समाप्ति होते व तो दक्षिणाभिमुख होतो, हें आकृतीमध्यें त्यांच्या अंतर्वलनावरून स्पष्ट दिसतें. यावरून–

८८ **परमोत्तरीं आगमन** = उत्तर अयनाची समाप्ति.
= उदगयन-निवृत्ति.

अशी पारिभाषिक सिद्धि होते. तसेंच अयनाची समाप्ति = अयन-निवृत्ति हेंही स्पष्ट हीतें. हे **खगोलीय पारिभाषिक** शब्द आहेत. तें **साहित्य-वाङमया-**मध्यें कधीही या स्वरूपांत **येत नाहींत**, हें पूर्ण ध्यानांत ठेवावें.

## ३ री टीप- अगस्त्यचिन्ह.

८९ श्लो. ४४, **साहित्यदृष्टया**– दक्षिणा-रूपीं सपत्नीकडे गेलेला आपला पति(सूर्य)उत्तरेला परत प्राप्त झाला म्हणून उत्तरेनें सानंद हिमाश्रु गाळले. **प्रोषितप्रियासमागमसमाधिः**- उत्तरेशीं सूर्याचा समागम झाला, या मल्ली-नाथाच्या स्पष्टीकरणानें तर सूर्य परमोत्तरीं आला, हाच अर्थ साधार स्पष्ट होतो. समागम झाला = पूर्ण उत्तरेला आला हेंही युक्तच आहे.

९० **खगोलदृष्टया**– या दृष्टीनें देखील, झुकतां झुकतां (ल्यब्लोपेपंचमी– या नियमानें अगस्त्यचिन्हात् म्हणजे) अगस्त्यबिंदूप्रत पोंचून सूर्य (अयनात् निवृत्तः ) अयन-निवृत्त झाला म्हणजेच अगस्त्यबिंदूवर तो सूर्य परमोत्तरीं आला, हाच अर्थ होतो. आकृतीद्वारा खालील विवरण पहा.

९१ **विवरण**– आकृति १ पहा उजवीकडे E अगस्त्यतारा, ED लंबसूत्र. तें D बिंदूवर टेकतें. म्हणून D **बिंदु = अगस्त्यचिन्ह** होय. D या अगस्त्य-चिन्हाला पोंचलेला सूर्यही आकृतींत दाखविला आहे. D हा परमोत्तर बिंदु आहे, हें ले. ८७ मध्यें आलें आहे. अर्थात् D बिंदूवरील अगस्त्यचिन्ह व सूर्य हीं दोन्हीं परमोत्तरीं आहेत. यायोगें अगस्त्यबिंदूला पोंचून सूर्य परमोत्तरीं आला, हा अर्थ पूर्ण स्पष्ट होतो. याचेंच– अगस्त्यचिन्हाप्रत पोंचून सूर्य अयननिवृत्त झाला– हें पारिभाषिक रूपांतर श्लो. ४४ मध्यें शब्दशः दिलें आहे. (पहा, वरील ले. ८८, परमोत्तर = उदगयननिवृत्ति.)

९२ **एकवाक्यता**– " सूर्य परमोत्तरीं आला " या एका मुख्य बाबतींत खगोल व साहित्य या दोहोंत पूर्ण एकवाक्यता आहे.

९३ **मतभेद**- परमोत्तरीं आलेला सूर्य कोणता ? यांत **मतभेद** आहे, **साहित्य म्हणतें**- दक्षिणेकडून परतलेला सूर्य (परमोत्तरीं आला.)
**खगोल म्हणतो**- अगस्त्यबिंदूला पोंचलेला सूर्य (परमोत्तरीं आला)

## आकृतिद्वारा मतभेदनिरास.

९४ इत्यर्थ इतकाच कीं,- **अगस्त्यचिन्ह** या शब्दाच्या अर्थातच फक्त मतभेद आहे. म्हणून त्याचा खुलासा अवश्य आहे. आकृ. १ पहा. E अगस्त्य तारा, त्याचें चिन्ह D, तसेंच त्या अगस्त्यचिन्हाला पोंचलेला सूर्य, दोहोंची परमोत्तरीं स्थिति व अगस्त्यचिन्हावरची उदगयननिवृत्ति- इत्यादि अगस्त्य-चिन्हासह सर्व तपशील आकृतींत दिसतात. म्हणून- " अगस्त्यबिंदूला पोंच-लेला सूर्य " (परमोत्तरीं आला) हा खगोलीय अर्थ संपूर्ण दृश्य व उपपन्न आहे. **टीकाकार**- अगस्त्यचिन्ह याचा पारिभाषिक अर्थ विदित नसल्यामुळें टीकाकारांनीं- अगस्त्यचिन्ह = दक्षिण असें कल्पून केलेला- दक्षिणेकडून परतलेला सूर्य- हा त्यांचा अर्थ अनुपपन्न आहे. पहा ले. १३६, १३७ व प्रकरण १६ वें. योगतारा या पारिभाषिक शब्दाचा, परिचयाभावीं केलेला टीकाकारांचा अनुपपन्न अर्थ ले. १२० यांत पहा. तसाच -अगस्त्यचिन्ह- या असाहित्यिक शब्दाचा पारिभाषिक अर्थ टीकाकारांना कळणार तरी कसा ? म्हणून त्यांनीं (पहा ले. २५८) दक्षिण असा अर्थ ओढाताणीनें जुळविला. अगस्त्यचिन्ह = दक्षिण हा अर्थ होतच नाहीं. पहा-

९५ **कां अनुपपन्न**- दक्षिणावर्तनाथ व हेमाद्रि (ले. २४३-२४४) स्पष्ट सांगतात कीं- **अगस्त्यचिन्हात्** - यांत स्त्रीलिंगनिर्देश नसल्यानें सपत्नीचा प्रश्नच येत नाहीं. त्यामुळें सपत्नीला (दक्षिणेला) टाकून आपणांकडे सूर्य आला ही कल्पना **निराधार** आहे. अर्थात् अगस्त्यचिन्ह = दक्षिण हा अर्थ पूर्वोक्त टीकाकारांच्या मतानेंच चूक आहे. हा अर्थ चूक ठरल्यायामुळें उत्तरेच्या आनंदाचेंही हें कारण होऊं शकत नाहीं.

## अगस्त्यचिन्ह = अगस्त्यासारखा, हा अर्थही चूकच.

९६ **दुसरें**- अगस्त्यासारखा गेला तरी अगस्त्य परतला नाहीं, पण आपला

पति (सूर्य) परतला म्हणून तिला आनंद झाला या पूर्वोक्त टीकाकारांच्या कल्पनेंतही अनुचितार्थ दोष येतो (पहा ले. १३८). म्हणून अगस्त्य-चिन्ह = दक्षिण किंवा अगस्त्यचिन्ह = अगस्त्यसदृश – हे दोन्ही अर्थ अनुपपन्न आहेत. कारण **चिन्ह = सदृश असा अर्थ कोठेंही नाहीं**. हे दोन्हीं अर्थ चूक, त्यामुळें उत्तरेचा आनंदही सकारण ठरत नाहीं.

## सारांश– अगस्त्यचिन्ह = D बिंदु

अगस्त्यचिन्ह = दक्षिण, हा चारित्र्यवर्धन व मल्लीनाथांचा अर्थ अनुपपन्न आहे, असें स्वतः दक्षिणावर्तनाथ व मक्कीभट सांगतात.

तसेंच चिन्ह = सदृश, हा दक्षिणावर्तनाथ व मक्किभट यांचा अर्थ अनुपपन्नच आहे. कारण चिन्ह = सदृश, हा अर्थ कोणत्याही काव्यांत किंवा कोशांत नाहीं. अर्थात् हे दोनी अर्थ (खरा अर्थ लागेना म्हणून) कल्पित आहेत. म्हणून अगस्त्यचिन्ह म्हणजे (ले. ८७) **आकृतींत स्पष्ट दिसणारा D बिंदु हा एकच उपपन्न अर्थ शिल्लक राहतो.**

## टीप ४, ५– **समीपं** व आनंदाचें उपपन्न कारण.

१७ वरील दोन्ही कारणांनीं उत्तरेला आनंद झाला नाहीं, तर मग उत्तरेला आनंद कशानें झाला ? श्लो. ४४ तील– समीपं संनिवृत्ते व आनंदहिमाश्रु यांतील ससंदर्भ शब्दशः अर्थांतील रहस्य– ले. ५ यांतील दृष्टांताच्या पंचकात सांगितल्याप्रमाणें (१) कुशराजा अयोध्येला पोंचून उत्तर-संचार-निवृत्त झाला म्हणून अयोध्येला जसा आनंद झाला, हुबेहूब तसाच (२) आपल्या स्वतःला पोंचून सूर्य उत्तर-संचार-निवृत्त झाला म्हणून (अयोध्येप्रमाणें) व उत्तरेला आनंद झाला, हें उपपन्न कारण आहे. या अभि-प्रायाचा मूलाधार –मामभ्युपैतुं कुलराजधानीम्– १६, २२ व अभिव्यक्त-मुखप्रसादा– १६, २३ यांतील मामभ्युपैतुं = मत्समीपं संनिवृत्ते, आणि मुखप्रसाद = आनंदहिमाश्रु, या साम्याच्या कल्पनेनें अयोध्येशीं उत्तर दिशेचें साम्य दृष्टांतानें साधून त्यांच्या समान आनंदाचें वर्णन कवीनें केलें आहे. (अधिक खुलाशाकरितां पहा ले. १६५)

## ६ वी टीप – परम-गुरु लघु दिनरात्र.
## (उदगयननिवृत्तीचा तात्कालिक परिणाम)

९८ श्लोक ४५– सूर्य परमोतरीं आलेल्या दिवशीं दिनमान– परम दीर्घ दिवस व परम लघु रात्र– अशा प्रकारचें असून तो दिवस जून २१ असतो, हें बालगोपालानांही विदित आहे. त्यांच्या भूगोलांतही हा निर्देश असतो. कालिदासाचा – **दिवसः व क्षणदा** – हा एकवचनी प्रयोग सशास्त्र आहे. तसेंच – **अत्यर्थम् एव तन्वी** = परम लघु रात्र, हें कथनही सुसंगतच आहे.

९९ तसेंच (१) उत्तरेकडे होणारी अयन-निवृत्ति. (२) हिमस्रावकाली होणारी अयन-निवृत्ति. (३) परम तन्वी रात्र करणारी अयन-निवृत्ति– ही सदैव उदगयन-निवृत्तीच असते. या तत्त्वांना अनुकूल असे नेमके–(१)उत्तरा-समीपं, (२) हिमस्रुति, (३) परम तन्वी रात्र– हे तीन्ही निर्देश, ४४-४५ या श्लोकांत येऊन गेले आहेत. यावरून उदगयन-निवृत्ति किंवा परमोत्तरीं आगमन दृढतम होते व ४४, ४५ हे श्लोक एकाच घटनेचें द्योतक असून ते परस्पर पूरक आहेत, हें सिद्ध होतें.

१०० श्लोक ४४-४५ हे दोन्ही श्लोक परस्पर पूरक आहेत. परमोत्तर-प्रापण व परमगुरुलघु दिनरात्र यांचा निकटतम संबंध आहे.

## ७ वी टीप- ग्रीष्मान्ताचा स्पष्ट निर्देश.
## ( अवधिः अन्तः । निदाघावधिः = ग्रीष्मान्तः । )

१०१ श्लो. ५२– श्लो. ४३, ४४, ४५ या तीन श्लोकांत घर्मागमापासून परमोत्तर-प्रापणापर्यंतचा स्वकक्षानिष्ठ आदित्यचार कवीनें वर्णिला. त्यांतच ग्रीष्मान्त सूचित होतो, म्हणून **कांहीं साहित्यपटु**– ग्रीष्मान्त सूचित झाल्यावर पुढील श्लो. ४६ पासूनचें ग्रीष्मवर्णन विसंगत ठरतें, असें म्हणतात. त्याचा **निरास**– हें विधान चूक आहे, कारण– " सूर्य आकाशांतील ग्रीष्मान्त बिंदूला पोंचला "– असे (श्लो. ४४, ४५) **तात्त्विक विधान** करून पुढें लागलींच श्लो. ४६-५३ यांत क्रमानें कविसंकेताचें ग्रीष्मवर्णन करीत करीत

कवि पुनः नेमका (निदाघावधि म्हणजे) ग्रीष्मान्तापर्यन्त गेला आहे. श्लो. ४४ तील विधानाच्या सूत्रावरच कालिदासानें ४६-५३ ग्रीष्मान्तापर्यन्तच्या श्लोकांचीं फुलें रचून ग्रीष्मवर्णनाची माला गुंफिली आहे, ती अत्यन्त सुसंगत आहे.

कवीला केवळ ग्रीष्मान्त-विधानच करावयाचें नव्हतें तर त्या विधानावर आधारलेलें ग्रीष्मवर्णन करावयाचें होतें, हें ४६-५३ या स्वतंत्र श्लोकांनींच स्वतः कवीनें स्पष्ट दाखविलें आहे नां ? साहित्यपटूंच्या हें लक्षांत कसें आलें नाहीं ? श्लो. ४४ तील ग्रीष्मान्तविधानालाच ते ग्रीष्मवर्णन कसें समजले ? याला साहित्यपांटव कसें म्हणावयाचें ?

## टीकाकारांचें विवरण.

शिवाय ४४ व्या श्लोकानंतर प्रस्तुतच्या याच ५२ व्या श्लोकांतील – निदाघावधिना याच्या – निदाघस्य अवधिः अंतः यस्मिन् स ग्रीष्मः तेन कर्त्रा सर्वे संतापकरत्वादयो दोषा प्रमृष्टाः । – या **मल्लिकभट** आणि **हेमाद्रि** यांनीं केलेल्या ग्रीष्मान्तविषयक स्पष्टीकरणावरून व ५३ व्या श्लोकांतील शेवटीं– **तस्मिन् विगाढे समये** = ग्रीष्मसमाप्तिकालीं पौर्णिमेचा चंद्रच अधिक उपयुक्त ठरला. या वर्णनावरून ५२ व्या श्लोकांत जो निदाघावधिना असा ग्रीष्मान्ताचा पुनः एकदां स्पष्ट निर्देश आला आहे, याचा अर्थ स्पष्टच आहे कीं, ४३, ४४, ४५ श्लोकोक्त आदित्यचाराच्या अवधींत घर्मागमापासून ग्रीष्मान्तापर्यंत घडून आलेल्या, सृष्टीवरील परिणाम व उपचार, यांचेंच वर्णन ४६ व्या श्लोकापासून पुढें क्रमानें ५३ व्या श्लोकापर्यंत कालिदासानें केलें आहे. ४३-४४ व्या श्लोकांत आकाशांतील ग्रीष्मांतापर्यंतची सूर्याची स्थिति वर्णिली तर ४६-५३ या श्लोकांत ग्रीष्मांतापर्यंतची भूपृष्ठावरील चेतनाचेतनांची परिस्थिति वर्णिली– यांत विसंगततेला तिळभरही जागा नाहीं.

## टीकाकारांचा द्राविडी प्राणायाम.

**मल्लिकभट** व **हेमाद्रि** यांनीं- निदाघाचा अंत ज्यांत आहे, अशा ग्रीष्मानें-

असा निष्कारण द्राविडी प्राणायाम केला आहे. कारण त्यांच्या बहुव्रीही-विग्रहानेंही– **अन्तर्चिन्हित ग्रीष्म** –म्हणजे ग्रीष्मान्त हाच अर्थ सिद्ध होतो. असा द्राविडी प्राणायाम करण्यापेक्षां– **निदाघस्य अवधिः अन्तः**– निदाघान्तः म्हणजे मराठी ग्रीष्मान्त असा सरळ अर्थ होतो.

## "बभूव" वगैरे भूतकालिन क्रियापदें.

१०२ **ग्रीष्माचा परिणाम**– श्लो. ४६ मध्यें, पायरी पायरीनें पाणी आटूं लागलें आहे– असा निर्देश न करितां पुष्करिणीचें पाणी– **नितंबद्वयसं बभूव** – म्हणजे नितंबाला पोंचेल इतकेंच उरलें. – या निर्देशांत ग्रीष्माचा परिणाम स्पष्ट आहे, याप्रमाणें ४६-५३ पर्यंतच्या सर्व श्लोकांत **भूतकाल-प्रयोगानें ग्रीष्माचा परिणामच वर्णिला आहे**, हें स्पष्ट आहे.

## ८ वी टीप – पौर्णिमानिर्देश.

१०३ **श्लो. ५३**– उदयस्थशशी यावरून प्रस्तुत वर्णन आषाढप्रतिपदा ते पौर्णिमेपर्यंतचें असेल असें वाटतें.

## ९ वी टीप – कुमुद्वतीच्या भावी प्राप्तीकरितां प्रकरणान्तर; जलक्रीडा.

१०४ **श्लो. ५४**– 'अथ' शब्दानें ५४ व्या श्लोकापासून कवीनें नवीन प्रकरण सुरू केलें आहे. महाकाव्यांत जलक्रीडेचें वर्णन अवश्य असतें. या नियमाला अनुसरून हें जलक्रीडेचें वर्णन आलें आहे. म्हणून ग्रीष्मकालांतच सुखकर अशा उपर्युक्त **ग्रीष्माच्या अवधींतीलच स्वेच्छानुसार केलेल्या कुश-राजाच्या** कोणत्या तरी एका जलक्रीडेचा वर्णनप्रसंग येथें आला आहे. तो प्रसंग ५४ पासून ७३ व्या श्लोकापर्यंत अखंड विस्तारला आहे. या नवीन प्रकरणाचा रोख कुमुद्वतीच्या भावी प्राप्तीकडे आहे, ग्रीष्मवर्णनाकडे नाहीं, हें दाखविण्याकरितांच कवीनें " **अथ** " असा आरंभ केला आहे.

## ग्रीष्मवर्णनांतील श्लोकगत सार (मराठींत).

१०५ अयोध्येला तिची पूर्वींची समृद्धावस्था प्राप्त करून दिल्यानंतर कुशराजा अयोध्येंत स्थिरस्थावर होऊन राज्य करूं लागला; असें सर्ग १६, श्लोक १-४२ यांत वर्णिलें. त्यानंतर घर्म आला,

१०६ घर्मागम – घर्मान्तापर्यंतचा आकाशांतील
स्वकक्षानिष्ठ आदित्यचार.
ग्रीष्मागम व ग्रीष्मान्त यांचें विधान.

४३ – घर्म-प्रसवी ग्रीष्म आला.

४४ – झुकतां झुकतां (ल्यब्लोपे पंचमीविधानात्), अगस्त्य-चिन्हाप्रत पोंचून सूर्य अयननिवृत्त झाला. (असलें विधान साहित्यांत कधींही येत नाहीं, इकडे लक्ष द्यावें.)

४५ – त्या दिवशीं, दिवस परम दीर्घ व रात्र परम लघु होती.

१०७ आदित्यचाराच्या अवधींतील ग्रीष्माचा
अचेतन सृष्टीवर झालेला परिणाम.
(येथून कविसंकेताचें ग्रीष्मवर्णन सुरूं)

४६ – पुष्करिणीचें पाणी नितंबाला पोंचेल इतकेंच उरलें.

४७ – भृंगदेखील मकरंदपानार्थ (दिनान्तरम्य) सायंकाळीच बाहेर पडूं लागले.

४८ – कानांवरून निसटलेलीं शिरीषकुसुमें घामामुळें गालालाच चिकटून बसण्यापर्यंत पाळी आली.

१०८ आदित्यचाराच्या अवधींतील
चेतन-प्राण्यांनीं केलेले शैत्योपचार.

४९ – श्रीमंत लोक चंदनलिप्त शिलातलावर बसून चौफेर

जलयंत्रांतील तुषारांचा आश्रय करूं लागले.

५० – स्त्रिया देखील शैत्यास्तव सायंस्नान करून केशभूषा सजवूं लागल्या.

५१ – अर्जुन-मंजरीनें देखील तांबसर रज:कणांचा शैत्योपचार केला.

१०९ आदित्यचारांतील ग्रीष्मान्तसमय.

५२ – ग्रीष्म-समाप्ति-समयानें शीधु व आम्रमंजरी यांच्याशीं नवपाटल-कुसुमांची जोड करून देऊन आपण दोष-मुक्त झाला. (आपण = ग्रीष्मान्त)

५३ – तरी शेवटीं, ग्रीष्मान्तसमयीं उदयस्थ-शशीच उपयुक्त ठरला.

## ग्रीष्मवर्णन संपलें.

श्लो. ४३ घर्मागम-विधान आणि श्लो. ४४ ग्रीष्मान्त-विधान यांवर आधारलेलें कविसंकेतित ग्रीष्मवर्णन श्लो. ५३ अखेर संपलें.

११० आतां नवीन प्रकरण.

श्लो. ५४- – भावी कुमुद्वती-प्राप्तीच्या रोखानें सुरूं केलेलें जलक्रीडेचें प्रकरणांतर.

## सुसंगत ग्रीष्मवर्णन.

१११ याप्रमाणें खगोल व साहित्य या दोन्ही दृष्टीनें प्रस्तुत कविकृत ग्रीष्मवर्णन अत्यंत सुसंगत आहे. कोठेंही विसंगति नाही– हें वरील श्लोकगत सारांशावरूनच स्पष्ट आहे. ४४, ४५ श्लोकांतील अगस्त्यचिन्ह– वगैरे पारिभाषिक शब्दांच्या, महाकवीला शोभेल, अशा नि:संदिग्ध प्रयोगानें काव्यसंपत्तीत उज्ज्वल भर पडली आहे. दृष्टांतद्वारा खगोलीय यथार्थ घट-

नेच्या निर्देशानें एकीकडे कवीची उत्तुंग प्रतिभा तर दुसरीकडे रसवर्धक मिश्रण-चातुर्य व्यक्त होत आहे. नियत शब्दप्रयोगामुळें कोठेंही कांहींही गृहीत धरावें लागत नाहीं, हा कवीचा कौतुकास्पद काव्यपराक्रम आहे. प्रस्तुत श्लोकांत टीकाकारांनीच (ले. १३३) कोडें निर्माण केलें आहे. शिवाय **अगस्त्यचिन्ह = दक्षिण** या टीकाकारांच्या कल्पित अर्थानें (टीप १ पहा) कवीच्या पदरीं (ले. २६३) काव्यदारिद्रय येतें. कवीच्या सहेतुक दिवस व रात्र (श्लो. ४५) या एकवचनी प्रयोगांतून (ले. ११३)–"**कित्येक दिवस व रात्री**" या निराधार बहुवचनी अर्थानें सांप्रतचे पदवीधरही रसभंग (ले. १९४) करीत आहेत. कालिदासानें सुचविलेल्या खगोलीय अर्थानेंच ४४ व्या श्लोकामधील उत्तरेच्या आनंदाचें रहस्य (ले. ९७) व अगस्त्यचिन्हाच्या स्पष्ट निर्देशानें (ले. १७०) कालिदास-कालाचें अपूर्व गमक हस्तगत होतें. सारांश **वराहमिहिराच्या** ग्रंथांत खगोल व काव्य, तर कालिदासाच्या कृतींत काव्य व खगोल यांची बहार आहे– हीच तुलनात्मक प्रशंसा शोभणारी आहे.

११२ टीप– कालिदासाला "**दक्षिणदिशा**" अभिप्रेत असती तर–

**अगस्त्यचिन्हात् अयनात् समीपम् ।**

या ऐवजीं

**उदग्विरुद्धात् अयनात् समीपम् ।**

असा सरळ प्रयोग त्याला सहज करतां आला असतां. म्हणून प्रस्तुत स्थलीं कवीला दक्षिणदिशा अभिप्रेत नाहीं, हें स्पष्ट आहे.

## कवि श्रीमंत आहे.

**आतां मौज पहा**- टीकाकारांचा **अगस्त्यचिन्ह = दक्षिण,** हा अर्थ घेतला तर– "**उदग्विरुद्धात् अयनात्**"–असा साधा सरळ दक्षिणदिशा-बोधक प्रयोग कालिदासाला करतां आला नाहीं, हें काव्यदारिद्रय टीकाकारांच्या अर्थानें कवीच्या पदरीं येतें.

खगोलीय अर्थानें **कालिदास श्रीमत्तर होतो.**

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# भाग २ रा

# परिभाषा-विभाग

प्रकरण ४ ते ९.

(ले. ११२-१८०)

## प्रमुख सूत्र.

१. रघु. सर्ग १६, श्लो. ४४, प्रथम पंक्ति – **अगस्त्यचिन्हात्, अयनात् संनिवृत्ति** – हे सारे शब्द केवळ पारिभाषिक आहेत.

२. एखाद्या खगोलवेत्त्यानें करावा असाच त्या पंक्तींतील प्रयोग कालिदासानें अनुवादिला आहे. (पहा- प्रक. ८ वें).

३. **अगस्त्यचिन्ह, रेवतीचिन्ह,** असले प्रयोग साहित्यांत कधींही येणार नाहींत, आलेलेही नाहींत.

४. **अयनात् संनिवृत्तः** –असा जोड शब्दही साहित्यांत नाहीं.

५. खगोलवेत्ता जर त्या शब्दांची पारिभाषिकता निःसंदिग्ध प्रमाणांनीं सिद्ध करूं शकतो व त्याबरोबच साहित्यिक अर्थांतील अप्रस्तुतता किंवा कृत्रिमता सहज दाखवूं शकतो, तर त्याचा नीट विचार करणें सुज्ञांना भाग आहे. निष्कारण टीकाकारांचा अर्थच उगाळीत बसून– **अल्पस्य हेतोर्बहु हातुं** –याला बळी पडण्यांत काय अर्थ आहे ? खगोलीय संदर्भानें कवीची प्रतिभा अधिक तेजस्वी दिसते.

६. खगोलीय अर्थ पटावा म्हणूनच हा स्वतंत्र परिभाषा-विभाग करून विस्तृत टीपा, विवेचन, आकृति वगैरे दिले आहेः

७. **वाचकांनीं हें सर्व शांत चित्तानें वाचावें, अशी विनंति.**

## प्रकरण ४ थें. श्लो. ४४, केवळ पारिभाषिक.

### त्यांतील सर्वही शब्द असाहित्यिक.

#### टीकाकारांचा अपरिचय व अर्थभेद.

(१) अगस्त्यचिन्हादयनात् समीपं, दिगुत्तरा भास्वति संनिवृत्ते ॥४४॥

(२) अत्यर्थमेव क्षणदा च तन्वी ॥४५॥ (एकच अहोरात्र)

११३ वरील ४५ व्या श्लोकांतील– **अत्यर्थम् एव** = परम, असा स्पष्ट (ले. १९४) अर्थ आहे, यावरून परमलघु रात्र हा अर्थ खगोल व साहित्य या दोन्ही दृष्टचा वादातीत आहे. " कित्येक दिवस व रात्री अति मोठे व लहान झाल्या " हा सामान्य बहुवचनी अर्थ कवीला उद्दिष्ट असता तर, **रामायण** ३, १२, १६– **लक्ष्मणाप्रमाणें**–

**शीतवृद्धतरायामाः त्रियामाः यांति सांप्रतम् ।**

असा **बहुवचनी** प्रयोग कालिदासाला अशक्य नव्हता, हें लक्षांत घेतां, कवीच्या एकवचनीं प्रयोगावरून, एकच परम दीर्घ दिवस आणि एकच परम लघु रात्र कवीला अभिप्रेत आहे, हें स्पष्ट आहे. (पहा– ले. १९२-१९४)

११४ एकच परम तन्वी रात्र म्हणतांच जून २१ आठवते व जून २१ च्या बरोबरच परम दीर्घ दिवस व त्याला त्याच क्षणीं कारणीभूत कर्कवृत्तावरील रवीचें परमोत्तरीं आगमन डोळचांपुढें उभे राहतें. म्हणून श्लो, ४५ च्या पूर्वी ४४ व्या श्लोकांत परमोत्तरींचा म्हणजे अयननिवृत्तीचा निर्देश असेल तर एकच परम दीर्घ दिवस व एकच परम लघु रात्र हा उल्लेख खरा; नसेल तर मात्र सामान्य बहुवचनी अर्थ काव्यदृष्टचा घेतां येईल. परंतु ४४ व्या श्लोकांत– अगस्त्यचिन्हावर सूर्य अयन-निवृत्त झाला– असा शुद्ध खगोलीय पारिभाषिक शब्दांत स्पष्टतम निर्देश आहे. अर्थात् सूर्य परमोत्तरीं आल्यानें त्या एकाच दिवशीं परमगुरुलघु दिनरात्र ही परिभाषा शब्दशः सत्य, यथार्थ व उपपन्न आहे. कित्येक दिवस आणि रात्री हा अर्थ

चूक आहे. या चुकीच्या अर्थाबद्दल आग्रह कशासाठीं ?

## उदाहरण.

११५ पारिभाषिक अपरिचयामुळें टीकाकारांनीं या ४४ व्या श्लोकाचा अप्रस्तुत अर्थच दिला, याचें स्पष्ट उदाहणच देतों.

## अप्रस्तुतता पहा.

**टीकाकारांची** अर्थ-साधना— **अयन** = दक्षिण किंवा उत्तर या दोन अयनांपैकीं एक, हा अमरकोशांतील पारिभाषिक अर्थ टीकाकारांच्या पूर्ण परिचयाचा होता तरी परंतु, या पारिभाषिक शब्दाशीं संलग्न झालेल्या— **संनिवृत्ते** – या शब्दाचा, ले. १२८ यांत दिलेला पारिभाषिक अर्थ त्यांना परिचित नव्हता. त्यामुळें – **अयनात् संनिवृत्ते** – या पारिभाषिक जोड शब्दाचा अर्थ उमगला नाहीं. आतां – **अगस्त्यचिन्हात्** -- यांतील मूळ शब्द **अगस्त्यचिन्ह** – हा शब्द तर (नक्षत्रसंलग्नचिन्ह-शब्द खगोलांत जसा सदैव येतो तसा) साहित्यक्षेत्रांत कधींच न येणारा, अर्थात् त्यांचा अर्थही त्यांना पूर्ण अपरिचितच होता. तात्पर्य, अयन या एकाच शब्दाचा पारिभाषिक अर्थ समजला तरी पूर्ण वाक्याचा पारिभाषिक अर्थ लागेना, म्हणून ते अप्रस्तुत अर्थाकडे वळले. कारण संनिवृत्त याचा साहित्यिक अर्थ 'परतला' असा होतो. याला अनुलक्षून अयनात् = मार्गात् असा अर्थ लावला तर, त्यायोगें मार्गापासून सूर्य परतला, इतका साहित्यिक अर्थ जुळतो. यापुढें, उत्तरेला आनंद झाला. तिला आनंद व्हावयाचा तर, सूर्य कोणत्या मार्गापासून परतला पाहिजे ? याचें उत्तर, दक्षिणमार्गापासून. यापैकीं मार्गापासून याला मूळांतच अयनात् हा शब्द आहे. बाकी उरला दक्षिण. दक्षिण याला मूळांत शब्द कोणता ? याचें उत्तर, अगस्त्यचिन्ह, हा बाकी उरलेला शब्द. त्याचा अर्थ दक्षिण कसा ? उत्तर— अगस्त्य हा दक्षिणेंत राहतो, म्हणून अगस्त्यचिन्ह म्हणजे दक्षिण असा अर्थ झाला. याप्रकारें टीकाकारांनीं ४४ व्या पारिभाषिक श्लोकाचा साहित्यिक अर्थ तयार केला. या अर्थांत निःसंशय चातुर्य आहे. या चातुर्याबद्दल त्यांना शतशः वंदन ! परंतु बृ. सं.

पृ. ६६ वरील– **ग्रन्थोऽन्यथाऽन्यथार्थम्**– हा दोष वरील अर्थात आला आहे. कारण ग्रंथार्थ एक तर टीकाकारांचा अर्थ भलताच होऊन बसला आहे.

## या अर्थातील अयन = मार्ग ही मूलभूत चूक.

परंतु कालिदासानें - मार्ग - या अर्थी - अयन - हा शब्द कोठेंही योजिलेला नाहीं. कालिदासाच्या तत्सम दुसऱ्या उक्तीचा आधारही टीकाकारांनीं दिलेला नाहीं. केवळ, अयन = मार्ग हा अर्थ कोशांत तरी सांपडतो नां– म्हणून त्यांनीं तो अप्रस्तुत अर्थ दिला. एका शब्दाच्या अप्रस्तुत अर्थाबरोबर बाकीचे अप्रस्तुत अर्थ ओघानेंच त्यांना घ्यावें लागले. **उत्तरा– या स्त्रीलिंगाप्रमाणें** –अगस्त्यचिन्हा– असें मूळांत स्त्रीलिंग नाहीं, याकडेही त्यांना कानाडोळा करावा लागला आहे.

मार्ग हा अर्थ कालिदासाला उद्दिष्ट असता तर शिशुपालवध, सर्ग ३ श्लो. १ प्रमाणें–

**कौबेरदिग्भागमपास्य मार्गं .... आगस्त्यम् ।**

असा प्रयोग कालिदासाला सहज करतां आला असता. पण त्यानें अयन हा शब्द वापरला आहे. यावरून कालिदासानें अयन हा शब्द प्रस्तुत स्थळीं साहित्यिक अर्थानें न वापरतां पारिभाषिक अर्थानेंच योजिला आहे, हें स्पष्टतम आहे. त्याचा पारिभाषिक संबंध ' संनिवृत्ते ' याच्याशी आणि ' संनिवृत्ते ' याचा पारिभाषिक संबंध 'अगस्त्यचिन्ह' याच्याशीं - याप्रमाणें ४४ वा श्लोक, प्रथम पंक्ति ही संपूर्ण केवळ पारिभाषिक शब्दघटित आहे, हें (ले. ११३-११४) वादातीत आहे. म्हणून त्या पंक्तीचें विवरण व अर्थ हीं दोन्हीं पारिभाषिक संदर्भानेंच केली पाहिजेत, हेंही वादातीत आहे. साहित्यिक अर्थ करण्यांत तथ्य नाहीं.

## सारांश.

अयनात् म्हणजे मार्गात् हा टीकाकारांचा अर्थ अगतिकत्वामुळें आला आहे. कारण अगस्त्यचिन्ह = दक्षिण हा अर्थ कवीला अभिप्रेत नाहीं, हें

ले. ११२ यांत स्पष्ट सिद्ध केलें आहे.

कवीच्या प्रस्तुत खगोलीय अनुवादांत, ले. ८७, आकृति १ मधील E या अगस्त्यताऱ्याचें NORTH जवळील D बिंदु, हें प्रत्यक्ष अगस्त्यचिन्हच प्रतीत होतें, हें ले. ९१, ९६ यांत स्पष्ट केलें आहे. अगस्त्याचें चिन्ह तें अगस्त्यचिन्ह; त्या चिन्हापासून म्हणजे त्या चिन्हाला पोंचून– हेंही त्याच आकृतीतरून स्पष्ट होतें. (खालील टीप पहा.)

**टीप**– कवीच्या प्रस्तुत वाक्याला आम्ही खगोलीय अनुवाद असें म्हणण्याचें कारण, खगोलसिद्धांतातीलच तें पारिभाषिक वाक्य आहे. त्याचाच कवीनें अनुवाद केला आहे, हें पुढील प्रकरणांत आपोआपच स्पष्ट होणार आहे.

काव्यांत खगोल कां आला– याचें उत्तर पुढें स्वतंत्र व सुसंगत प्रकरणांत येणारच आहे, तोंपर्यंत वाचकांनीं धीर धरावा.

## कालिदास वापरतो कां ?

११६ परंतु इतर शास्त्रांतील पारिभाषिक शब्द कालिदास आपल्या काव्यांत वापरतो कां ? त्यांचा अर्थही पारिभाषिकच असतो कां ?– हें पाहिलें पाहिजे. उपयोजिले असतील तर खगोलीय पारिभाषिक शब्दही खगोलीय अर्थानेंच योजिलें आहेत, हें आपोआपच सिद्ध होईल. शोध करतां बरेच खगोलीय शब्द खगोलीय अर्थानें योजिलेले सांपडले, त्यांपैकीं कांहीं पुढील प्रकरणांत सविस्तरपणें दाखवितों.

# प्रकरण ५ वें : 

## ११७ अ- अनेक शास्त्रांतील पारिभाषिक शब्द.

१ अर्थशास्त्रांतील- सप्तांग, यातव्य, प्रत्यंत, पार्ष्णि ..इ.

२ योगशास्त्रांतील- पर्यंकबंध, वीरासन.. इ.

३ गीता-परिभाषा- क्षर, अक्षर, क्षेत्रज्ञ.. इ.

४ गायन-शास्त्र- मार्जना, करण, वर्णपरिचय, षड्ज, मध्यम इ.

५ फलज्योतिष- वक्री, जामित्र, मैत्रमुहूर्त, उच्चसंस्थ.. इ.

११८ हे सारे पारिभाषिक शब्द त्या त्या शास्त्र-संदर्भानेंच कवीनें वापरले आहेत. आतां खालीं खगोलीय परिभाषेचें शब्द देतों. पहा-

खगोलीय पारिभाषिक शब्द.

| | | |
|---|---|---|
| १ तरल बिंब कु. ८.७३ | ४ रोहिणीयोग शाकुंतल | ७ प्रवृत्ति कु. ३.२५ |
| २ताराग्रह र. ६.२२ | ५ अगस्त्यचिन्ह र. १६.४४ | ८ अयनात् र. १६.४४ |
| ३ योगतारा कु. ८.७३ | ६ संनिवृत्तिः र. १६.४४ | ९ एक सूक्ष्म खगोलीय घटना र. ७.३३ |

वगैरे हे सारे शब्द खगोलीय संदर्भातच वापरले आहेत. ( एवढे शब्द पुरे आहेत.)

## ब- टीकाकारांचे अप्रस्तुत अर्थ.

११९ टीकाकारांचा कालिदासासारखा खगोलाशीं परिचय नसल्यानें त्यांना ही परिभाषा उमगली नाहीं. म्हणून त्यांचे अर्थ अपारिभाषिक,

अप्रस्तुत, अगतिक किंवा कृत्रिमही झाले आहेत. उदाहरणें पहा-

**उदाहरण १ लें- तरलबिम्ब** (कुमार ८।७३)

**एष चारुमुखि योगतारया ।**
**युज्यते तरलबिम्बया शशी ॥**

यांतील तरलबिम्ब याचा पारिभाषिक अर्थ अम्बुगोलक असा असून—

**तेजसां गोलकः सूर्यः ग्रहर्क्षाण्यंबुगोलकाः ।**
**प्रभावन्तो हि दृश्यन्ते रविरश्मिविदीपिताः ॥**

या बृ. सं. पृ. १०० भट्टोत्पलोद्धृत **सूर्यसिद्धांताच्या** उक्तींतील पारिभाषिक अर्थानेंच तो कवीनें वापरला आहे. "सलिलमय" शशीचा तरलबिम्ब (सलिलमय) योगतारेशीं समगुणाश्रित योग होत आहे, असें कवीचें स्पष्ट खगोलसमर्थित अभिप्रेत आहे. हा खगोलाधार टीकाकारांना परिचित नाहीं, म्हणून एक अप्रस्तुत अर्थ देऊन ते मोकळे झाले आहेत, ते असे—

मल्लीनाथाचा अर्थ— **तरलबिम्बया स्फुरन्मण्डलया ।**

सीतारामाचा अर्थ— **तरलबिम्बया चपलमण्डलया ।**

टीकाकारांचे हे अर्थ काव्यहानिकारक अतएव अप्रस्तुत आहेत, हें स्पष्ट आहे. सलिलमयत्व हें साधर्म्य त्यांच्या परिचयाचें नाहीं.

१२० **उदाहरण २ रें- योगतारा** (वरील श्लोकार्ध)

योगतारा या शब्दाचा पारिभाषिक अर्थ ( भट्टोत्पलानें ) प्रधानतारा असा दिला आहे. त्याची व्याख्या अशी—

**स्वतारागणमध्ये तु या तारा दीप्तिमत्तरा ।**
**योगतारेति सा प्रोक्ता नक्षत्राणां पुरातनैः ॥**

या बृ.सं.पृ. ३९५ वरील पुरातन व्याख्येला अनुसरूनच कालिदासानें तो पारिभाषिक शब्द वापरला आहे. साहित्यक्षेत्रांत योगतारा शब्द कधींच येत नाहीं. आतां टीकाकारांचे मजेशीर अर्थ पहा—

**मल्लीनाथाचा अर्थ**– प्रत्यहं यया युज्यते सा योगतारा । नित्यनक्षत्रेणेत्यर्थः।

**सीताराम टीका**– **योग्य**तारया सदृशतारकया युज्यते ।

मल्लीनाथाचा अर्थ अनुपपन्न तर सीतारामानें **योग्यतारा** असा भलताच पाठ केला आहे. त्यांचा अपरिचय स्पष्ट आहे.

१२१ **उदाहरण ३ रें**– नक्षत्र-ताराग्रह (रघु. ६, २२) याचा पारिभाषिक अर्थ– नक्षत्र + ताराग्रह; ताराग्रहाः = भौमादि पंचग्रहाः । पहा बृ. सं. पृ. १२५ वर "**पंचताराग्रहादिभिः**" असा स्पष्ट निर्देश आहे. हा शब्द खगोल-क्षेत्रांतील आहे. साहित्यांत कधींही येत नाहीं, टीकाकाराचा अर्थ– नक्षत्र + तारा + ग्रहाः । – यांत अपरिचय स्पष्ट आहे.

१२२ **उदाहरण ४ थें– एक सूक्ष्म पारिभाषिक घटना.**
(रघु. ७, ३३) । चन्द्राची तीन रात्री अदृश्यता.

**तिस्रस्त्रिलोकप्रथितेत् सार्धम् । अजेन मार्गे वसतीरुषित्वा ।**
**तस्मादपावर्तत कुंडिनेशः । पर्वात्यये सोम इवोष्णरश्मेः ।।**

**अर्थ**– सूर्याशीं विरह होऊं नये म्हणून पर्वान्तीं चंद्र जसा **तीन रात्री** अदृश्य राहतो, तसा अजाशीं विरह होऊं नये म्हणून त्याच्याबरोबरच कुंडिनेश तीन रात्री राहिला.

१२३ खगोलज्ञालाच विदित असें हें सूक्ष्म रात्रित्रयात्मक चंद्राचें अदृश्यत्व पूर्ण ज्ञात असल्याशिवाय वरील सुन्दर पूर्णोपमा कालिदास गुंफूं शकला असता काय ? (टीप ले. १२७ पहा.) ही खगोलीय उपमा यथार्थतम असून तिचाही मूलाधार कालिदासानें आश्रय केलेल्या–

**विप्रकर्षं यथा याति ह्यधस्थः चंद्रमा रवेः ।**
**तथा तथाऽस्य भूदृश्यमंशं भासयते रविः ।।**

या भट्टोत्पलोद्धृत (बृ. सं. पृ. १००) आद्यसूर्यसिद्धांतांतील श्लोकांतच आहे.

टीकाकारांना या तीन दिवसांचें रहस्य समजलें नाहीं, ते केवळ शाब्दिक अर्थ देऊनच मोकळे झाले आहेत.

१२४ असे हे कालिदासाचे पदोपदीं सूर्यसिद्धान्तासारख्या बलिष्ठ आधारांनीं मंडित सूक्ष्म पारिभाषिक निर्देश तज्ज्ञांनीं विचारांत घेणें अवश्य आहे. हें साधार प्रतिपादन पाहण्याच्या अगोदरच–

**कालिदासाच्या ग्रंथांतील खगोलीय निर्देशांत यथार्थतेची अपेक्षा करणें फोल आहे–**

असले उच्छृंखल शेरे कोणीही मारूं नयेत, परीक्षण अवश्य करावें.

१२५ आम्हीं जेवढे कालिदासोक्त खगोलीय निर्देश पाहिले, ते सारे साधार व पूर्ण यथार्थ आहेत. परीक्षकांनाही या निबंधांत हेंच दिसून येईल.

१२६ कालिदासाचा संपन्न परिचय आणि टीकाकारांचा पूर्ण अपरिचय सोदाहरण दाखविला. आतां ४४ व्या मतभेदाच्या श्लोकांतील पारिभाषिक शब्दांचा विचार पुढील प्रकरणांत केला आहे. त्या ४४ व्या श्लोकांतील शब्द या स्वरूपांत साहित्यांत कधींही येत नाहींत व आलेले नाहीत.

१२७ **टीप–** या सूर्यसिद्धांताच्या दाट परिचयाधारें ही सूक्ष्म घटना आत्मसात् केलेल्या कवीला त्याच सिद्धांतांतील “**अगस्त्य कर्कारंभीं**” या निर्देशाधारें स्वकालीं अगस्त्यबिंदूवर सूर्य परमोत्तरीं आला, हें स्वतः किंवा खगोलवेत्त्यांकडून समजून घेणें सुलभ आहे. अगस्त्याशीं कवीचा चांगलाच परिचय होता, (पहा, ले. १६१) याचे पुढें विशेष विवेचन केलें आहे.

# प्रकरण ६ वें : परिभाषा

## श्लो. ४४-संनिवृत्ति व प्रवृत्ति यांचे पारिभाषिक अर्थ. कालिदासाचा परिचय; टीकाकारांचा अपरिचय.

### प्रथम – कालिदासोक्त संनिवृत्ति.

१२८ प्रवृत्ति म्हणजे उदगयन-प्रवृत्ति व निवृत्ति म्हणजे उदगयन-निवृत्ति अशा अर्थाचा खगोलशास्त्रांत सामान्य संकेत आहे. उदाहरणार्थ वराहाचीच आर्या पहा–

आश्लेषार्द्धादासीत् यदा निवृत्तिः किलोष्णकिरणस्य ।

वेदांगज्योतिषकालीन उदगयन-निवृत्ति सांगतांना वराहानें या आर्येंत खगोलीय संकेतानुसारें निवृत्ति = उदगयननिवृत्ति, असाच योजिला आहे. कालिदासानें ' अयनात् निवृत्ति ' म्हटलें आहे. त्या ऐवजीं केवल 'निवृत्ति' म्हटलें तरी चालतें. सुधाकरांनीं आपल्या टीकेंत निवृत्ति = उत्तरात् निवृत्तिः असाच अर्थ दिला आहे. म्हणून निवृत्ति = उदगयन-निवृत्ति हा कालिदासाचा परिचित प्रयोग सशास्त्र आहे.

### आतां कालिदासोक्त प्रवृत्ति ।

१२९ **कालिदासोक्त प्रवृत्ति**– प्रवृत्ति = उदगयन-प्रवृत्ति याच्या पुष्ट्यर्थ कालिदासोक्त श्लोकाचाच आधार देतो. त्यायोगें स्वाभीष्ट खगोलीय परिभाषेशीं त्याचा चांगला परिचय असून, महाकवीला शोभेल असा तिचा उपयोगही तो कसा करतो, हें व्यक्त होईल. तो श्लोक असा– **कुबेरगुप्तां दिशमुष्णरश्मौ । गंतुं प्रवृत्ते समयं विलंघ्य ।** येथें, प्रवृत्ति = उदगयन-प्रवृत्ति, या पारिभाषिक अर्थानेंच कालिदासानें, वरील निवृत्तिप्रमाणेंच, अगदीं बरोबर वापरला आहे. म्हणून श्लो. ४४ तील– अयनात् भास्वति संनिवृत्ते (सति) म्हणजे सूर्य उदगयनापासून निवृत्त झाला असतां– हा पारिभाषिक अर्थ वादातीत आहे. अयनात् निवृत्तः हा प्रयोग साहित्य-

क्षेत्रांत कधींच येत नसल्यानें टीकाकार, अयनात् = मार्गात् व संनिवृत्ते = प्रत्यागते सति– असे अप्रस्तुत अर्थ देऊन मोकळे झाले आहेत.

## कालिदासाच्या माथीं काय म्हणून ?

१३० **टीप**– परम तन्वी रात्र, अयन-निवृत्ति, प्रवृत्ति, योगतारा वगैरे विषयीं कालिदासानें आपलें पारिभाषिक ज्ञान विपुलतेनें स्पष्ट केलें आहे. अयननिवृत्ति-बिंदु तीन राशीवर म्हणजे ९० अंशावर असतो, हें एका आक्षेपकाला न उमगल्यामुळें–

> **दक्षिणायन-बिन्दु क्रान्तिवृत्तावर ९० अंशावर असतो, ही परिभाषा कालिदासाच्या मनांतही नसेल–**

असा शेरा मारून आपलें पारिभाषिक अज्ञान तो कालिदासाच्या माथीं मारीत आहे इतकेंच. स्वतःला जें येत नाहीं, उमगत नाहीं किंवा आटोका पोंचत नाहीं, तें कवीलाही येत नसलेंच पाहिजे– ही त्याची आग्रही कल्पना. कारण निवृत्तीचा प्रत्यक्ष उल्लेखच केल्यावर मग आणखी निराळें मनांत काय असायला पाहिजे ? उदाहरणार्थ– सौभाग्यवती माहेरीं गेली आहे– या वाक्यांत– सौभाग्यवती म्हणजे स्वभार्या– हा अर्थ लेखकाच्या मनांतही नसेल– या विधानासारखेंच वरील विधान भ्रांतिग्रस्त आहे.

आतां पुढील प्रकरणांत **–ल्यब्लोपे पंचमी–** या वार्तिकानुसारें श्रीवराहोक्तींतील (ले १४२)—

आश्लेषार्धात् = आश्लेषार्धम् प्राप्य ।
= आश्लेषार्धबिन्दूला पोंचून,

सूर्य निवृत्त झाला, तसाच कालिदासोक्तींतील – (ले. १४२)–

अगस्त्यचिन्हात् = अगस्त्यचिन्हम् प्राप्य
= अगस्त्यबिंदूला पोंचून,

सूर्य निवृत्त झाला, याचें पारिभाषिक विवरण स्वस्थतेनें वाचावें.

## श्लो. ४४– अगस्त्यचिन्हात् । ल्यब्लोपे पंचमी ।

### ( साहित्यांत कधींही येत नाहीं. )

### अ– टीकाकारनिर्मित अगस्त्यचिन्हाचें कोडें.

१३१ योगतारा या खगोलीय शब्दाला साहित्यक्षेत्रांतला ( ले. १२० ) कल्पून मल्लीनाथानें त्याचा भलताच अर्थ केला. तसेंच अगस्त्यचिन्ह हा खगोलीय शब्दही साहित्यक्षेत्रांतीलच आहे, असें गृहीत धरून टीकाकारांनीं त्याच्या अप्रस्तुत अर्थानें एक भलें मोठें कोडें निर्माण करून ठेविलें आहे. त्या कोडयाचा उलगडा येथें करावयाचा आहे.

> अगस्त्यचिन्हादयनात् समीपं । दिगुत्तरा भास्वति संनिवृत्ते ।
> आनंदशीतामिव बाष्प-वृष्टिं । हिमस्त्रुतिं हैमवतीं ससर्ज ।। ।।४४।।

१३२ **टीकाकारांचा अर्थ**– अगस्त्य आहे चिन्ह ज्याचें अशा अयनापासून ( मार्गापासून, दक्षिणायनापासून ) सूर्य उत्तरेच्या जवळपर्यंत परतला असतां उत्तरेनें ( सवतीकडे गेलेल्या पतीच्या पुन: समागमामुळें ) आनंदाचे शीतल हिमाश्रु गाळले. खगोलीय शब्दशः अर्थ पुढें ले. १३८ मध्यें दिला आहे.

१३३ या अर्थांतील पंचमुखी कोडें.

१) **अगस्त्यः चिन्हं यस्य तस्मात् अयनात्** – – – बहुव्रीहि-विग्रह
२) **अगस्त्यचिन्हात् अयनात्** – – – विशेषण-विशेष्य भाव.
३) **अगस्त्यचिन्ह म्हणजे दक्षिण** – – – लाक्षणिक अर्थ.
४) **सपत्नी साम्य** (दक्षिणा व उत्तरा या दोघी सवती.)
५) **अगस्त्यचिन्ह** = अगस्त्यसदृश म्हणून गमन-साम्य व चिन्ह = सदृश.

## १३४ ब– कोडयाचा उलगडा। प्रस्तुत चिन्ह = बिन्दु।




आकृति १

सोबतच्या आकृतींत AD ही रविकक्षा, उजवीकडे E हा अगस्त्यतारा आहे. ED या लंबसूत्रानें D येथें त्याचें चिन्ह येतें. चिन्ह याचा पारिभाषिक अर्थ D बिंदु असा आहे. थोडक्यांत अगस्त्यचिन्ह = D अगस्त्य-बिंदु होय. सूर्याची आणि अगस्त्यचिन्हाची म्हणजे D बिंदूची गांठ पडलेली आकृतींत स्पष्ट दिसत आहे. सूर्य व D बिंदु हें दोन्ही परमोच्च– परमोत्तरीं स्पष्ट दिसत आहेत. परमोत्तर = उदगयन-समाप्ति हेंही स्पष्ट आहे. म्हणून कालिदास म्हणतो– " अगस्त्यचिन्हाप्रत पोंचून सूर्य अयनापासून निवृत्त झाला " या पारिभाषिक वाक्याचा आकृतिदृष्टया " D बिंदूला पोंचून सूर्य परमोत्तर बिंदूवर आला " हा अर्थ सहज स्फुट होतो. तो आकृतीत दिसतोही.

१३५ टीप १– चिन्ह शब्दाचे इतर अर्थ आहेत. या ठिकाणीं त्याच्या पारिभाषिक अर्थाचाच केवळ उलगडा केला आहे. वरील आकृतीमध्यें AD = अगस्त्यध्रुव, DE अगस्त्यक्षेप, व D अगस्त्यबिंदु = अगस्त्यचिन्ह आहे. म्हणून चिन्ह या शब्दाचे दुसरे अर्थ असले तरी खगोलीय पारिभाषिक अर्थ– बिंदु असा आहे.

१३६ आकृतीच्या सहाय्यानें ४४ व्या श्लोकांतील शब्दांचा ले. १३४ मध्यें पारिभाषिक शब्दशः अर्थ बालानांही समजेल इतका स्पष्ट केला. त्या अर्था-

अगस्त्यचिन्हं = D बिंदु.

हेंही स्पष्ट समजलें. तो आकृतींत स्पष्ट दाखविलाही आहे. या D बिंदुचा उपयोग खालच्या लेखांकांत केला आहे.

१३७ आतां टीकाकारांच्या ( ले. १३३ मधील )पंचमुखी खोड्यांत चिन्ह या ऐवजी त्याच्या बिंदु – या उपपन्न पर्यायाची – योजना केली तर काय अनर्थ होतो, तो पहा–

चिन्ह – याबद्दल – बिंदु योजून–

१) **अगस्त्यः –बिन्दुः– यस्य तस्मात् अयनात्** – – – – अर्थशून्य.

२) **अगस्त्य–बिन्दोः– अयनात्– गमन असिद्ध** – – – – असंबद्ध.

३) **अगस्त्य–बिन्दुः– = दक्षिण ... होत नाहीं** – – – – अर्थशून्य.

४) **दक्षिणाच नाहीं, तर सपत्नी –साम्य कोठून येणार ?** – – – – असंभव.

५) **दक्षिणा असिद्ध; चिन्ह = सदृश, हे चूक. म्हणून गमन-साम्य** – – – – असंभव.

१३८ या प्रमाणें चिन्ह शब्दाच्या कालिदासोक्त पारिभाषिक 'बिन्दु' या अर्थानें टीकाकारांच्या स्पष्टीकरणांतील ( ले. १३३ ) पांचही अप्रस्तुतें उडून जातात व अगस्त्याचें चिन्ह तें अगस्त्यचिन्ह, अशा षष्ठीतत्पुरुषानें प्रपुष्ट असा खालील शब्दशः पारिभाषिक अर्थच तेवढा शिल्लक उरतो, तो असा–

शब्दशः अर्थ.

| | |
|---|---|
| **अगस्त्यचिन्हात्** | अगस्त्यबिंदूप्रत पोंचून (आकृति D बिंदु.) |
| **भास्वति** | सूर्य. |
| **उत्तरा-समीपं** | उत्तरेकडे |
| **अयनात्** | अयनापासून. |
| **संनिवृत्ते सति** | निवृत्त झाला असतां (टीप १ पहा.) |

## स्वतंत्र शब्द; स्वतंत्र प्रयोजनें ।

१३९ **स्वतंत्र शब्द; स्वतंत्र प्रयोजनें ।** १] अगस्त्यचिन्ह = D बिंदु हा स्वतंत्र आहे. तो केवळ **निवृत्ति-स्थान** सांगतो. स्थान-कथन हें त्याचें प्रयोजन आहे. २] अयनात् हा शब्दही स्वतंत्र आहे. निवृत्ति शब्दाच्या संकेतबलानें उदगयनात् असें स्वप्रयोजन सांगून तो विराम पावतो. म्हणून, स्वातंत्र्यामुळें व प्रयोजन-भिन्नत्वामुळें या दोन शब्दांत कोणताच संबंध नाहीं. पंचमी-विभक्ति-साम्यामुळें (टीकाकारांना झाली तशी) विशेषण-विशेष्य-भावाची भ्रांति होण्याचें कारण नाहीं. (ले. १५३ जरूर पहा.) टीकाकारांनीं कल्पिलेले नायक, नायिका, सपत्नी, दक्षिणायन, सूर्याचें असभ्य वर्तन वगैरे हीं सर्व अस्थानीं आहेत. आतां खगोलवेत्ता काय करतो, तें पुढील प्रकरणांत पहा.

१४० **टीप १**- वरील ले १३८ पाहूनही व त्यांतील अगस्त्यचिन्ह हा शब्द प्रत्यक्ष स्वमुखानें वाचूनही-

> **- प्रस्तुत श्लोक ४४ मध्यें कवि प्रत्यक्ष निवृत्ति-स्थान सांगत आहे- असें निश्चित म्हणवत नाहीं -**

असलें हास्यापद विधान कोण करील ?

> **पूर्वबिन्दूपासून सूर्य वर आला**- या विधानांत-
>
> कवि प्रत्यक्ष पूर्व दिशा सांगत आहे, असें निश्चित म्हणवत नाहीं-

असलें भ्रांत विधान विद्यार्थीही करणार नाहीं.

# प्रकरण ८ वें : परिभाषा.

## खगोलवेत्ता प्रमाण कसें पारखतो ?

१४१ खगोलवेत्त्याच्या नात्यानें ४४ वा श्लोक वाचतांच आम्हांला समजलें कीं, यांतील (१) अगस्त्यचिन्हात्, (२) अयनात् संनिवृत्ते वगैरे शब्द, घटना व घटनाप्रतिपादक शब्दांची विभक्ति ही सारीं पारिभाषिक आहेत. नंतर सर्वमान्य वराहमिहिराच्या तत्सम निर्देशाशी त्याची तुलना केली, ती अशी–

**वराहाची मूळ आर्या–**

**आश्लेषार्द्धादासीत् यदा निवृत्तिः किलोष्णकिरणस्य ।**

**कालिदासाचा मूळ श्लोक–**

**अगस्त्यचिन्हादयनात् समीपं दिगुत्तरा भास्वति संनिवृत्ते ।**

**आवश्यक शब्द तेवढेच घेऊन–**

**वराह- आश्लेषार्द्धात् उष्णकिरणस्य......निवृत्तिः ।**

**कालिदास- अगस्त्यचिन्हात् भास्वतः ......अयनात् निवृत्तिः ।**

१४२ या निर्देशांचे शब्दशः अर्थ.

| **वराह** | **कालिदास** (आ. १, ले. १२५ पहा.) |
|---|---|
| क- आश्लेषार्द्धात् । (पंचमी) | अगस्त्यचिन्हात् । (पंचमी) |
| = आश्लेषार्द्धाप्रत पोंचून. (अयन-निवृत्ति-स्थान) | = अगस्त्यचिन्हाप्रत पोंचून. (अयन-निवृत्ति-स्थान, D बिंदु) |
| ख- उष्णकिरणस्य । | भास्वतः । |
| = सूर्याची, | = सूर्याची. |
| ग- निवृत्तिः । | अयनात् निवृत्तिः । |
| = उदगयन-निवृत्ति झाली. (परमोत्तरप्रापण) | = उदगयन-निवृत्ति झाली. (D बिंदूवर परमोत्तरप्रापण) |

१४३ **तुलनेची फलश्रुति–** वरील तुलनेंत १] प्रस्तुत श्लोक, २] त्यांतील मुख्य शब्द, ३] शब्दांचीं रूपें व ४] मांडणी— हे सारे तपशील परस्पर शीं तंतोतंत जुळते आहेत. अर्थात्, वराहोक्तींत जी **पारिभाषिक घटना** ग्रथित झाली आहे, तीच घटना कालिदासोक्तींतही ग्रथित झाली आहे, याची माझ्याप्रमाणेंच इतरांचीही सहज खात्री होईल.

१४४ **परमोत्तरप्रापण–** वराहाच्या आर्येंत वेदांगज्योतिषकालीं आश्लेषार्धा-वर सूर्य अयन-निवृत्त झाला ( परमोत्तरीं आला ), तर कालिदासकालीं अगस्त्यचिन्हावर सूर्य अयन-निवृत्त झाला, असें स्पष्ट निर्देश आहेत.

१४५ **निवृत्ति-स्थान–** आश्लेषार्ध- हें जसें वेदांगज्योतिषोक्त निवृत्ति-स्थान तसेंच अगस्त्यचिन्ह्- हें कालिदासोक्तीतील निवृत्ति-स्थान आहे.

१४६ **आतां सांगा–** कालिदास स्वकालीन प्रत्यक्ष निवृत्ति-स्थानच सांगत आहे, असें निश्चित म्हणवत नांहीं– हें बेढब विधान शोभेल कां ?

१४७ **कालिदासोक्तीनेंच परीक्षण–** वरील परमोत्तरप्रापण केवळ शाब्दिक तुलनेवरून सिद्ध केलें. आतां तात्त्विक सिद्धि करतो. खगोलीय सिद्धांत—

> "On June 21, the Sun reaches the farthest north (परमोत्तरीं येतो), when the day is the longest and night, the shortest."

१४८ श्लोक ४५ मध्यें, रात्र परम लघु व दिवस परम दीर्व असा कवीचा स्पष्ट निर्देश आहे. अर्थात् ४४ व्या श्लोकांत जून २१ ची अयन-निवृत्ति किंवा परमोत्तर-प्रापण निर्दिष्ट आहे, या पूर्वोक्त शाब्दिक सिद्धीला वरील आंतर उताऱ्यानें आतां पूर्ण तात्त्विक स्वरूप आले. **सारांश-** ४४ व्या श्लोकांत अयन-निवृत्ति = परमोत्तरप्रापण व ४५ व्या श्लोकांत तज्जन्य परम दीर्घ लघु दिनरात्रिमान सिद्ध झालें.

## काल केव्हां काढितां येतो ?

१४९ **परमोत्तर-प्रापणाचें स्थान**– प्रतिवर्षी सूर्य हा परमोत्तरीं येतो. रविकक्षेवरील कोणत्या स्थानीं आला, हें स्थान समजलें तरच त्याचा काल काढतां येतो वराहाच्या आर्येत वेदांगज्योतिषकालीन परमोत्तर-प्रापण-स्थान ' आश्लेषार्धात् ' असें स्पष्ट आहे, म्हणून त्याचा काल काढतां आला. कालिदासाच्या श्लोकांतही स्व-कालीन परमोत्तर--प्रापण-स्थान (टीप,१, २ पहा) ' अगस्त्यचिन्हात् ' असें स्पष्ट आहे, म्हणून कालिदासकालीन त्या घटनेचा काल काढणें सोपें झालें. वराह व कालिदास यांच्या उक्तींत निवृत्ति स्थानाचाच निर्देश आहे, हें तर स्पष्टच आहे. (टीप ३ पहा.)

१५० **टीप**– वरील स्पष्टोक्ति न पहातांच–

> वाचकहो– हा खगोलीय तपशील सांगणारा कवि–
> कालिदास आहे. खगोलज्ञ कालिदास नव्हे बरं का,
> सावध रहा !!

अशी सूचना किती अनुकंपनीय ठरते पहा–

१५१ **टीप २**– अगस्त्यचिन्ह हें मिथुनान्तीं = पुनर्वसु तीनचतुर्थांशावर आहे, या पंच-सिद्धांतिकोक्त सूर्यसिद्धांतवचनाधारें कालिदासोक्त अगस्त्य-चिन्हांकित निवृत्ति पुनर्वसू तीनचतुर्थांशावर झाली, हें खगोलवेत्ता सहज ओळखतो. कारण या दोन्ही नांवानीं एकच बिन्दु निर्दिष्ट होतो.

१५२ **टीप ३**– वाचकांना पूर्ण पटून परिभाषेची खात्री व्हावी म्हणून, तेच शब्द, तसाच विभक्ति वगैरे प्रयोग, तीच घटना, निवृत्तीचें प्रत्यक्ष स्थान, कथनाची पद्धतीही तीच जींत अंतर्भूत आहे, अशा वराहोक्त पारिभाषिक आर्येवरूनच अगस्त्यचिन्ह हें कालिदासकालीन प्रत्यक्ष निवृत्ति-स्थान आहे, हें वर सिद्ध केलें आहे. तरी देखील– कालिदास प्रत्यक्ष-निवृत्ति-स्थान सांगत आहे, असे निश्चित म्हणवत नाहीं– असें म्हणण्याचें कोणी धाष्टर्य

करील काय ? वाचकांच्या मनावर ठसण्याकरितां आम्हीं पुनरुच्चार करीत आहों.

१५३ निवृत्ति किंवा परमोत्तर-प्रापण-स्थान म्हणजे काय ?

परमोत्तर-प्रापण-स्थानाचा उच्चार आम्हीं वारंवार केला आहे. त्याचा अर्थ काय– हें सामान्य वाचकांस समजावें, म्हणून एक उदाहरण देतो, तें पहा–

**१) प्रयागात् स्वतंत्रगमनात् गंगा निवृत्ता ।**
**२) अगस्त्यचिन्हात् अयनात् भास्वान् निवृत्तः ॥**

| अ | ब |
|---|---|
| १ प्रयागात् = प्रयागाप्रत पोंचून. | अगस्त्यचिन्हात् = अगस्त्यबिंदूप्रत पोंचून. |
| २ स्वतंत्रगमनात् = स्वतंत्र गमनापासून. | अयनात् = अयनापासून. |
| ३ गंगा = गंगा नदी. | भास्वान् = सूर्य. |
| ४ निवृत्ता = निवृत्त झाली. | निवृत्त = निवृत्त झाला. |

या दोहोंचे अर्थ व स्पष्टीकरण.

१५४ अ– प्रयागाप्रत पोंचून गंगा स्वतंत्रगमनापासून निवृत्त झाली.
ब– अगस्त्यचिन्हाप्रत पोंचून सूर्य अयनापासून निवृत्त झाला.

निवृत्ति-स्थानाचा निर्देश.

१५५ १] वरील उदाहरणांत, गंगानदी स्वतंत्रगमनापासून निवृत्त झाली,

ती कोणत्या स्थानापासून– याचें उत्तर –प्रयागापासून– म्हणजे प्रयागाप्रत पोंचून. हा निवृत्त-स्थान-निर्देश जाणावा. त्याचप्रमाणें सूर्य अयनापासून निवृत्त झाला, तो कोणत्या स्थानापासून– याचें उत्तर – अगस्त्यचिन्हात् = अगस्त्यचिन्हाप्रत पोंचून म्हणजे ले. १३४, आकृती १ मधील D बिंदूला पोंचून. म्हणून अगस्त्यचिन्ह किंवा D बिंदु– हा निवृत्ति-स्थानाचा निर्देश जाणावा.

## गमन-प्रकाराचा निर्देश.

२] गंगानदी कोणत्या गमनापासून निवृत्त झाली– याचे उत्तर– स्वतंत्र गमनापासून– हा गमनाचा प्रकार-निर्देश जाणावा. त्याचप्रमाणें, सूर्य कोणत्या अयनापासून निवृत्त झाला – याचें उत्तर– उदगयनापासून– हा अयनाचा प्रकार-निर्देश जाणावा.

३] प्रयागात् व स्वतंत्रगमनात्– स्वतंत्र अर्थ व स्वतंत्र प्रयोजनामुळें या दोहोंत जसा विशेषण-विशेष्य-भाव नाहीं, तसाच अगस्त्यचिन्हात् आणि अयनात्–या दोहोंतही स्वतंत्र अर्थ व स्वतंत्र प्रयोजनामुळें विशेषण-विशेष्य-संबंध नाहीं, हें स्पष्ट आहे. खऱ्या साहित्यपटूंना हें लागलींच पटेल. त्या शब्दांच्या पंचमीविभक्तीनें ते आतां मुळींच फसणार नाहींत.

१५७ या उदाहरणावरून, ४४-४५ या श्लोकांतील रहस्य सामान्य वाचकांना पूर्ण व्यक्त होऊन ते संशयातीत होतील अशी आशा आहे. (टीप १ पहा.)

## खगोलवेत्याचें सुदैवच होय.
## अगस्त्यकंकणाच्या अनुषंगानें अगस्त्यचिन्ह.

**सुदैवच होय–** अगस्त्यचिन्हावर अयन-निवृत्त झाली म्हणजे आकृती १ मधील D बिंदूवर सूर्य परमोत्तरीं आला, म्हणून बिचकण्याचें कारण नाहीं. ( ले. १६५, दृष्टांताच्या उत्कृष्ट सजावटींत ) अगस्त्यकंकणाच्या अनुषंगानें अगस्त्यचिन्ह हें स्वकालीन परमोत्तर-स्थान कालिदास सहज सांगून गेला, हें

खगोलवेत्त्याचें सुदैव होय. कारण या स्थान-निर्देशांतच कालिदास-कालाचें अचूक गमक त्याच्या हातीं आलें.

पुढील प्रकरणांत दृष्टांताचें प्रदर्शन केलें आहे.

१५८ **टीप १**– प्रयागात् व स्वतंत्रगमनात् हे दोनी शब्द जवळ जवळ असून दोहोंची पंचमी विभक्ति आहे. तरी त्या दोहोंत परस्पर कोणताच संबंध नाहीं. त्याचप्रमाणें अगस्त्यचिन्हात् व अयनात् या निकटच्या शब्दांची विशिष्ट कारणपरत्वें पंचमी विभक्ति असली तरी त्या दोहोंत विशेषण-विशेष्य-भाव वगैरे कोणताच संबंध नाहीं, हें त्यांच्या त्यांच्या स्वतंत्र प्रयो-जनावरून व अर्थावरूनच स्पष्ट आहे. (पहा ले. २६२)

१५९ श्लो. ४४, ४५ या परस्परपूरक श्लोकांत, दक्षिणाअंगनेला टाकून सूर्य उत्तरा-अंगनेकडे आला– ही अन्यथार्थानें कशीबशी देखाव्यापुरती जुळ-विलेली, अत एव वरील टीपेनें निरस्त झालेली एक केवल पोरकट नीरस उत्प्रेक्षा नसून, महाकवीला शोभणारी, महाकवीच्या प्रतिभेमधून त्याच्याच लेखणीच्या द्वारें बाहेर पडलेली, अपूर्व दृष्टांताच्या (ले. १६५) सोज्ज्वळ मांडणीच्या रूपानें बुद्धिपुरस्सर योजिलेल्या, साहित्यामध्यें कधींही न येणाऱ्या, अशा विशिष्ट खगोलीय पारिभाषिक शब्दगुंफनामधून सहज प्रकट झालेली, अशी एक गंभीर खगोलीय घटना आहे व ती नाकारण्यांत किंवा ओढाताण करण्यांत अर्थ नाहीं– अशीं प्रामाणिक वाचक-वर्गाची खात्री होईल. ती खात्री होण्याकरितांच आम्हींही वर सुविस्तृत प्रतिपादन केलें आहे.

## कालिदास-कालाचें

## अचूक गमक व अचूक काल-साधन.

१६० कालिदासाच्या कालाचें अचूक गमक खगोलवेत्त्याला कसें सांपडलें, याचें ओघानें आलेलें मनोरंजक प्रतिपादन खालील आक्षेपाच्या उत्तरांत आम्हीं देणार आहों. म्हणून वाचकांनीं हें प्रकरण सावधानपणें वाचावें.

### आक्षेपाचा इत्यर्थ.

कवि या नात्यानें ग्रीष्म वर्णीत असतां खगोलवेत्त्याप्रमाणें " अगस्त्य-चिन्हावर " सूर्य परमोत्तरीं आला असा निर्देश कां ? अगस्त्यचिन्ह सांगण्याची लहर कवीला कां आली ?

### याचें प्रांजळ प्रत्युत्तर.

" मी या श्लोकांत स्वकालीन अयन-निवृत्ति-स्थान सांगणार आहे " - अशी घोषणा कवीनें केलेली नाहीं, असें कांहीं साहित्य-प्रवीण म्हणतात. परंतु कवीचा प्रस्तुत विषय **कुशवर्णन** असल्यानें वरीलसारख्या खगोलीय अत एव अप्रस्तुत घोषणेची अपेक्षा शुद्ध वेडेपणाची आहे. म्हणूनच कवीनें **स्वकालीन अगस्त्यचिन्हांकित अयन-निवृत्तीची घटना—**

### (अ) सरळ दृष्टांत-रूपानें-

शास्त्रोपपन्न पारिभाषिक शब्दांत अनुवादिली आहे. दृष्टांताला कोणत्याही शास्त्राचें साहाय्य कोणालाही घेतां येतें. महाकवि कालिदासाचें या प्रस्तुत दृष्टांत-रचनेंतील चातुर्य व औचित्य पहा. तल्लीनतेनें केलेल्या दृष्टांताच्या सजावटींतच त्याच्या कालनिर्णयाचें—

### (ब) अचूक गमक.

कसें उपलब्ध झाले आहे, तेंच पुढें दाखविलें आहे.

## अगस्त्यविषयक विशेष आदर.

१६१ आपल्या काव्यांतील सौंदर्य व रस वृद्धिंगत करणाऱ्या इतर शास्त्रांप्रमाणेंच खगोल शास्त्रांतूनही अनेक उत्कृष्ट कल्पना निवडून घेण्याइतका कालिदासाचा स्वकाल-प्रचलित सूर्यसिद्धांताशीं दाट परिचय होता, हें मागें ले. ११९, १२०, १२१, १२२, १२३ यांत प्रत्यक्ष उतारे देऊन सिद्ध केलें आहे.

आतां अगस्त्याबद्दल तर कालिदासाच्या मनांत विशेष कोमल आदर होता तो त्याच्या काव्यांत अनेक ठिकाणी व्यक्त झालेला आहे. कवीच्या खगोलीय अभिरुचीमुळें अगस्त्याशीं त्याचा चांगला स्नेह असून १] अगस्त्याचे उदय, २] अस्त, ३] कर्कारंभीं अगस्त्य-स्थान व ४] तेथेंच स्वकालीं होणारी निवृत्ति.. वगैरे त्याला विदित होत्या म्हणूनच-(अगस्त्यचारावर म्हणजे) अगस्त्याच्या हालचालीवर त्याची कुशल नजर होती, हेंही अनेक निर्देशावरून स्पष्ट दिसतें प्रसंग येईल त्यावेळीं तो त्याचा उल्लेख करतो आणि सन्मानही केल्याशिवाय रहात नाहीं. उदाहरणार्थ– अगस्त्यमुनींनीं श्रीरामास दिलेल्या कंकणाचा किती गौरवपूर्वक निर्देश केला आहे. पहा–

### अगस्त्यकंकण (अगस्त्यचिन्ह)

**कुंभयोनिरलंकारं तस्मै दिव्यपरिग्रहम् ।**
**ददौ दत्तं समुद्रेण पीतेनैवात्मनिष्क्रयम् ।** १५/५५.
**तं दधन् मैथिलीकंठ निर्व्यापारेण बाहुना ।** १५/५६.

१६२ महातेजस्वी अगस्त्यमुनींनीं, वरील श्लोकांत निर्देशिल्याप्रमाणें, श्रीरामाला एक दिव्य कंकण दिलें होतें. श्रीराम तें अगस्त्यकंकण (किंवा अगस्त्यचिन्ह) सदैव बाहूवर धारण करीत असे.

पुढें श्रीरामानीं तें कंकण कुशराजास दिलें. तोही श्रीरामाप्रमाणेंच तें कंकण सदैव बाहूवर धारण करीत असे. कोणत्याही कार्यांत–

" **जयश्रियः संवननं..सेहेऽस्य न भ्रंशम् ।** " १६/७८.

यशःप्राप्ति देणाऱ्या त्या अगस्त्यचिन्हाला, तो कुशराजा, कधींही विसंबत नसे.

## दृष्टान्ताची पार्श्वभूमि.

१६३ सोळाव्या सर्गारंभीच्या १-४२ श्लोकांतील वृत्तांतच कालिदासानें श्लो. ४३, ४४ यांत दृष्टान्त-रूपानें प्रतिबिम्बित केला आहे, तो असा–

कुशराजा कुशावती-नगरींत राज्य करीत होता. एके दिवशीं मध्यरात्रीं अयोध्येची अधिदेवता त्याच्या निद्रा-मंदिरांत आली आणि त्याला म्हणाली–

> " राजा, रघुभूपालांची राजधानी जी अयोध्या तिची (श्लो. ४-४२) फार शोचनीय अवस्था झाली आहे. तर तूं प्रत्यक्ष अयोध्येंत येऊन राहशील, तर मला फार आनंद होईल. "

ती म्हणते–

**तदर्हसीमां वसतिं विसृज्य ।**
**मामभ्युपैतुं कुल-राजधानीम् ।।** १६/२२.

सध्यां तूं ठाणें देऊन असलेली ही वसति सोडून, तूं प्रत्यक्ष कुल-राजधानींत प्रवेश कर.– कुशानें तिची विनंति मान्य केली. (रघु. १६/२३)

## कुशावतीपासून अयोध्येपर्यन्त कुश-प्रवास-वर्णन.

(सर्ग १६, श्लोक १-४२)

अधिदेवतेच्या प्रार्थनेला अनुसरून कुशराजा कुशावतीहून निघून अयोध्येला पोंचला, याचें राजप्रयाणोचित रसभरित वर्णन कालिदासानें सर्गारंभीं श्लो. १-४२ मध्यें केलें. अयोध्येंत कुशराजा स्थिरस्थावर होऊन राज्य करूं लागला.

पुढें कालक्रमानें (श्लो. ४३) सूर्य ग्रीष्मारूढ झाला.

रसभरित वर्णनानें रंगलेल्या कविप्रतिभेनें, या ग्रीष्मारूढ सूर्याचें आनुकूल्य साधून, श्लो. १-४२ तील– ' कुशावतीहून अगस्त्यचिन्ह (कंकण) युक्त कुशराजाचें उत्तर-निष्ठ अयोध्या-आगमन व अयोध्या-आनंद या

प्रसंगाच्या पार्श्वभूमीवर श्लो. ४३-४४ या दोनच श्लोकांत. स्वकालीन अगस्त्यचिन्हावरील सूर्याच्या उदगयन निवृत्तीचा, महाकवीला शोभेल असा एक मनोहर दृष्टांतही सजविला.

१६४ दृष्टांताचा आद्यंत. (बिंब-प्रतिबिंब)

**बिंब-प्रारंभ**– अयोध्येच्या नजीकच कुशावती येथें कुशराजा ठाणें देऊन होता.

हाच प्रारंभ-बिंदू कल्पून, या मूळाबरहुकूम त्याशी सुसंगत अशा श्लोक ४३ तील– घर्मः आजगाम– या प्रयोगांत–

**प्रतिबिंब-प्रारंभ** उत्तरेच्या नजीकच ग्रीष्ममध्यांत सूर्यानें ठाणें दिलें– या तंतोतंत **प्रतिबिंब-वाक्यानेंच** आपल्या दृष्टांताचीही उठावणी करून कालिदासानें दृष्टांताचा प्रारंभ-बिंदु निश्चित केला आहे. पुढें याच क्रमानें

**दृष्टांतः पुनरेतेषां सर्वेषां प्रतिबिंबनम्।** (का.प्र.)

या व्याख्येनुसार, पुढें अयोध्येच्या आनंदापर्यंतचा मधला सर्व तपशील प्रतिबिंबवून कालिदासानें आपला खगोल-घटनेचा दृष्टांत अत्यंत कौशल्यानें पूर्ण सजविला आहे. तो असा–

कुबेरगुप्तां दिशं गन्तुं प्रवृत्ते– यांतील उदगयनप्रवृत्तीच्या निर्देशावरून, उदगयनदक्षिणायनांचें निरीक्षण कालिदास करीत असें, हें उघड आहे. या निरीक्षणांत निवृत्तिस्थानही आपोआपच अन्तर्भूत होतें. प्रस्तुत दृष्टान्तांत अगस्त्यकंकणात्मक अगस्त्यचिन्हाच्या अनुषंगानें निवृत्तिस्थानाचा अनायासें उत्कृष्ट उपयोग होतो, असें पाहून–

राजमुकुट जसें राजचिन्ह, तसेंच अगस्त्यकंकण हें अगस्त्यचिन्ह होय. या बिंबाशीं– स्वतःला पूज्य अशा– स्वकालीन निवृत्तिस्थानदर्शक अगस्त्य-चिन्हाला ( म्हणजे प्रत्यक्ष अगस्त्यताऱ्याच्या ले. १३४ आकृ. १ मधील D बिंदूला ) कालिदासानें सुसंगत असें प्रतिबिंब योजिलें आहे.

या दृष्टांताच्या सजावटीतच कालिदासानें नकळत आपल्या कालाचें अचूक गमक पुरविले आहे. (पुढील दृष्टांत-प्रदर्शन पहा.)

## दृष्टांत प्रदर्शन.

| बिम्ब | प्रतिबिम्ब |
|---|---|
| १ सूर्यवंशीय कुशराजा | प्रत्यक्ष सूर्य. |
| २ (श्लो. ३५- कंश्चिदहोभि:) अयोध्येजवळच कुशावतींत कुशराजा ठाणें देऊन होता. | ( श्लो. ४३- धर्म आजगाम ) उत्तरेच्या जवळच घर्मप्रसवी ग्रीष्मांत सूर्यानें ठाणें दिलें. |
| ३ कुशावतीहून अयोध्येच्या रोखानें उत्तर-संचार करीत करीत– (अयोध्याभिमुख: प्रतस्थे, २५) | घ.प्र. ग्रीष्मांतून उत्तरेच्या रोखानें उदगयन करीत-करीत– |
| ४ अगस्त्यकंकणरूपीं अगस्त्य-चिन्हयुक्त कुशराजा– (न सेहेऽस्य भ्रंशम्) | अगस्त्यचिन्ह-संयुक्त सूर्य. (श्लो. ४४) |
| ५ अयोध्येला पोंचतांच– (उपशल्ये ग्रामांते) | उत्तरेला पोंचतांच– (समीपं श्लो. ४४) |
| ६ उत्तर-संचारापासून– | उदगयनापासून– |
| ७ निवृत्त झाला, तेव्हां– (कुलध्वजानि निवेशयामास) | निवृत्त झाला. तेव्हां– ( निवृत्त: ) |
| ८ अयोध्येला आनंद झाला– (अभिव्यक्त मुखप्रसादा) | उत्तरेला आनंद झाला– (आनंदशीतां बाष्पवृष्टिम्) |
| ९ दृष्टान्तबाह्य अतिरिक्त तपशील.घटना-पोपक निकट-संबंध तपशील. | अयननिवृत्तीच्या दिवशीं – दिवस परम दीर्घ व रात्र परम लघु होती. |

## दृष्टांतांतील रसग्रहण.

१६७ १) अयोध्या ही कुशराजाची परमोत्तरा. कुशराजा परमोत्तरी आला, तसाच कवीला– सूर्य परमोत्तरीं आला– हें सहज सांगता आलें. टीप १ पहा.

१६८ २) अगस्त्यकंकण हें काव्यदृष्टया अगस्त्यचिन्हच होय. म्हणून अगस्त्यचिन्हयुक्त कुशराजा परमोत्तरीं आला, तसाच– अगस्त्यचिन्हयुक्त सूर्य आपल्या परमोत्तरीं आला, असें दृष्टांतांत सांगतां आलें.

१६९ ३) आपल्या परमोत्तरींच्या अयोध्येला पोंचून कुशराजा उत्तर-संचारापासून जसा निवृत्त झाला, तसाच– सूर्यही परमोत्तरींच्या उत्तरेला पोंचून उदगयनापासून निवृत्त झाला- हें कालिदासाला सहज सांगतां आलें. **अशी ही दृष्टांताची चतुर सजावट आहे.**

तसेंच–

दृष्टान्तः पुनरेतेषां सर्वेषां प्रतिबिम्बनम् ।

१७० ४) या मम्मटोक्त काव्यप्रकाशांतील दृष्टान्तालंकाराच्या व्याख्येनुसार दृष्टांतांतील बिंब-प्रतिबिंबाच्या जुळणींत अगस्त्यकंकणरूपीं अगस्त्य-चिन्हाच्या प्रतिबिंब साधनांत कालिदासाला प्रिय अशा **अगस्त्याच्या चिन्हाचा** निर्देश सहज येऊन गेला. (टीप २ पहा). यांत पुन्हा अगस्त्याचा सन्मान झाला व नकळत शास्त्रही साधलें. शास्त्रही साधलें असें म्हणण्याचें कारण–

> " कारण पुष्कळ वेळां अशा स्थळीं कवीच्या कालनिर्णयाचें एखादें अचूक गमक सांपडतें. (पृ. १६ मिराशी)

प्रा. मिराशी यांनीं लिहिल्याप्रमाणें खगोलवेत्त्याला मात्र अगस्त्यचिन्हाच्या निर्देशानें कालिदासाच्या कालाचें अचूक गमक सांपडलें, हें निश्चित.

१७१ **टीप १–** प्रकरण ९ च्या आरंभी ले. १६० यांत सूर्य परमोत्तरी आला, असा निर्देश कां आला ? या शंकेला वरील ले. १६७, १६८ यांत निःसंदिग्ध उत्तर आहे.

१७२ टीप २– काव्यांत यथार्थ खगोलीय निर्देश कसा शिरला, हें वरील ले. १७० तील विवरणावरून स्पष्ट होईल.

## तरी खगोलवेत्त्याचें समाधान होत नाहीं !

१७३ दृष्टांतद्वारा अगस्त्यचिन्हांकित निवृत्ति वादातीत आहे, हें खरें आहे. तरी एवढ्यानेंच खगोलवेत्त्याचें समाधान होत नाहीं. कारण काव्य-साम्राज्यांत अशा निर्देशांचा विपुल संभव असतो म्हणून दृष्टांतांत अन्तर्भूत न झालेल्या, परंतु उक्त घटनेशी निकट संबद्ध असा एखादा सशास्त्र– अतिरिक्त निर्देश– आहे काय, हें तो पाहतो. अतिरिक्त निर्देश असेल, तर तो पूर्व निर्देश कार्यकारी ठरेल व नसेल तर केवळ काव्यच ठरेल.

१७४ या दृष्टीनें पाहतां– **The Sun reaches the farthest North** (परमोत्तरीं येतो, त्या वेळीं) **when the day is longest and the night is the shortest.** या नियमाप्रमाणें १) परमोत्तरीच्या दिवशीं म्हणजे ४४ व्या श्लोकांतील प्रतिबिंबात्मक निवृत्तीच्या दिवशीं, २) परम-गुरुलघु दिनमानाचा ' अतिरिक्त उल्लेख ' पाहिजे.

१७५ सुदैवानें ४४व्या श्लोकांत दृष्टांत पूर्ण झाल्यावर( ले. ९९-१०० ) लागलींच ४५ व्या श्लोकांत निकट संबद्ध (ले. १८६) असा सशास्त्र– परम-गुरुलघु दिनरात्रीचा अतिरिक्त उल्लेख आहे. खगोलवेत्त्याची मनीषा व चिकित्सा पूर्ण झाली. आतां ही घटना कालिदासाचा काल काढण्याला पूर्ण समर्थ झाली, अजिंक्य झाली, असेंही म्हणतां येतें.

या घटनेवरून कालिदासाचा काल पुढील प्रकरणांत काढूं.

१७६ टीप– इतक्या चिकित्सेनें सिद्ध केलेल्या प्रमाणाची शुद्धता न पाहतां– कालिदासाच्या ग्रंथांतील एखाद्या खगोलीय घटनात्मक निर्देशा-वरून त्याचा काल काढण्याची अपेक्षा फोल आहे– असा निरर्गल शेरा आतां कोणीही मारणार नाहीं.

## ब– कालिदासाचा काल. (टीप १ पहा)

१७७ साहित्य व खगोलदृष्टचा अगस्त्यचिन्हाची उपपन्नता सिद्ध केल्यावर कालसाधनाचें गणित चुटकीसारखें सुटतें, तें असें– (पहा ले. १५१)

१७८ पंचसिद्धांतिकेंत आद्य सूर्यसिद्धांताच्या आधारें वराहानें अगस्त्याचें

**तथा च पंचसिद्धान्तिकायाम्** । (बृ. सं. पृ. २७९)

ताभिः कर्कटकाद्यात् यल्लग्नं तादृशे सहस्रांशे ।

याम्याशावनितामुखविशेषतिलको मुनिरगस्त्यः ॥

स्थान (चिन्ह) कर्कारंभीं दिलें आहे, कर्कारंभ म्हणजे पुनर्वसूचा तीन चतुर्थांश होतो. कालिदासकालीं अगस्त्यचिन्हावर म्हणजे पुनर्वसू तीन चतुर्थांशावर सूर्य परमोत्तरीं आला. वेदांगज्योतिपकालीं आश्लेषार्धावर सूर्य परमोत्तरीं आला

सार्पार्धे दक्षिणार्कस्तु । (सार्पार्ध = आश्लेषार्ध)

होता. म्हणून आश्लेषार्धापासून पुनर्वसू तीनचतुर्थांशापर्यंत सात चरण होतात. कालिदासकालापर्यंत एकंदर सात चरण अयन-चलन झालें. सात चरण अयन-चलनाला १६८० वर्षें लागतात. (पहा ले. २०८)

१७९ वेदांगज्योतिपाचा काळ (पहा ले. २२०) इ. स. पूर्व १४०० हा आहे. म्हणून १६८० उणे १४०० बरोबर इ. स. नंतर २८० जून २१ हा (टी. १ पहा) कालिदासोक्त परमोत्तरींच्या घटनेचा काळ येतो. अर्थात् रघुवंशाचाही हाच काळ होय. रघुवंश हा त्याचा शेवटचा ग्रंथ मानिला जातो. म्हणून कालिदास ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकांत होऊन गेला.

गणितागत निर्णय–

## कालिदास तिसऱ्या शतकांत होऊन गेला.

१८० **टीप**– पूर्वोक्त साधार, परिपुष्ट प्रतिपादनांत कालिदासाच्या ग्रंथांतील त्याच्याच लेखणींतून उतरलेल्या उल्लेखावरून ओढाताण न करितां कांहीही गृहित न धरतां त्याचा काल काढिला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें

# कवि कालिदास-काल.

## भाग ३ रा.

प्रकरणें १०–१४ अखेर.

## खगोल-विभाग.

( ले. १८१-२३९ )

# प्रकरण १० वें : खगोल

## अ– पार्श्वभूमि.

१८१ सोबतची आकृति २ पहा. उजवीकडे खालीं डिसें. २२, नंतर मार्च २१, नंतर जून २१ व शेवटीं सप्टें. २२ या वर्तुळमार्गानें सूर्याचा वार्षिक संचार होत असतो. डिसें. २२ रोजीं तो परमदक्षिणीं, पुढें तीन महिन्यांनीं मार्च २१ रोजीं वसंतसंपातीं पुढें तीन महिन्यांनीं जून २१ रोजीं परमोत्तरीं, पुढें तीन महिन्यांनीं सप्टें. २२रोजीं शरत्संपातीं व पुढें तीन महिन्यांनीं पुनः डिसेंबर २२ रोजी परम-दक्षिणीं येऊन वर्ष पुरें करितो. यावरून डिसें. २२– मार्च २१– जून २१– या वर्तुलार्धांत सहा महिने उदगयन व जून २१– सप्टें. २२– डिसें. २२– या वर्तुलार्धांत सहा महिने दक्षिणायन असते.



आकृति २.

१८२ **अयन-निवृत्ति**– डिसें २२ रोजीं तो परमदक्षिणीं असतो. म्हणजे तेथें तो दक्षिणायन-समाप्ति करतो. याचाच अर्थ तो दक्षिणायनापासून निवृत्त होतो. याचीच –अयन-निवृत्ति– अशी परिभाषा आहे. तसेंच, जून २१ रोजीं सूर्य परमोत्तरीं येतो. तेथें त्याच्या उदगयनाची समाप्ति होते, याचाच अर्थ तो उदगयनापासून निवृत्त होतो. याचीच –अयन-निवृत्ति– अशी परिभाषा आहे.

## ब– आतां प्रस्तुत, घर्मः आजगाम ।

१८३ वरील आकृति १ मधील मार्च २१ च्या पुढें तीन सूर्यबिम्बांपैकी

पहिलें एप्रिल २१ चें, दुसरें मे २१ चें व तिसरें जून २१ चें आहे. पहिलें ग्रीष्मारंभीचें, दुसरें ग्रीष्ममध्याचें व तिसरें ग्रीष्मान्ताचें आहे. मधल्या सूर्या-जवळ – **सूर्य श्लो. ४३** – असें दाखविलें आहे. घर्मः आजगाम –या निर्देशा-मध्यें कालिदासानें हा मधला सूर्य घेतला आहे. पूर्वमेघ श्लो. ६१ यांतील (ले. ८६) उकाडयाची परिस्थिति या सूर्यापासूनच सुरू होते. श्वासानेंही उडून जातील इतकें पातळ कपडे ( रघु. सर्ग १६, श्लो. ४३ ) घालण्यास ह्याच सूर्य शिकवितो.

## कांहीं साहित्यप्रवीणांची पूर्ण संमति.

ले. १८२ तील विवरणावरून– अयनात् संनिवृत्तः –याचा पारिभाषिक अर्थ पूर्ण लक्षांत आल्यावर, ले.११५ मध्यें आम्हीं दाखविलेली "अप्रस्तुतता" मनावर ठसल्यामुळें–

अयनात् संनिवृत्तः –म्हणजे– मार्गापासून परतला, हा टीकाकारांचा अर्थ कृत्रिम असून, ते दोन्ही शब्द कालिदासानें प्रस्तुत श्लो. ४४ मध्यें पारिभाषिक अर्थानेंच वापरले आहेत व त्या श्लोकाचा–

अगस्त्यचिन्हाप्रत पोंचून सूर्य उदगयनापासून निवृत्त झाला, हा शब्दशः अर्थ (पहा ले १३८, आमचा अर्थ) अगदीं बरोबर आहे.

अशी त्यांनीं कबूली दिली.

## उपाध्यायाचा हा अर्थ कीं अनर्थ ?

तरी देखील एका उपाध्यायाला वरील शब्दशः अर्थांत अतिशय ओढाताण दिसून आल्यामुळें, सहज प्रतीत होणारा म्हणून त्यानें आपला अर्थ दिला आहे, तो असा–

उत्तरदिशेपासून फार दूर दक्षिणेकडे सूर्य जाऊन परत फिरतो, त्या-प्रमाणें नायिकेला (उत्तरदिशेला) सोडून दक्षिणदिशेकडे गेला, तेव्हां उत्तरदिशेला फार दुःख झालें. पण नायक दक्षिणदिशारूपी नवीन संबंध जोडलेल्या स्त्रीला सोडून, पूर्वीच्या नायिकेच्या, उत्तरदिशेच्या जवळ आल्याबरोबर तिला आनंद झाला.. । (रघु .सर्ग १६, श्लो.४४)

हा अर्थ कीं अनर्थ कीं दुराग्रह !!!

१८४ **पार्श्वभूमि**– सोबतची आकृति ३ पहा. मध्यावर B मार्च २१ च्या जवळ AB = BC समान दिनरात्र दाखविली आहे. याप्रमाणें मार्च २१ ला AB, एप्रिल २१ ला DE, मे २१ ला GH व जूनला PS अशीं हीं दिनमानें आहेत. AB पेक्षां DE मोठें, DE पेक्षां GH मोठें, HG पेक्षां PS मोठें अशी क्रमिक वृद्धि झाली आहे. त्याच क्रमानें खालचीं, BC, EF, HJ व ST हीं रात्रिमानें क्रमानें लघु, लघुतर होत गेलीं आहेत.




आकृति ३.

यावरून, वर्षाच्या ३६५ दिवसांपैकीं मार्च २१ व जून २२ या दोन दिवशी मात्र दिनरात्रिमान समान असते. बाकी ३६३ दिनरात्रिमानांत कमी अधिक भिन्नता (वैषम्य) नेहमींच असतें, ही भिन्नता वाढतवाढत जून २१ व डिसेंबर २२ या दोन दिवशीं परमावधीला पोचते, हें आकृतीवरून स्पष्ट होतें.

१८५ आकृति ३ मधील उजवीकडे खालीं R बिंदु पहा. तो डिसें. २२चा परमावधीचा बिंदु आहे. म्हणून तेथें RN ही परमदीर्घ रात्र दाखविली आहे व NM हा परमलघु दिवस आहे.

१८६ हा R बिन्दूवरचा सूर्यच दक्षिणायनापासून डिसें. २२ रोजीं निवृत्त

होतो व त्याच दिवशीं परमलघु दिवस व परमदीर्घ रात्र असते, असा हा अयननिवृत्तीचा व दिनमानाच्या परमगुरुलाघवाचा निकट संबंध आहे.

१८७ आतां डावीकडे वर P बिंदु पहा. तो जून २१ चा परमावधीचा बिंदु आहे. म्हणून या परमोत्तर P बिंदूवर सूर्य आला कीं त्याच दिवशीं होणारा तेथें PS हा परमदीर्घ दिवस व ST परमलघुरात्र दाखविली आहे.

१८८ हा P बिंदूवरचा सूर्यच जून २१ रोजी उदगयनापासून निवृत्त होतो- उदगयनसमाप्ति करतो- परमोत्तरीं येतों, म्हणून त्याच दिवशीं परमदीर्घ दिवस व परमलघु रात्र असते, असा हा परमोत्तरप्रापणाचा ( अयननिवृत्तीचा ) व पुनः दिनमानाच्या गुरुलाघवाचा निकटतम संबंध आकृतिद्वारें देखील स्पष्ट दिसतो. म्हणूनच-

> P समोर – मिथुनांतीं उदगयन-निवृत्ति-दिन – असें आकृति ३ मध्यें दाखविलें आहे.

आतां प्रस्तुत-

प्रवृद्धतापो दिवसोऽतिमात्रं अत्यर्थमेव क्षणदा च तन्वी ।
उभौ विरोधक्रियया विभिन्नौ – – – ॥४५॥

१८९ अयननिवृत्ति व परम गुरु-लघु दिनरात्रिमान यांचा निकटतम संबंध वर दिला आहे. म्हणून कालिदासानें ४४ व्या श्लोकांत अयननिवृत्ति सांगून लागलींच ४५ व्या श्लोकांत दिनमान वर्णिलें. अर्थात् ४४, ४५ हे दोन्ही श्लोक परस्परपूरक आहेत. ४४ व्या श्लोकांतील अयननिवृत्तीचा खुलासा केला. आतां ४५ व्या श्लोकांतील कालिदासोक्त शब्दांचा खुलासा करितों. ले. १९८ मध्यें टीकाकारांचा खुलासाही पहा.

१९० **विभिन्नौ**- ले. १८४, आकृ. ३ पहा. जून २१ आणि डिसें. २२ या दोन दिवशीं परमावधीचे दिनरात्रिमान आहे. त्यांपैकीं प्रस्तुत अशा एकाचाच विचार येथें करितों. इतर दिवशीं दिन व रात्र यांत कमी अधिक भिन्नता

असतेच असते. परंतु जून २१ च्या परमावधिक दिवशीं दिवस व रात्र हीं **विशेष भिन्न** म्हणजे **विभिन्न** असतात, हें आकृतींत स्पष्ट दिसतें. कालिदासानें – **विभिन्नौ** – असेंच म्हटलें आहे.

१९१ **विरोधक्रिया**– विभिन्नतेमुळें दिवसाची दीर्घतम तापक्रिया आणि लघुतम शीतक्रिया सर्वांच्या परिचयाची आहे. अर्थात् त्या दोहोंतील विरोधक्रिया स्पष्ट आहे. कालिदासाचा निर्देश बरोबर आहे.

१९२ **एकच दिवस**– ही विशेषभिन्नता आणि विरोधक्रिया जून २१ या एकाच दिवशीं असतें, हेंही आकृतीत स्पष्ट दिसतें. अर्थात् तो दिवस जून २१ हा एकच आहे.

१९३ **कालिदासोक्त एकवचन उपपन्न**– विभिन्नता आणि विरोधक्रिया अयननिवृत्तीच्या एकाच दिवशीं असल्यानें, कालिदासाचा –**दिवसः, क्षणदा**– हा एकवचनी प्रयोग शास्त्रोपपन्न आहे,

१९४ **अत्यर्थम् एव क्षणदा च तन्वी**–रात्र परम लघु असा सुलभ अर्थ आहे.

अत्यर्थम् = अत्यंत (दक्षिणावर्तनाथ)
= to the highest degree (आपटे)
= परम

"एव" पदानें परम हा अर्थ आणखी दृढ होतो. (टीप १ पहा.)

१९५ **टीप १**– इतका सुबोध अधिकृत अत एव दृढ अर्थ असतांही एक पदवीलांछित आक्षेपक म्हणतो– जून २१ च्या पूर्वींही कित्येक दिवस," रात्र अति लहान झाली " कसें म्हणणें शक्य आहे व तेंच कालिदासाला अभिप्रेत आहे. **परम तनुत्व अभिप्रेत नाहीं. याला उत्तर**– काय म्हणणें शक्य आहे, हें कोणी विचारिलें होतें ? कालिदासाचे शब्द आमच्यासमोर असतां त्याचें अभिप्रेत ठासून सांगणारे हे कोण ? मूळ प्रयोग सहेतुक एकवचनी (क्षणदा)

असतांही त्याचा बहुवचनी व तोही निष्कारण अर्थ करण्याचा अधिक प्रसंग काय म्हणून ? आणि या अधिक प्रसंगाच्या जोरावर **परम तनुत्व अभिप्रेत नाहीं,** हें आपटे-कोशाला देखील झिडकारणारें उन्मत्त विधान किती अमंगळ आहे, पहा बरें ! याला – जनाननें कः करमर्पयिष्यति – या नैषधोक्तीच्या जोडीला–

**न मा म्य था हं म ति शा लि नं त म् ।**

**एवंढेंच उत्तर** ठीक आहे ! कारण खालीं आणखी–

अत्यर्थं = अत्यन्त = परम.

असें ग्रंथोक्त प्रमाणच देतो. तें असें–

१९६ भगवद्गीतेच्या ७, १७ यांवरील परमार्थप्रपा-टीकेंत **अत्यर्थम् = अत्यतम्** असा अर्थ आहे, आणि ६, २८ यांतील **अत्यंतं सुखं = परमसुखम्** असा अर्थ स्पष्ट दिलेला आहे. यावरूनही–

अत्यर्थम् = अत्यन्तम् = परम

हाच अर्थ आपटे कोशाधारें व पुनः गीताटीकाधारें दृढतम होतो. अर्थात्– **अत्यर्थमेव तन्वी क्षणदा = परम तन्वी रात्र– हेंच अभिप्रेत सिद्ध होतें.**

१९७ **उभौ–** याचा अर्थ दिवस व रात्र ही जोडी.

## टीकाकारांचें विवरण.

१९८ **विरोध-क्रिया–** प्रणयकलह (मल्लिकभट्ट, अरुणगिरि)

१९९ **विभिन्नौ–** वियुक्तौ, पृथगवस्थितौ. (मल्लिकभट, अरुणगिरि)

असा केवळ अलंकारिक अर्थ देऊनच टीकाकार मोकळे झाले आहेत.

# प्रकरण ११ वें :　　　　खगोल परिभाषा.

## चिन्ह व स्थान; पारिभाषिक प्राबल्य.

### अ– पार्श्वभूमि.

( चिन्ह शब्दाचे इतर अर्थ विश्रुत आहेत. येथें आम्हीं त्याचा खगोलीय परिभाषेंतील विशिष्ट अर्थ देत आहो. )

२०० खगोल-शास्त्रांत, पूर्वचिन्ह, पश्चिमचिन्ह, योगतारा- स्थान, ग्रह-स्थान, शततारा-स्थान, रेवती-चिन्ह, ग्रहचिन्ह अशीं सहस्रशः चिन्हें येतात· त्याशिवाय गणिताची प्रवृत्ति, प्रगति होतच नाहीं. आकृति ४




आकृ. ४.

पहा. CB रविकक्षा; CA शनिकक्षा; A शनिबिंब; AB हा CB वर टाकिलेला लंब. B हा **बिंदु शनिचिन्ह म्हणजे शनिस्थान** होय. तसेंच C हा बिंदु पातचिन्ह आहे. आतां आकृति ५ पहा. B अश्विनी योगतारा; C अश्विनी चिन्ह व E हा **बिंदु रोहिणीचिन्ह** आहे· BC व DE हे दोन्ही रविकक्षेवर लंब आहेत. EA ही रविकक्षा आहे. याप्रमाणें




आकृ. ५.

सर्व ग्रहांचीं, नक्षत्रांची चिन्हें EA रविकक्षेवर येतात.

२०१ पोषक उतारे.

१ क्रांतिवृत्ते यत् ग्रहचिन्हं — — — (भास्कर पृ. ७४)
२ क्रांतिवृत्ते ग्रहचिन्हात् — — — (सूर्य सि. पृ. १४०)
३ मीनांते रेवतीचिन्हं कार्यम् — — — (ग्र. टी. पृ. ३०२)

लंबपोषक उतारा (लम्ब = सूत्र).

४ ग्रहचिन्हात् ग्रहोपरिगं सूत्रं — — (भास्कर पृ. ७४)

२०२ या चवथ्या उताऱ्यांत– ग्रहचिन्हावरून ग्रहबिंबावर जाणारें लंब सूत्र श्रीभास्कराचार्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे. आकृ. ४ मध्यें B या शनिचिन्हा-वरून A या शनिबिंबावर BA हें लंब सूत्र नेलें आहे.

२०३ षष्ठीतत्पुरुष.

१ रोहिणीचें चिन्ह तें रोहिणीचिन्ह — — — षष्ठीतत्पुरुष.
२ ग्रहांचें चिन्ह तें ग्रहचिन्ह — — — — „
३ अगस्त्याचें चिन्ह तें अगस्त्यचिन्ह — — — „

याप्रमाणें खगोलीय संदर्भात षष्ठीतत्पुरुषाखेरीज इतर विग्रह अनुपपन्न होतात.

२०४ चिन्ह व स्थान समानार्थक.

श्रीभास्करानें ग्रहचिन्ह, तर सूर्यसिद्धान्तांत ग्रहस्थान, असा निर्देश असला तरी बिचकण्याचें कारण नाहीं. दोन्ही शब्द रूढ व समानार्थक आहेत. पहा-

१ छायाप्रवेशनिर्गमस्थानयोः — — सूर्य. सि. पृ. ६८.
२ छायाप्रवेशनिर्गमचिन्हयोः — — भट्टोत्पल पृ. ८४.

म्हणून स्थान = चिन्ह – हें स्पष्ट आहे.

आतां प्रत्यक्ष अगस्त्यचिन्ह.

२०५ सूर्यसिद्धांतावरील स्वकृत टीकेंत (पृ. १५४) अगस्त्यध्रुव, अगस्त्य-शर सांगतांना–

स्वकीयात् क्रान्तिविभागस्थानात् दक्षिणस्यां अशीत्यंशैः तारात्मकः अगस्त्यः मिथुनांतगः ।

असा **श्रीरंगनाथानें** अगस्त्यस्थानांचा निर्देश केला आहे.

आकृ. १ पहा. AD रवि-कक्षा. AG विषुववृत्त. AB मेष. BC वृषभ. CD मिथुन. D बिंदू मिथुनान्तावर आहे. E अगस्त्यतारा. ED लंबसूत्र. D **हा बिंदु अगस्त्यचिन्ह आहे** आणि तें D मिथुनान्तावर आहे, हें आकृतींत स्पष्ट दिसतें.




आकृ. १.

श्रीरंगनाथाच्या वचनाचा अर्थ – रविकक्षे(AD)वरील आपल्या D चिन्हा-पासून दक्षिणेकडे ८० अंशावर तारात्मक E अगस्त्य आहे. सारांश E हा दृश्य तारा व मिथुनान्त-निष्ठ D बिंदू त्याचें चिन्ह आहे. अर्थात् अगस्त्याचें चिन्ह तें अगस्त्यचिन्ह हा षष्ठीतत्पुरुष पुनः सिद्ध.

## चिन्ह शब्दाचा रूढार्थ व रूढ षष्ठीतत्पुरुष.

२०६ **चिन्ह = रविकक्षेवरील बिंदूरूप स्थान = D बिंदु हा रूढार्थ व अगस्त्याचें चिन्ह तें अगस्त्यचिन्ह हा रूढ षष्ठीतत्पुरुष.**

२०७ **अगस्त्यचिन्ह इतरत्र कां आलें नाहीं ?** – अयन हें सतत चल असल्यानें कालिदासाहून इतर कालीं अयन मागें तरी पुढें तरी असणार. त्यामुळें कालिदासेतर-कालीन ग्रंथांत किंवा काव्यांत तो शब्द येणें शक्य नाहीं व म्हणूनच तो आलेला नाहीं. आला तर तो कालिदास-कालीन ग्रंथांतच येणार. कालिदासानेंही तो पारिभाषिक शब्द स्वकालीन खगोल ग्रंथांतीलच वापरला आहे. कारण अगस्त्यचिन्ह हा शब्द साहित्यक्षेत्रांत येतच नाहीं. म्हणूनच टीकाकारांना तो शब्द इतर कोठेंही सांपडलेला नाहीं व त्याचा पारिभाषिक अर्थही त्यांना समजलेला नाहीं.

# प्रकरण १२ वें : अगस्त्यबिन्दूची सुसंगतता.

## कालिदासोक्त अगस्त्यचिन्हांकित निवृत्तीची सुसंगता.

२०८ सूर्यचंद्रांच्या सतताकर्षणामुळें संपाताचें पश्चिमचलन होतें. त्यामुळें अयन-स्थानेंही चलित होणारच. या चलनाला **अयन-चलन** म्हणतात. **अयनाची गति**– अयन हा एक पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणारा अखंड प्रवासी आहे. तो ७२ वर्षांत एक अंश, २४० वर्षांत एक चरण, ९६० वर्षांत एक नक्षत्र, १६८० वर्षांत सात चरणें = २३ अंश २०, कला व १९२० वर्षांत आठ चरणें = दोन नक्षत्रें = २७ अंश, असा हा प्रवासी चळतो.

**निवृत्तीचे उपलब्ध निर्देश**– आकृति ६ पहा. सरळ उभी रेषा YZ विषुववृत्त, YZ वर्तुलाकार रेषा, रविकक्षा. खालून M V T वगैरे मेषादि राशि व A B C वगैरे अश्विन्यादि नक्षत्रें, व त्यांचीं चार चार चरणें, टिंबांनीं दाखविलीं आहेत. डावीकडे **अगस्त्यतारा** व उजवीकडे त्याचें **चिन्ह** W 280 A.D. दाखविलें आहे. EAST–WEST हा अयनाचा मार्ग उजवीकडे वरून खालीं आलेला दाखविला आहे. आतां पहा–

| इसवी सन | काल | बिन्दु | निवृत्तिस्थान |
|---|---|---|---|
| १) पूर्व २३६० | तैत्तिरीयसंहिता | R | **मघा अर्ध.** |
| २) पूर्व १८८० | मैत्र्युपनि० | – | **मघारंभ.** |
| ३) पूर्व १४०० | वेदांगज्यो० | J | **आश्लेषार्ध.** |
| ४) पूर्व ४४० | विश्वामित्र | H | **पुष्य अर्ध.** |
| ५) नंतर ४० | – | – | पुनर्वसू अन्त. |
| ६) नंतर २८० | कालिदास | W | पुनर्वसू ¾ |
| ७) नंतर ५२० | वराहमि० | P | पुनर्वसू ½ |
| ८) नंतर १९५५ | सांप्रत | – | आर्द्रारंभ. |



y
Summer Solstices.
EAST
N
L
S
R
2360 B.C.
1880 B.C.
1400 B.C.
J
K
H
440 B.C.
CANOPUS
अगस्त्य
चिन्ह
W
A.D. 280
P
A.D. 520
T
F
E
A.D. 1955
V
D
C
M
B
WEST
Z
A
ग्रंथोक्त उदगयननिवृत्ति.


आकृति ६.

२०९ याप्रमाणें गत ४३२० वर्षांतील १८ चरणांचा अयन-प्रवास या निबंधाच्या पुष्ट्यर्थं व वाचकरंजनार्थ दिला आहे. त्या त्या ग्रंथांतील निर्देशांवरून त्यांचे गणितलब्ध काळही मांडिले जाहेत. त्याचप्रमाणें अगस्त्य-चिन्हावरून कालिदासोक्त निवृत्तीचा इ. स. २८० हा काळ दिला आहे. या पंक्तींत अगस्त्यचिन्हांकित निवृत्ति किती सुसंगत बसते, तें नीट पहा. ती कविकल्पना नसून **गणिताधिष्ठित सत्य घटना** आहे, याची सर्वांची खात्री होईल. (पहा, ले. २२२)

२१० **कालसाधनाचा खुलासा**- त्या त्या ऋषींनीं – **मघार्ध, मघारंभ व आश्लेषार्ध** – असे निवृत्तिस्थलाचे निर्देश केले नसते, तर खगोलवेत्त्याला काल काढणें अशक्य होतें तसेंच कालिदासानेंही–

१) **अयनात् संनिवृत्तः** – एवढाच शुष्क निर्देश केला असता तर कालसाधन शक्य नव्हतें. २) किंवा कर्कारंभीं (पुनर्वसू तृतीय-चरणाच्या शेवटीं) **सूर्यः निवृत्तः** – असा निर्देशही रघुवंशांत येणें अस्थानीं झालें असतें, हेंही खरें आहे.

म्हणून (ले. १६६) दृष्टान्ताच्या सजावटींतील कुशराजाच्या अगस्त्य-चिन्हाशी (कंकणाशीं) अनायासें मेळ बसून दृष्टान्त रम्यतर होतो, या उद्देशानें **अगस्त्याच्या चिन्हाचा** त्यानें अन्तर्भाव केला. तो स्वकालीन निवृत्ति-स्थान-दर्शक असल्यानें कालसाधनार्थ उपयोगी पडला.

**आकृति ६ पहा** - डावीकडे **अगस्त्यतारा**,उजवीकडे त्याचें **चिन्ह** W हा सू. सि. प्रमाणें (कर्कारंभी म्हणजे) पुनर्वसू ३/४ वर स्पष्ट **दिसतो.** J च्या डावीकडील चरणात्मक बिन्दूपासून W पर्यंतच्या सात चरण चलनाला १६८० वर्षें लागतात. J च्या उजवीकडे **B. C. 1400** असा आंकडा आहे. अर्थात् १६८०–१४०० = २८० हें वर्ष आकृतींत दाखविलें आहे. ले. १७१ तील निर्णय या आकृतीनें पुष्ट झाला आहे.

**आणखी एक महत्त्वाचा निर्णय**– R पासून W पर्यंत म्हणजे वेदांग-ज्यो० ते कालिदासापर्यंत अंतर **सात चरणें** व R ते P म्हणजे वेदांगज्यो० ते वराहापर्यंत अंतर **आठ चरणें** होतात, हें आकृतींत स्पष्ट आहे. कालिदासा-नंतर एक चरणावर वराहकाल आहे. (एक चरण – २४० वर्षे) ——

# प्रकरण १३ वें : पहिली सीमा, वेदांगज्योतिष

२११ पुढील (ले. २३३) अयन-प्रवासाच्या कोष्ठकांत वेदांग-ज्योतिष ही पहिली सीमा घेतली आहे. म्हणून वेदांग-ज्योतिषाचा वादातीत प्रमाणाधारें काल-निर्णय करणें प्राप्त आहे.

२१२ दीक्षित, केतकर, सेनगुप्तासारख्या निष्णातांनीं वेदांग-ज्योतिषाचा इ. स. पूर्व १४०० हा काल पूर्वींच, स्वकालोपलब्ध स्वतंत्र प्रमाणांनीं ठरविला होता. तथापि आम्हांला इ. स. १९३३ सालीं उपलब्ध झालेल्या एका प्राचीन वादातीत प्रमाणाच्या आधारें त्याचा काल-निर्णय येथे केला आहे.

२१३ त्रिवेंद्रम् संस्कृत सीरीज् : मुद्रित क्रमांक ११० : **आर्यभटीयम् ;** नीलकण्ठ-सोमसुत्व-कृत महाभाष्यसहितम् ।

या महाभाष्यांत अयन-चर्चा करितांना प्रसंगवशात् बृहत्संहितेंतील (अध्याय २-२) प्रत्यक्ष वराहाचेंच वाक्य नीलकण्ठानें (पृ. ११ व १३) दोन वेळ उद्धृत केलें आहे, तें असे—

उक्ता भांशैः विकृतिः प्रत्यक्ष-परीक्षणैर्व्यक्तिः ।

२१४ **याचा अर्थ**— (वराहच स्वतः सांगतो) वेदांगज्योतिषोक्त—

आश्लेषार्धापासून आतां (इ. स. ५२०) पर्यंत २७ अंश अयन-चलन झालें, ही तज्ज्ञांची उक्ति प्रत्यक्ष परीक्षणानें व्यक्त आहे.

२१५ **वरील वराह-वचनावर नीलकण्ठाचें भाष्य**—

तच्चलन-परिमाणस्य परीक्ष्य निर्णयः<br>तद्वशात् फलविशेषश्च उपरितनेन<br>ग्रंथेन प्रदर्शितः ।

२१६ **या भाष्याचा अर्थ**— त्या अयन-चलनाच्या **परिमाणाचा** ( २७ अंश

या संख्येचा ) परीक्षणानें अनुभव घेऊन, वेधद्वारें, वराहानें हा फल विशेष दर्शविला आहे. **फलविशेष म्हणण्याचें कारण-** प्रत्यक्ष परीक्षणानें व्यक्त अशी अयन-चलन-संख्या कोणत्याही अन्य ज्योतिषज्ञानें दिलेली नाहीं. अशी अंतररूपीं अयन-अंश-संख्या केवळ वराहानेंच दिली आहे.

२१७ **टीप-** उक्ता भांशैः -या शुद्ध पाठाऐवजीं- उक्ताभावे, उक्ताभावो उक्ता भावे- असे निरर्थक पाठ कांहीं पोथ्यांत आहेत. निरर्थक म्हणण्याचें कारण- नीलकंठाच्या, तच्चलन-परिमाणस्य या निर्देशावरून, अयन-चलनाचें परिमाण म्हणजे संख्यादर्शक आंकडा मूल वराहोक्तींत आहे, हें स्पष्ट आहे.

२१८ भ = २७ ( २७ नक्षत्रें ); भांशाः = २७ अंश, खगोल-शास्त्रांत हा शब्द व अर्थ अत्यंत रूढ आहे. पहा- ग्रहलाघव, रविचंद्र-स्पष्टाधिकार श्लो. ७- भाप्तं च द्युमणिफलं विधौ विलोमम् ।- मल्लारि-टीका- भाप्तं सप्तविंशतिभक्तम्- येथें भ = २७, भाप्तं = २७ नीं भागिलेलें- असा रूढ अर्थ आहे.

२१९ आतां २७ अंश = दोन नक्षत्रें; वेदांगोक्त आश्लेषार्धाच्या माग दोन नक्षत्रें म्हणजे पुनर्वसूचा अर्ध, हा प्रत्यक्ष वराहोक्तीनेंच सिद्ध झाला. अर्थात् वराहकालीं ( इ. स. ५२० या वर्षी ) पुनर्वसू अर्धावर उदगया-निवृत्ति झाली.

२२० ले. २०८ मधील कोष्ठकाप्रमाणें २७ अंश चलनाला १९२० वर्षें लागतात. यांतून १९२० - ५२० = १४०० ( इसवी सन पूर्व ) हा वेदांगज्योतिषाचा काळ सिद्ध झाला.

२२१ प्रत्यक्ष वराह-वचनावरून सिद्ध केलेला इ. स. पूर्व १४०० हा काळ आतां वादातीत आहे.

२२२ प्रोफेसर **सेनगुप्ता लिहितात-**

We next have the record that the sun turned South at the beginning of Magha-Nak; (See मैत्र्युप प्र. ६) The date of this on the basis of the पंचसि० Nak-divisions the oldest at present known, is about B. C. 1880.

२२३ Then as we come to Ved-Jyo-Time, we meet with a statement that the Sun turned South at the middle of Ashlesha-Nak. If we accept the same पंचसि० Nak-Divisions the time of this comes to B. C. 1400.

२२४ Note- Archdecon Pratt made a mistake by taking the beginning of Magha, at 9 degrees behind the Star Regulas ( मघा ); the beginning of Magha is placed, according to पंचसिद्धांतिका, at 6 degrees behind the same star. His date B. C. 1181, must therefore be pushed back by about 216 years, the correct date would be about B. C. 1490. [ Page XXXIV, Burgess ].

## तंतोतंत जमतात.

२२५ प्रस्तुत लेखाच्या ( ले, १९०, आकृ. ६ ) नकाशांत मीं दिलेल्या वालाशीं सेनगुप्तांचे वरील काल तंतोतंत जमतात. यावरून मीहि पंच-सिद्धांतिकोक्त स्थिर-नक्षत्र-विभागच स्वीकारले आहेत, हें स्पष्ट आहे,

## एकच स्थिर नक्षत्र चक्र.

२२६ वराहमिहिरानें पं. सि. सूर्य सि. तील कर्कारंभ, वेदांगज्योतिषोक्त स्थिर आश्लेषार्धापासून सात चरणांवर सांगून स्वकालीन कर्कारंभ त्याच स्थिर आश्लेषार्धापासून ( उक्ता भांशे- ले. २१४ ) आठ चरणांवर आहे, असें स्पष्टतम शब्दांत स्वतःच सांगतो. या महत्त्वाच्या निर्देशानें- तैत्तिरीय

१४५३...



ब्राम्हण, मैत्र्युपनिषत्, वेदांगज्योतिष, प्राचीन सूर्यसिद्धांत व स्वतः वराह-मिहिर– या सर्वांनीं एकच पारंपरिक स्थिर-नक्षत्र-चक्र स्वीकारलें होतें, हें स्पष्ट होतें. याच चक्राचा स्वीकार आम्हीं केला आहे, हें निराळें सांगणें नलगे. प्रा. सेनगुप्तांनीं ले. २२३-२२४ मध्यें याचा संदर्भ दिला आहे. ले. २०८, आकृति ६ मध्यें तर हें स्थिर-नक्षत्र-चक्र प्रत्यक्षच दाखविलें आहे.

## दुसरी सीमा.

पुढील ले. २३३ मध्यें– दुसरी मर्यादा– इ. स. ५२० हें वर्ष दिलें आहे.

## ले. २३५– अयनप्रवासकोष्ठक-रचना.

यांत पांच उभे स्तम्भ आहेत. प्रथम स्तम्भांत अ, ब, क, ड, व, हीं पांच अक्षरें क्रमवार आहेत. दुसऱ्या स्तम्भांत –१४००, –४४०, + ४०, + २८०, + ५२० हीं वर्षें दिलीं आहेत. तिसऱ्यां स्तम्भांत आश्लेषा $\frac{1}{4}$, पुष्य $\frac{1}{2}$, पुनर्वसू-अंत, पुनर्वसू $\frac{3}{4}$, पुनर्वसू $\frac{1}{2}$ अशीं निवृत्ति-स्थलें दाखविलीं आहेत. चवथ्या स्तम्भांत अश्विन्यारम्भापासूनचीं अंतरें दिलीं आहेत. पांचव्या स्तम्भांत निर्देशक दाखविले आहेत.

## मिथुनान्त = पुनर्वसू $\frac{3}{4}$

कालिदासकालीन निवृत्ति पुनर्वसू ३/४ वर होती. ही फक्त ड– पंक्तीतच आहे. इतर अ, ब, क, व, या चार पंक्तींत भिन्न स्थलीं आहे.

## अश्विन्यारम्भापासून अंतर ९० अंश.

वरील मिथुनान्त = ९० अंश होत. हे फक्त ड– पंक्तींतच आहे. इतर अ, ब, क, व या चार पंक्तींत ९० अंशाहून भिन्न म्हणजे कालिदास-निर्दिष्टाहून भिन्न आहेत. म्हणून–

## **ड– पंक्ति एकच कार्यनिर्वाहक आहे.**

म्हणून ती जाड टाईपांत दिली आहे.

---

# प्रकरण १४ वें :

## आतां खगोलदृष्टया काल-साधन.

२२७ वाचनिक प्रमाणावरून सुलभ कालसाधन मागें लें. १७८-१७९ यांत केलें आहे, आतां खालीं गणितगौरवपूर्वक खगोलीय समारंभांत काल-साधन करितो.

२२८ कालिदास स्वकालिन निवृत्तीचा उल्लेख करून मोकळा झाला. पण त्या मागील गणितगौरवाचीं लक्षणें पहा—

### चार अटी.

२२९ अगस्त्यचिन्हांकित अयन-निवृत्ति व्हावयाची म्हणजे– खगोलदृष्टया

1) वसंतसंपातापासून सूर्य हा तीन राशि ☰ ९० अंशावर असला पाहिजे.
2) अगस्त्यचिन्हही तेथेंच ९० अंशावर असलेंच पाहिजे.
3) तेथेंच मिथुनान्त ( = ९०) असला पाहिजे.
4) तेथेंच पुनर्वसुतीनचतुर्थांश (अंश ९०) असला पाहिजे.

या चार अटी एकसमयावच्छेदेंकरून एकत्र जमल्या पाहिजेत.

२३० **या चार अटी सिद्ध आहेत.**

**अट १–** शास्त्रदृष्ट्या वसंतसंपातापासून सूर्य ९० अंशावर निवृत्त होतो. कालिदासानें– भास्वति संनिवृत्ते – निवृत्त झाला, असें सांगितल्यानें तो ९० अंशावर होता.

**अट २–** अगस्त्यचिन्हावर सूर्य निवृत्त झाला– या कालिदासोक्तीवरून तें अगस्त्यचिन्ह ही मिथुनान्ती ९० अंशावर असलेंच पाहिजे. पंचसिद्धांतिकेंत अ. १४ श्लो. ४० यांत, अगस्त्य मिथुनान्तीं ९० अंशावर स्पष्ट सांगितला आहे.

अट- ३ अगस्त्यो मिथुनान्तगः - या सूर्य. सि. अ. ८ श्लो. १० या वरून तेथें मिथुनान्त (९० अंश) आहे.

अट ४- मिथुनान्त म्हणजेच पुनर्वसू ३/४ ( बरोबर ९० अंश ) या प्रमाणें ले. २२९ तील व तसेंचले. २३५- कोष्ठकांत ड- पंक्तींतील क्रमिक चारी अटी सिद्ध आहेत.

## चारी अटींसह

## कालिदासोक्त निवृत्तीचें प्रत्यक्ष चित्र.

२३१ आकृ. १ पहा. D हा बिंदु A या वसंतसंपातापासून तीन राशी ९० = अंशावर आहे. या D बिंदूवर १) सायनसूर्य आहे. २) तेथेंच अगस्त्यचिन्ह आहे. ३) तेथेंच D हा मिथुनान्त बिंदु आहे. (४ पुनर्वसू ३/४ ही आहे. सूर्य D या बिंदूवर अयन-समाप्ति करून आहे. या प्रमाणें ४४ व्या श्लोकाचें वाचकांना प्रत्यक्ष दर्शन या आकृतींत घडतें.




आकृ. १.

## हा चार अटींचा योग कोणत्या वर्षी येतो ?

२३२ प्रथम निवृत्तीच्या खगोलीय चार अटी सांगितल्या. नंतर कालिदासाच्या उक्तींत चार अटी सिद्ध आहेत, हें दाखवून, अगस्त्यचिन्हांकित-निवृत्तीचें प्रत्यक्ष खगोलीय चित्रही दिलें. आतां या चार अटींचा एकसमयावच्छेदेंकरून योग कोणत्या वर्षी येतो, तें निश्चित करण्याकरितां आपणांस खालील (ले. २३५) कोष्ठकाचें साहाय्य घेतलें पाहिजे. (पहा पृ. १०१)

२३३ **पहिली मर्यादा**– प्रपद्येते श्रविष्ठादौ सूर्याचांद्रमसासुदक्। सार्पार्धे दक्षिणार्कस्तु.... ॥७॥ या वेदांगज्योतिषांतील उक्तीवरून इ. स. पूर्व १४०० या काली आश्लेषार्धावर उदगयन-निवृत्ती झाली. (ले. २२०)

**दूसरी मर्यादा**– वराहकालीं इ. स, ५२० या कालीं पुनर्वसू अर्धावर (लें. २१९) निवृत्ति झाली.

२३४ **अयन-प्रवास-कोष्ठक**– इ. स. पूर्व १४००, आश्लेषार्ध ही एक मर्यादा व इ. स. ५२०. पुनर्वसू अर्ध ही दुसरी मर्यादा. या दोहोंतील १४०० + ५२० = १९२० वर्षें कालांतर येतें. या १९२० वर्षांतील अयन-प्रवासाचें कोष्ठक खालीं दिलें आहे.

## अयन-प्रवास-कोष्ठक– ड– पंक्ति.

२३५ सूचना– चवथ्या रकान्यांत अंतर म्हणजे आश्विन्यारंभापासून अंतर जाणावें.

| क्रम (१) | वर्ष (२) | अयन-स्थान (३) | अंतर (४) अं | क | निर्देशक (५) |
|---|---|---|---|---|---|
| | इ.स. पूर्व | | | | |
| अ | -१४०० | आश्लेषा १/२ | ११३ | २० | वेदांग ज्यो. |
| ब | - ४४० | पुष्य १/२ | १०० | ० | विश्वामित्र |
| | इ.स. नंतर | | | | |
| क | + ४० | पुनर्वसू अन्त | ९३ | २० | – |
| ड | + २८० | १) सूर्य | ९० | ० | पं. सि सूर्य |
| | | २) अगस्त्यचिन्ह | ९० | ० | सि. १४, ४० |
| | | ३) मिथुनान्त | ९० | ० | तदनुषंगानें |
| | | ४) पुनर्वसू ३/४ | ९० | ० | कालिदास |
| व | + ५२० | पुनर्वसू १/२ | ८६ | ४० | वराह |

**कोष्ठकावरून योगाचा काल इ.स.२८०. ड–पंक्ति एकच कार्यकर्ती.**

२३६ ले. २२९ क्रमांक एक यांतील, अयन-निवृत्तिकालीन सूर्य ९० अंशावर असला पाहिजे– ही प्रमुख अट पाहतां, कोष्टकांतील उभ्या ४ थ्या रकान्यांतील अ, ब, क, व या चारांसमोरील अंतरें ९० अंशापेक्षां कमी-अधिक असल्यानें तीं सारीं गैरलागू आहेत. ड– पंक्तींत मात्र, १) सूर्य ९० अंश– असें स्पष्ट आहे. अर्थात् ती एकच पंक्ति प्रस्तुत कार्यकर्ती आहे. त्याच पंक्तींत १, २, ३ व ४ या चारी अटी सिद्ध आहेत. तसेंच ड– पंक्तींत उभ्या दुसऱ्या रकान्यांत +२८० हें वर्ष दिलें आहे. त्यायोगें कालिदासोक्त अगस्त्यचिन्हांकित अयन निवृत्तीचें वर्ष +२८० निश्चित होतें. इ. स २८० या वर्षीं हा योग घडून आला.......आतां प्रस्तुत निवृत्तीचें–

## कालिदासोक्त सर्वलक्षणयुक्त निदर्शन.

२३७ आकृति ७ पहा. १) P बिंदूवर अयन-निवृत्त सूर्य आहे. त्याच क्षणीं, २) P बिंदूवर अगस्त्यचिन्ह ९० अंश आहे. ३) मिथुनांत ९० अंश आहे. ४) पुनर्वसू $\frac{3}{4}$ = ९० अंश आहे. ५) सायनसूर्य ९० अंश आहे. ६) उत्तरा-समीप आहे. ७) PS परमदीर्घ दिवस आहे. ८) ST परमलघु रात्र आहे. ९) दिनरात्र-विरोध आहे. १०) जून २१ आहे. ११) इ.स. २८० दिलें आहे.




आकृति ७.

सूचना– लक्षणें १–९

पर्यंतचीं सारीं कालिदासोक्त आहेत. हा योग जून २१ इ. स. २८० या वर्षीं येतो. म्हणून १०, ११ हे क्रमांक आकृतींत दाखविले आहेत.

२३८ रघुवंशांतील श्लोकोक्त घटनेचा काल इ. स. २८० हें वर्ष येतें. रघुवंश हा कालिदासाचा वार्धक्यांतील प्रशांत, गंभीर व अर्थवट सोडलेला अतएव शेवटचा ग्रंथ आहे. हा सर्व विचार करतां—

**कालिदास इसवी सनाच्या तिसऱ्या शतकांत होऊन गेला.**

विवेकोक्ति.

२३९ ही घटना इ. स. २८० या वर्षीं झाली, यांत वावगें काय आहे ? ही निवृत्ति कालिदासकालीं झाली, यांत तरी वावगें काय आहे ? स्वतःच्या कालीं ती घटना घडली म्हणूनच सुसंगतपणें उत्कृष्ट दृष्टांतांत गुंफून सांगितली, यांत कालिदासानें काय वावगें केलें ? कालिदास प्रथम कवि होता, तरी खगोलाची आवड असल्यानें स्वकालीन अयन समजून घेणें दुष्कर होतें काय ? प्रसिद्ध संशोधक श्री. रा. गो. भांडारकर ज्योतिषज्ञ नव्हते. कालज्ञानी नव्हते. तरी त्यांना हवी ती माहिती प्रसिद्ध ज्योतिर्विद श्री. के. ल. छत्रे पुरवीत असत. ( पहा– ग्याझेटीअर, मुंबई इलाखा, पृ. २६० ओळ ५ वी ) हें ताजें उदाहरण काय सांगतें ?

खग्रास ग्रहणांतून सुटून रोहिणीशीं युक्त झालेल्या चंद्राची उपमा कालिदासानें दुष्यन्ताला दिली आहे ना ?

**ले. १२२ पहा. चंद्राचें** रात्रित्रयात्मक अदृश्यत्व खगोलदृष्ट्या समजून घेऊन त्याचा उपयोग (रघु. ७-३३) एका सुंदर पूर्णोपमेंत कवीनें केला आहे नां ?.... या श्लोकावरील टीकेंत एकाही टीकाकारानें किंवा अर्वाचीन मराठी किंवा आंग्ल टीकाकारांनीं या "तीन रात्रीचें" स्पष्टीकरण केलेलें नाही. कारण त्यांना तें कळणें शक्य नाहीं. एका बिकानेरच्या पंडिताला जेव्हां आम्हीं (ले. १२३) त्यांतील खगोलीय मर्म कळविलें, तेव्हां कालिदासाचे खगोलीय संदर्भदेखील शास्त्रप्रसक्त, सत्यनिष्ठ असतात, हें त्याला पूर्ण पटलें. असेंच प्रस्तुत खगोलीय प्रमाणही सत्यप्रेमी काव्यपटूंना सहज पटेल, आग्रहग्रस्तांना न पटलें तरी चालेल.

# कवि कालिदास-काल.

## भाग ४ था.

प्रकरणें १५–१६ अखेर.

## टीकाकार-विभाग.

( ले. २४०-२६६ )

१ पुढील १५ व्या प्रकरणांत त्या त्या टीकाकारांची संस्कृत टीका देण्याऐवजीं त्यांचें **मराठी रूपांतरच दिलें आहे**. त्यायोगें सामान्य वाचकांना टीकाकारांचें प्रतिपादन निरायासें ध्यानीं येईल.

अगस्त्यचिन्ह.

२ **अगस्त्यचिन्ह**– याचा अर्थ लावतांना, **दक्षिणावर्तनाथ**, **मल्लिकभट**, **हेमाद्रि**, **चारित्र्यवर्धन**, **मल्लीनाथ**, **बिजयगणि** यांच्यासारख्या पटाईत. ज्ञानप्रफुल्ल टीकाकारांची देखील कशी तारांबळ उडालेली आहे, पहा, मग **अलीकडील पदवीधर टिप्पणीकारांची** त्रेधा उडेल, यांत नवल तें काय ? त्यांच्याशीं केलेल्या पत्रव्यवहारांत व्यापक, सखोल, निमज्जनाच्या अभावीं केवल अहंकार, दुराग्रह व विजिगीषा यांचाच शुष्क बाजार दिसून आला. टीकाकारांनीं केलेल्या अप्रयुक्त अर्थाचाच पुरस्कार व पुनरुच्चार त्यांनीं केला. याशिवाय अधिक ते तरी काय करणार ?

३ म्हणून अर्वाचीन पदवीलांछितांच्या अर्थाचा विचार न करतां प्रत्यक्ष टीकाकारांच्या अर्थाचाच विमर्श आम्ही येथे केला आहे. तो वाचकांनीं **शांत चित्तानें वाचावा**, अशी विनति.

**सूचना**– खगोलीय परिचयाभावीं टीकाकारांनीं केलेल्या अर्थाचें आम्हांला सादर कौतुकच वाटतें. (पहा पृ. ५८, शेवटची ओळ) परंतु वाङ्मयपरिघावरील अर्वाचीन साहित्यप्रवीणांच्या नीरस व आग्रहग्रस्त पुनरुच्चारांतील अहंमन्यता कोणास आवडेल ?

## प्रकरण १५ वें :

### श्लो. ४४– टीकाकारांच्या अर्थाचा विमर्श.

( भक्तिरेव गमिता न तु शक्तिः – प्र. रा. )

२४०

अगस्त्यचिन्हात् अयनात् समीपम् ।
दिगुत्तरा भास्वति संनिवृत्ते
आनंद .. बाष्पवृष्टि .. ससर्ज ॥

२४१ चारित्र्यवर्धनाच्या मतें (सपत्नीसाम्य)

१) दक्षिणदिशा-रूपी सपत्नीला टाकून सूर्य आपल्या जवळ आला, म्हणून उत्तरेला आनंद झाला.

२) अगस्त्य दक्षिणेकडे राहतो म्हणून, अगस्त्यचिन्ह = दक्षिणायन

२४२ मल्लीनाथाच्या मतें (सपत्नीसाम्य)

१) जेव्हां नायक दक्षिण-अंगनेला टाकून दुसरीकडे जातो, तेव्हां त्या दुसरीला आनंदाश्रु येतात.

२) येथें अगस्त्यचिन्ह हें सपत्नी साम्याचें लिंग आहे.

३) अगस्त्य चिन्ह = दक्षिण दिशा.

२४३ दक्षिणावर्तनाथाच्या मतें (गमन-साम्य)

१) अगस्त्यचिन्ह या पदांत सपत्नीसाम्य नाहीं. कारण स्त्रीलिंग-निर्देश नाहीं. तर कोणतें साम्य ? याचें उत्तर–

पूर्वी भगवान् अगस्त्य दक्षिण दिशेला गेला. तो अद्याप परतला नाहीं. तद्वत् हा माझा त्याच मार्गानें गेलेला पति काय करतो ? या भीति समयीं सूर्य परत आल्यामुळें उत्तरेला आनंदाश्रु आले.

२) अगस्त्यचिन्ह = अगस्त्यसदृश; (मूळ- तद्वत्)

२४४ हेमाद्रीच्या मतें (गमन-साम्य)

१) स्त्री लिंग-निर्देश नाहीं, म्हणून गमन-साम्य. (सपत्नीसाम्य नाहीं.)

२) अगस्त्यचिन्ह = अगस्त्यसदृश.

उतारे वगैरेंच्या बाबतींत दक्षिणावर्त व हेमाद्रि तंतोतंत सारखे.

## टीकाकारांच्या वरील प्रस्तावावरून चार प्रमुख भेद.

अ) चारित्र्यवर्धन, मक्किभट्ट वगैरे.

ब) दक्षिणावर्तनाथ, हेमाद्रि वगैरे.

२४५ १) संदर्भ-वैषम्य.

अ अगस्त्यचिन्ह- या पदांत 'सपत्नीसाम्याचें' चिन्ह आहे,

ब अगस्त्यचिन्ह- या पदांत 'स्त्रीलिंग-निर्देश' नाहीं म्हणून सपत्नीसाम्य नाहीं- तर केवल गमन-साम्य आहे.

२४६ २) शब्दार्थ-वैषम्य.

| | | |
|---|---|---|
| मक्किभट. अगस्त्यचिन्ह | = | दक्षिण दिशा |
| चारित्र्यवर्धन ,, | = | दक्षिणायन |
| ब. ,, चिन्ह | = | अगस्त्यसदृश |

२४७ ३) वाक्यार्थ-वैषम्य

अ) दक्षिणा-अंगनाकडे गेलेला सूर्य.

ब) अगस्त्यमुनीसारखा गेलेला सूर्य.

२४८ ४) आनंद-हेतु-भेद.

अ) दक्षिण अंगनेला टाकून सूर्य परत आला, म्हणून उत्तरेला

आनंद.

ब) गेलेला सूर्य परत आला म्हणून उत्तरेला आनंद.

२४९ तारांबळ.

अगस्त्यचिन्ह या खगोलीय पारिभाषिक शब्दाला साहित्यक्षेत्रांत ओढणाऱ्या टीकाकारांची परस्परांच्या विरुद्ध कशी तारांबळ उडाली आहे, हें वरील चार प्रकारच्या वैषम्यांवरून स्पष्ट दिसत आहे.

२५० अगस्त्यचिन्ह – पूर्ण अपरिचित.

पूर्वोक्त, संदर्भ, शब्दार्थ, वाक्यार्थ, आनंद हेतु, या चारी दृष्टींनें पाहतां टीकाकारांना अगस्त्यचिन्ह हा शब्द पूर्ण अपरिचित आहे. त्याचा एकमुखी अर्थ त्यांना कळला नाहीं. कारण साहित्य-वाङमयांतील शब्दच तो नाहीं. म्हणून त्यांच्या वाचनांतही तो आला नाहीं तो सांकेतिक किंवा पारिभाषिक शब्द आहे. तो खगोलीय शब्द आहे. अगस्त्यध्रुव, अगस्त्य-विक्षेप, अगस्त्यचिन्ह या पंक्तींतील (ले. २०५ पहा.) तो शब्द आहे, परिचयाशिवाय तो कळणें शक्य नाहीं, म्हणूनच तो कळला नाहीं.

२५१ अप्रस्तुत अर्थ.

अयन म्हणजे दक्षिणोत्तरापैकीं एक, हें विदित असूनही, अगस्त्य-चिन्हाचा अर्थ न कळल्यामुळें–

१) अयन = गमन, हा अनुपपन्न अर्थ घेऊन

२) चिन्ह = सदृश, असा असंगत अर्थ धरून

३) अगस्त्यचिन्हायन, असें एक अनधिकृत अयन कल्पून त्या पंक्तीचा एक अप्रस्तुत अर्थ टीकाकारांनीं तयार केला. परंतु कालिदासानें अयन = गमन, मार्ग, या अर्थानें तो शब्द कोठेंही उपयोजिला नसल्यानें मूले कुठारा-प्रमाणें ही सर्व खटपट फुकट गेली आहे.

अनुचितार्थता-दोष.

२५२ टीकाकारांच्या या अप्रस्तुतार्थानें कालिदासाच्या अंगीं अनुचितार्थता

हा काव्य दोष मात्र चिकटविला गेला आहे. कसा तो पहा–

> अगोदरच उत्तरदिशा अचेतन; तिला सूर्यनिवृत्तीनें आनंद होणें हेंच आधीं असंभवनीय आहे. त्या उत्तर दिशेला, आणखी, 'अगस्त्यमुनीचें प्राचीन दक्षिण-गमन, त्याची अद्याप अनिवृत्ति, याचें स्मरण होणें; सूर्यही तसाच गेला तरी परत आला हें फलभेद-ज्ञान झालें, हा सर्व तिच्यावर बलात्कार वा हेय कल्पना-गौरव आहे. (काव्यप्रकाशाधारें)

२५३ सूर्याच्या निवृत्तीनें तिला आनंद झाला. एवढयानेंच सर्व शोभून जातें. म्हणून मम्मटानें बजाविल्याप्रमाणें–

**व्यर्थ एव तत्समर्थनायां यत्नः।** (काव्यप्र०)

आणखी याच्यापुढें जाऊन, त्या आनंदाच्या उपपत्तीची आणखी असंभवी खटपट व्यर्थ आहे.

२५४ **सारांश.**

टीकाकारांची आनंदहेतूच्या उपपत्तीची सारी खटपट ( त्या पंक्तीचा अर्थ नसून ) अनुचितार्थता मात्र दोष आहे.

२५५ **कालिदासाची पंक्ति पहा.**

**घर्मारूढ गतिमान सूर्य अगस्त्यचिन्हाला पोंचून उत्तरेकडे (उदगयन–) निवृत्त झाला व तिला आनंद झाला.**

हा पारिभाषिक निर्दोष अर्थ कसा सुबोध आहे. यांत अगस्त्यचिन्ह सत्य, अयन-निवृत्ति सत्य, उत्तरेजवळ सूर्यागमन सत्य, एवढया सत्य सामग्रीच्या आधारें कवीनें– उत्तरेला आनंद झाला– असा एक कोमल अलंकार गुंफिला. कालिदासाची पंक्ति अशी सोज्वळ आहे.

## साहित्यदृष्टया उत्तुंगप्रतिभाबोधक व
## खगोलदृष्टया उपपन्न
## असा
## आजपर्यन्त लोपलेला अर्थ.

२५६ **सूचना**– टीकाकारांच्या अप्रस्तुत अर्थामुळें आजपर्यंत लोपलेला हा कालिदासोक्त रघु. सर्ग १६, (४३-४४-४५) अगस्त्यचिन्हांकित उदगयन-निवृत्तीचा काव्यप्रचुर, यथार्थ व पारिभाषिक अर्थ आम्हीं प्रांजळ मनानें, प्रामाणिक श्रमानें, साधार, साकृति व सानंद उघड मांडिला आहे. या विशुद्ध मांडणींत आग्रह नाहीं. अभिनिवेश नाहीं. त्यावरून खगोलवेत्त्याला शोभेल अशा चिकित्सक पद्धतीनें कालिदासोक्तीचें परीक्षण करून कालिदासाचा काल काढिला आहे.

# प्रकरण १६ वें :

## श्लो. ४४– टीकाकारांचा अर्थ अप्रस्तुत.

( मौलिरेव नमितो न तु चापः । [प्रस. राघव.] )

२५७ कालिदासाचा खगोलाशी काव्यप्रांताला अवश्य तेवढा परिचय होता. तसा टीकाकारांचा परिचय नव्हता. त्यामुळें रेवतीचिन्ह, ग्रहचिन्ह, अगस्त्य-चिन्ह यांचे पारिभाषिक अर्थ निसटले. अगस्त्यस्य चिन्हं = अगस्त्यचिन्ह हा पारिभाषिक षष्ठीतत्पुरुष ही गेला. त्यामुळें त्यांना कृत्रिम किंवा लाक्षणिक अर्थाकडे धांव घ्यावी लागली.

२५८ **अगस्त्यचिन्ह = दक्षिण– याची जुळवाजुळव**– उत्तरेला आनंद व्हावयाचा तर सूर्य तिच्याकडे आला पाहिजे. पण मूळांत 'संनिवृत्त' असा शब्द आहे. अर्थात् कोणत्या अयनापासून संनिवृत्त झाला– याचें ठरा-विक उत्तर– दक्षिणायनापासून निवृत्त झाला. तर मग 'दक्षिणायनापासून' याला मूळांत शब्द कोणते ? याचें उत्तर– अगस्त्यचिन्हात् अयनात् हें उरलेले दोन शब्द होत. म्हणून, अगस्त्यचिन्हात् अयनात् = दक्षिणायनात् असा अर्थ टीकाकारांना जुळवावा लागला, हें स्पष्ट आहे. (ले, ११५ पहा.)

२५९ **लक्षणा-स्वीकार**–दक्षिणायन यापैकीं अयन हा शब्द मूळांत आहे. बाकी उरला दक्षिण. त्याकरितां–अगस्त्य दक्षिणेंत राहतो म्हणून आश्रयाश्रितसंबंधा-धारें लक्षणेनें-अगस्त्यचिन्ह = दक्षिण असा अर्थ त्यांनीं(चारित्र्यवर्धनानें)दिला.

२६० **विवाद्य-स्थळें**– या स्वीकारांत १) लक्षणा, २) बहुव्रीहि, ३) विशेषण-विशेष्यभाव हीं तीन्हीं गृहीतें विवादास्पद अतएव अनुपपन्न आहेत. ( पहा ले. १३३, १३४)

२६१ **१ लक्षणा**— अगस्त्य = दक्षिण नव्हे; चिन्ह = दक्षिण नव्हे; अगस्त्यचिन्ह = दक्षिण नव्हे. म्हणून 'स्थितस्य गतिचिंतनं' व 'अगत्या लक्षणावृत्तिः' या कुमारिलोक्तीप्रमाणें टीकाकारांनीं लक्षणा स्वीकारली.

परंतु येथें लक्षणा टिकत नाही. कारण लक्षणेंत- १) मुख्यार्थबाध, २)तद्योग ३) रूढी वा प्रयोजन या तीन अटी एककालीं, एकस्थलीं पाहिजेत. तिहीं पैकीं एक अट चुकली तर लक्षणा असिद्ध होते. प्रस्तुत स्थळीं ( ले. २०३ ) अगस्त्याचें चिन्ह तें अगस्त्यचिन्ह हा षष्ठीतत्पुरुषात्मक पारिभाषिक मुख्यार्थ प्रस्तुत श्लोकांत (ले. १३८) व्यवस्थित वसतो. मुख्यार्थबाध होत नाहीं. त्यामुळें कुमारिलोक्त अगति येथें उद्‌भवत नाहीं. या प्रमाणें पहिलीं अट असिद्ध म्हणून लक्षणा असिद्ध. अगस्त्यचिन्ह = दक्षिण या रूढीचे प्रयोगही इतरत्र कोठेंही आलेले नाहींत. हा एकच प्रयोग आहे. म्हणून रूढीची अट देखील असिद्ध. अर्थात् लक्षणा पुनः असिद्ध.

२६२ **सर्वही असिद्ध**– लक्षणा असिद्ध तर बहुव्रीहि विग्रह असिद्ध. बहुव्रीहि असिद्ध तर 'दक्षिण' हा अर्थही असिद्ध, व दक्षिण असिद्ध तर, अगस्त्य-चिन्हात्, अयनात् या दोहोंत कल्पिलेला विशेषण-विशेष्य-भावही असिद्ध. सारांश सर्वही असिद्ध. मुद्दाम पहा, ले. १३७, १५६, १५८.

२६३ प्रस्तुत स्थळीं दिशा कालिदासाला उद्दिष्ट नाहीं. कारण निवृत्तीच्या घटनेंत दिशेची जरूर नसते– दिशा उद्दिष्ट असतेवेळी कवि, दिशा, दिक् व आशा असे स्वतंत्र स्पष्ट शब्द वापरतो. पहा–

१) **ततः प्रतस्थे कौबेरीं ...... दिशम्** (रघु.४, ६६)
२) **कुबेरगुप्तां ............ दिशम्** (कु. ३, २५)
३) **धनदाध्युषितां .......... दिशम्** (रघु. ९, २५)
४) **अगस्त्याचरिताम् ........ आशाम्** (रघु. ४, ४४)

प्रस्तुत श्लोकांत ' दिशा ' शब्द नसल्यानें ' अगस्त्यचिन्ह ' = दक्षिण हा अर्थ होत नाहीं. ' उदग्विरुद्धात् अयनात् समीपं '– असा प्रयोग करणें कवीला कठीण नव्हतें.

२६४ **अगस्त्य हा अयनाचें चिन्ह नाहीं**– ' याम्याशावनितामुखविशेष-तिलको मुनिरगस्त्यः । ' या वराहोक्तीवरून, अगस्त्य हा, अयनाचा, गम-

नाचा, पथाचा किंवा मार्गाचा तिलक नाहीं. तो केवल दक्षिणदिशेचा तिलक आहे, चिन्ह आहे. म्हणून अगस्त्यचिन्ह = दक्षिण हा अर्थ होत नाहीं.

**ते रेखाध्वजकुलिशातपत्रचिन्हम् ।**
**सम्राजश्चरणयुगं प्रसादलभ्यम् ॥** रघु. ४, ८८

येथें रेखा, ध्वज वगैरे चरणयुगाला चिकटलीं आहेत. म्हणून येथें विशेषण-विशेष्य-भाव उचित आहे. परंतु अगस्त्यचिन्ह हें याम्य दिशेला चिकटलें आहे, तसें अयनाला चिकटलेलें नाहीं. म्हणून अगस्त्यचिन्हात् व अयनात् या दोहोंत विशेषण-विशेष्य-भाव मुळींच नाहीं. खरा अर्थ अपरिचित, म्हणून निकटच्या दोन शब्दांचें रूप-साम्य ( पंचमी विभक्ति ) दिसतांच टीकाकारांनीं त्या दोहोंत विशेषण-विशेष्य-भाव कल्पिला. याच कृत्रिम अर्थाला सर्वांनीं प्राधान्य दिलें आहे इतकेंच. वास्तविक त्या दोन शब्दांत कोणताच संबंध नाहीं (ले. १५६)

२६५ आपल्या विस्तीर्ण वाङमयपारायणांत समान शब्द आढळला असता तर–उक्तं च –असें म्हणून टीकाकारांनीं अनुवाद केला असता. पण तसा आधार आढळला नाहीं व आढळणें शक्य नाहीं म्हणून ' अगस्त्यचिन्ह = दक्षिण हा अर्थ त्यांनीं दिला व अयनात् = गमनात् असा अर्थ लाविला. परंतु पहिल्या अर्थाला साहित्य वाङमयांत आधार नाहीं, दुसऱ्याला खगोलीय आधार नाहीं. म्हणून ' दक्षिण ' हा अर्थ असिद्ध; कवीला अभिप्रेत नाहीं.

२६६ अयननिवृत्तीच्या घटनेंत दिशेचा प्रश्नच येत नाहीं. पहा ले. २०८. निवृत्ति-स्थान मात्र सांगावयाचें असतें. निवृत्ति व प्रवृत्ति या पारिभाषिक संकेतांत दिशा सिद्धच असते. पहा ले. १२८. कालिदासाला हे दोन्ही शब्द परिचित होते. पहा ले. १२९. मग दक्षिण दिशा कशाला ? कवि दिशेच्या भानगडींत पडलाच नाहीं. तरीही अलीकडील कांहीं नामांकित विद्वान्–अगस्त्यचिन्ह म्हणजे दक्षिण हा अर्थ कसा असे विचारतां– अयनात् म्हणजेच दक्षिणायनात् असें अगतिक उत्तर देतात.

कवि कालिदास-काल.

# भाग ५ वा.

प्रकरणें १७–१८ अखेर.

# तर्क व समाधान.

( ले. २६७-३१८)

# प्रकरण १७ वें :

## आकाशाकडे न पाहणाऱ्यांचे कांहीं शुष्क तर्क.

२६७ **तर्क पहिला.**

गाणितिक दृष्ट्या कालिदासाला अयन सांगावयाचें असतें, तर अगस्त्यचिन्हाऐवजीं त्यानें पुनर्वसूवर अयन सांगितलें असतें.

**समाधान**– शेजारच्या आकृतींत, R D रविकक्षा, A अगस्त्य, D मिथुनान्त, P व C हे पुनर्वसूचे पोलक्स व क्यास्टर दोन तारे. छोट्या वर्तुलांत D = 1, अगस्त्यचिन्ह, २ पोलक्सचिन्ह, ३ क्यास्टरचिन्ह आहे. या तीन चिन्हांपैकीं D = 1 अगस्त्यचिन्ह एकच मिथुनांतीं असून बाकी २, ३ हे दूर आहेत. म्हणून वेधप्रवीणांनीं निश्चित केलेल्या




आकृति ८.

अगस्त्यचिन्हांकित मिथुनान्तावरचीच निवृत्ति कालिदासानें दृष्टांतांत घेतली. कारण एवढा शास्त्रप्रवीण वराह, पण त्यालाहि ( बृ. सं. पृ. २१३ )–

**ज्योतिषमागमशास्त्रं विप्रतिपत्तौ न योग्यमस्माकम् ।**
**स्वयमेव विकल्पयितुं किं तु बहूनां मतं वक्ष्ये ॥**

इतर प्रवीणाचें सहाय्य इष्ट वाटतें. तर कालिदास बोलून चालून कवि; म्हणून त्यानें– अगस्त्यचिन्हात् निवृत्तिः– हे साहित्यांत कधींही न येणारे पारिभाषिक शब्द ज्योतिर्विदुक्तच दिलें आहेत. हें कैमुतिकन्यायानेंच सिद्ध आहे. शिवाय अगस्त्यचिन्ह पुनर्वसूविभागांत असून त्यांत निवृत्तीचा सूक्ष्म निर्देशही आहे. **दुसरें**– पुनर्वसूवर निवृत्ति सांगितली असती तर क्यास्टर कीं पोलक्स असा घोटाळा होऊन २१६ वर्षांचा फरक पडला असता व

कालनिर्णय अशक्य झाला असता. कालिदासानें केलें, तेंच अत्यंत उचित आहे. आक्षेपकाचा तर्क अप्रस्तुत आहे.

## २६८ तर्क दुसरा.

दिवसेदिवस गुप्तकालाला अनुकूल पुरावा उपलब्ध होत आहे. तो **केवळ विवाद्य** अशा ज्योतिषोल्लेखावरून त्याज्य मानितां येत नाहीं.

**समाधान–** गुप्तकालाला अनुकूल पुरावा मिळाला तर त्यांत आनंदच आहे. परंतु ज्योतिषपुरावा विवाद्य कसा ? खगोलीय निर्देश महा बलवत्तर-हें सर्वसंमत आहे. आमचे प्रतिपादन पाहण्याच्या अगोदरच 'विवाद्य' हा शेरा कां ?

१) तैत्तिरीय संहितेंतील 'मघार्ध निवृत्ति' या निर्देशांत विवाद्य काय आहे ? या स्पष्ट निर्देशावरून येणाऱ्या इ. स. पूर्व २३६० या कालांत विवाद्य काय आहे ?

२) मैत्र्युपनिषदांत व वेदांग ज्योतिषांत अनुक्रमें 'मघाद्य व आश्लेषार्ध' यांत विवाद्य काय ? या स्पष्ट स्पष्ट निर्देशावरून येणाऱ्या इ. स. पूर्व, १८०० व १४०० यांत विवाद्य काय आहे ?

३) तसेंच कालिदासकालाच्या अगस्त्यचिन्हांत व इ. स. २८० यांत विवाद्य काय आहे ? (मोठी आकृ. ले. २०८) तेथें सर्व दिसेल व विवाद्य कांहींच कांहीं नाहीं, याची खात्री पटेल.

**बहूनि संति शास्त्राणि विवादास्तेषु केवलम् ।**
**प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं चंद्रार्कौ यत्र साक्षिणौ ।।**

असा –"ज्योतिष-विवाद्य"– म्हणणाऱ्याला तडाखा आहे. आक्षेप विरघळतो.

## २६९ तर्क तिसरा– दूतकाव्यांत क्रमांक दोन कोणाचा ?

पवनदूताला दुसरा क्रमांक देण्यांत येतो. पण तत्पूर्वी 'रथांगदूत' काव्य होतें, असें दिसतें. पहा– कानडी संस्कृत कवि-चरित्र– एस्. एम्. श्रीनिवास अय्यंगार : भाग १ ला, इ. स. १९२८, पृ. ८९ वर–

२७० कुंभकोण-कामकोटीपीठावर- श्रीमूकशंकर हे बावीसावें यति इ. स. ३९७-४३६ पर्यंत ३९ वर्षें होते. त्यांच्या पदरीं- कोटिजित् नांवाचा शिष्य होता. त्याचें गुणसंपन्न काव्य आवडून यतीनीं त्याला कालिदास ही पदवी दिली. त्याचें ग्रंथ- १) ऋतु-संहार, २) शृंगारतिलक, ३) श्रुतबोध, ४) रथांगदूत, ५) कविकंठपाश, ६) पुष्पबाणविलास, ७) श्यामलादंडक, ८) घटस्तव, ९) सकलजननीं स्तव, १०) मातृकापुष्पमालास्तव, ११) नवरत्नमाला, १२) अंबाष्टक व स्तोत्रें. हा कवि शृंगाररसप्रधान आहे. श्री. अयंगारांनीं प्रत्येक काव्याचे नमुने देऊन शेवटीं - कालिदासकृतम् - असा त्याचा निर्देशही दिला आहे.

## रथांगदूतांतील उतारे.

**कश्चिद्युवा वनविहारमभीप्समानः ।**
**कान्तामुवाच कमनीयमनोरथार्थम् ।**
**रात्रिंदिवं प्रियवचोनुगतैकवृत्तिः ।**
**सा चान्वमन्यत तमात्ममनोनुकूलम् ॥**

**अनंतरं स प्रियया सनाथः । झटित्यरण्याभिमुखं प्रहृष्टः ।**
**निर्षेदिवान् कूबरिणो प्रतस्थे । प्राप्तश्च संकेतलतागृहान्तः ॥**

**सुतनु जहिहि शोकं जीविताधारभूते ।**
**न खलु वपुरलं ते सोढुमब्जप्रहारम् ।**
**अभिगृहमचिराच्च त्वयंतां स्रस्तकेशि ।**
**क्षणमपि विरहस्ते प्राङ न सोढः सखीभिः ॥**

२७१ श्री. नंदुर्गीकर-रघुवंश, प्रस्तावना पृ. ७०, पुरुषोत्तम-कृत त्रिकांडशेषांत कालिदास याचे - रघुकार, मेधारुद्र व कोटिजित् - असे तीन पर्याय आहेत. कोटिजित् हा पर्याय वरील यति-शिष्याचा आहे काय? त्याचें नांवही कोटिजित् हेंच आहे. वरील श्लोकांत अनुकरण सुस्पष्ट दिसतें.

**टीप १**– संशोधकांनीं याची चिकित्सा करावी. मीही करीत आहे.

विधान– कालिदास प्रथम कवि होता. ज्योतिषपटु नव्हता.

२७२ **समाधान**– मेघदूत २० श्लोकांत– वांति झाल्यावर लघुवारि प्याल्यानें वात-प्रकोप होत नाहीं– अशा निष्णात वैद्यतुल्य निर्देशांत कवीला वैद्यकीय तत्त्व सांगावयाचें आहे, असें निश्चित म्हणतां येत नाहीं किंवा वरील ग्रंथोक्त यथार्थ वैद्यकीय तत्त्व पाहूनही– वाचक हो ! हें वैद्यकीय तत्त्व सांगणारा कवि कालिदास आहे. वैद्य-कालिदास नव्हे. सावधा रहा ! असें विधान कोणीही करणार नाहीं. टीकाकारांनीं वाग्भटांतील उताऱ्यांनीं कालिदासोक्तींतील यथार्थता सिद्ध केलेली पाहून– कालिदासोक्त वैद्यकीय तत्त्वांत यथार्थतेची अपेक्षा करणें फोल आहे– असा निराधार उक्तिक्षेपही कोणी शहाणा करणार नाहीं. कारण श्लेष किंवा दृष्टांतरूपानें कोणतेंही शास्त्रोपपन्न तत्त्व किंवा घटना सांगण्याचा कवीलाच काय, पण कोणालाही पूर्ण अधिकार आहे. उदा.– एक वैद्य लिहितो– वातादिभिर्न बाधा स्यात् इंद्रियैरिव योगिनः ।– असा वेदांत-तत्त्वाचा उपयोग केला तर– तो वैद्य आहे, वेदांती नव्हे– त्या वैद्याच्या वेदांत-तत्त्वांत यथार्थतेची अपेक्षा फोल आहे– त्याला वेदांत-तत्त्वच सांगावयाचें आहे, असें निश्चित म्हणतां येणार नाहीं– असें म्हणण्यास कोणीही धजणार नाहीं. अयथार्थ उपमा विद्यासंपन्न वैद्य देईल कशाला ? असल्या बालिश आक्षेपांनीं वाचकांचा बुद्धिभेद न करणें बरें.

२७३

## एक गंभीर गैरसमजूत.

(अर्थात् आकाशाकडे न पाहणाराची)

१) " अयनाची गति फारच मंद आहे. म्हणून सूर्य एकाच अयनावर १००-१२५ वर्षें होता, " असें म्हणणें शक्य आहे.

२) अयनांतील फरक १००-१२५ वर्षांच्या अवधींत क्वचितच गोचर होईल.

समाधान- त्या त्या ऋतूंतील तीं तीं कर्मे झालींच पाहिजेत, म्हणून प्राचीन ऋषि फार जागरूक असत, ऋतू अयनावर व अयन सूर्यावर अवलंबून असल्यानें सूर्यावर सतत पाळत ठेवून प्राचीन ऋषि, अयनस्थानें फारच कसोशीनें काढीत. कारण यज्ञ सत्कालीं केले जाऊन ते फलप्रद झालेच

शाबरभाष्य.

पाहिजेत, हा कटाक्ष असे. पहा- १) **तस्मात् अर्थाविरुद्धकालेषु होतव्यमिति । २४ ।** २) **तस्मात् अन्येषु कालेषु अविहितत्वात् कृतमप्यकृतं भवति । २५ । ३) कालप्राधान्यं च भवति ।** (शाबरभाष्य अ. ६ पा. २ व अ. ६ पा. ५ ।। या शबरविधानावरून कालप्राधान्यांचा कटाक्ष सुप्रतीत होतो. **प्रतिवर्षाच्या संवत्सरेष्टीकरितां** १) अयन-स्थान, २) अयन-दिन व ३) अयन-काल काढण्यांत ते किती पटाईत होते, हें प्रा. सेनगुप्तांच्या मुखानेंच देतो म्हणजे उपर्युक्त आक्षेपकाच्या डोक्यांतील १००-१२५ वर्षांची भ्रांति उडून जाईल. प्रा. सेनगुप्ता लिहितात- (पृ. १५६)

२७४　१) Thus, from a rough observation, the Vedic Hindoos could find the real day of the Summer Solstice or Winter Solstice. (उदगयन-निवृत्ति किंवा प्रवृत्ति.)

२७५　२) It should thus be clear that the Vedic Hindoos knew how to determine the Summer or Winter Solstice day. (प्रा. का. पृ १५८.)

म्हणूनच खरा निवृत्तीचा दिवस काढण्यांत प्राचीन पटाईत होते- असें मी वर म्हटलें आहे. अनुभवाच्या युक्त्या, गणिताचे अडाखे, त्यांचेजवळ होते.

२७६　प्राचीन ऋषि इतके प्रवीण होते तर कालिदास-कालीं खगोलशास्त्राची वाढ होऊन ग्रहगणिताचे सिद्धांतही सिद्ध होते. अशा सुधारलेल्या वेध-परिस्थितींत- शंभर सव्वाशे वर्षे एकाच अयनावर सूर्य होता किंवा

अयनांतील फरक (कालिदासकालीं) खगोलप्रवीणांना क्वचितच गोचर होईल, असलीं विधानें हास्यापद आहेत, हें उघड आहे.

२७७ **एक प्रामादिक आक्षेप**- रघु. सर्ग १६, ४४ चेंच प्रमाण घेऊन प्रा. सेनगुप्तांनीं इ. स. ५४६ हें वर्ष काढलें आहे. तुमचें इ. स. २८० येतें-तर हें अंतर कां ? (एका उपाध्यायानें आम्हांला वरील प्रश्न केला.)

**उत्तर**- मी घेतलेलाच मूलाधार श्लोक प्रा. सेनगुप्तांनीं घेतला असता तर त्यांचा कालही इ. स. २८० हाच आला असता. गणितांत सदैव एकमुखीं उत्तर असतें. शिवाय-

२७८ मंदसोरच्या शिलालेखानें इ. स. ५४६ हें त्यांचें वर्ष उडून जातें. त्यांनीं रघु. ११, ३६ चा संदर्भ दिला आहे, पण त्यांत खगोल घटनेचा संपर्कही नाहीं. अश्वघोष बुद्धचरित्र ९, ११ व महाभा. कर्ण. अ. ४९, यांतील उपमेप्रमाणें रघु. ११, ३६ ची साधी सरळ उपमा आहे. शब्द व प्रयोग तत्समच आहेत. शिवाय त्यांनीं शाकुंतल अ. ७, २२ चाही आधार घेण्याचा यत्न केला आहे.

## एक सुभग आक्षेप : सुभग उत्तर.

**कर्कटकात् ...... मुनिरगस्यः** ।। पं सि. १४, ४०

(अगस्त्यतारा कर्कारंभी आहे. पहा ले. १७८)

२७९ मिथुनान्तीं किंवा कर्कारंभीं अगस्त्यस्थान- हा निर्देश वराह (इ.स. ५२०) कालचा नसून, पूर्वशास्त्रांतील वचनाचा वराहानें अनुवाद मात्र केला आहे. या आमच्या विधानावर एकानें चांगली शंका घेतली आहे.

२८० **एक शंका**- 'पंचसिद्धांतिकेंत अगस्त्याचें जें (कर्कटकाद्यात्) वर्णन दिलें आहे. तें वराहमिहिराच्या कालापूर्वीचें, त्याच्या कालाचें नव्हे- असें पंचसिद्धांतिकेवरून दिसत नाहीं.'

**समाधान**– पंचसिद्धांतिका अ. १४, श्लो. ३९, ४०, यांत प्राचीन सूर्यसिद्धांतांतील अगस्त्यस्थान व अगस्त्योदयास्ताच्या रीतीचा वराहानें केवळ अनुवाद मात्र केला आहे, हें आम्हीं पुनः सांगतों. कारण वराहकृत बृहत्संहितेंतील अगस्त्यचाराच्या (बृ. सं. पृ. २७९) टीकेंत पंचसिद्धांतिकेंतील नेमक्या (त्याच अध्या. १४, आर्या ३९, ४०) त्याच आर्या उद्धृत करून भट्टोत्पलानें–

**एवं पूर्वशास्त्रदृष्टत्वात् आचार्येण अत्र उक्तम् ।**

असा स्पष्ट निर्णय दिला आहे.

२८१ या भट्टोत्पलाच्या निर्णयावरून प्रस्तुत अगस्त्यचिन्हांकित कर्कारंभ-वराहकालीन नसून पूर्व-शास्त्रदृष्ट आहे, हें उघड आहे. यानें शंकानिरसन सहज होतें. तरी अधिक विवेचन देऊन ठेवितो.

२८२ वेदांगज्योतिषोक्त स्थिर आश्लेषार्धापासून सात चरणावरील या स्थिर कर्कारंभाचा उल्लेख पंचसिद्धांतिकेंत स्वतः वराहानेंच केला आहे. कालांतरानें हें सात चरणावरील अयन वराहकालीं ( इ. स. ५२० ) आठ चरणांवर आलें, (उक्ता भांशैः विकृतिः – ले. २१३) असें स्वतः वराहानेंच

पहा– पृ. ९७, अन्तिम चार ओळी.

आकृति ६. R—W = सात चरणें.

R—P = आठ चरणें.

अर्थात् W—P = एक चरण : कालिदास ते वराह.

सांगितलें आहे. शिवाय– कर्कटकमसंप्राप्य विनिवृत्तः । बृ. सं. ३ । म्हणजे पूर्वशास्त्रदृष्ट कर्कारंभाला स्पर्श न करतांच सूर्य निवृत्त झालेलाही वराहानें पाहिला होता. तरीही स्वकालीन अयन सांगतांना या आठ चरणावरील चलित बिंदूलाच– साम्प्रतमयनं सवितुः कर्कटकाद्यम्– पुनः वराहानें कर्कटारंभच म्हटलें आहे. आतां वराहकालीन हा चलित बिंदूवरील कर्कारंभ, पूर्व-

शास्त्रदृष्ट स्थिर कर्कारंभ कसा असूं शकेल ? पण याचें उत्तर सोपें आहे. नेमकी हीच आर्या उद्धृत करून शिरोमणिटीकेंत श्रीमुनीश्वर (शक १५५०) स्पष्ट सांगतात-- कर्कमकराद्यो: सायनत्वेन अभिमते—(पृ. २१५)- म्हणजे. वराहकृत हा दुसरा चलित कर्कारंभ-निर्देश अभिमत अशा सायन संकेतानें केलेला आहे. मकराचाही त्यानेंच केलेला निर्देश सायन-संकेताचाच आहे.

२८३ इ. स. ५२० मध्यें वराहानें, इ. स. ६२८ मध्यें ब्रह्मगुप्तानें, इ. स. ७४८ मध्यें लल्लाचार्यानें व इ. स. ८७८ मध्यें चतुर्वेदाचार्यानें– या सर्वांनीं सायन संकेताचेच कर्कारंभ मानलें व पुढें चालविलें. **खालील कोष्ठक पहा.**

| ज्योतिषी | वर्ष | कर्कारंभ | आश्लेषार्धापासून चरणें |
|---|---|---|---|
| आद्य सूर्य सि. | २८० | A | ७ |
| वराह | ५२० | B | ८ |
| ब्रम्हगुप्त | ६२८ | C | ८.५ |
| लल्ल | ७४८ | D | ९.० |
| चतुर्वेद | ८७८ | E | ९,५ |

२८४ सशास्त्र विभागात्मक स्थिर कर्कारंभ हा सदैव आश्लेषार्धापासून सात चरणावर असतो. या नियमाशीं वरील कोष्ठकांतील प्रथम पंक्ति मात्र जुळते. तो कर्कारंभ एकच सात चरणावर असून स्थिर आहे बाकीचे B, C, D, E हे त्या त्या काळचे कर्कारंभ स्थिर नसून चलितच होत. तर मग नंतरच्यांना कर्कारंभ कां म्हटलें ? याचें उत्तर मुनीश्वर (पृ. २२६) स्पष्ट देतात, तें असें–

**अयनांशाभावकाले तत्तद्राशौ तत्संभवात् तत्संज्ञाया:**

**समुचितत्वेन अयनांशसद्भावेऽपि तत्संज्ञोपचारात् ।।**

म्हणजे– पूर्वीं गणितागत स्थिर कर्कारंभीं जेव्हां अयन झालें, तेव्हां ही संज्ञा समुचित होती. परंतु अयन मागें हटल्यावरही कर्कारंभ ही संज्ञा वराह वगैरे

उपचारात् म्हणजे सायन संकेतानें देऊं लागले आजही शाळेंतील मुलांच्या भूगोलांत कर्कवृत्त व मकरवृत्त असेंच दिलें असतें, तो ही संकेतच होय.

## सारांश– ले २७९ तील विधान अबाधित.

२८५ पंचसिन्द्धातिकोक्त आद्यसूर्यसिद्धातांतील कर्कारंभ, वेदांगज्योतिषोक्त स्थिर आश्लेषार्धापासून सात चरणांवर आहे. पण वराहोक्त स्वकालीन कर्कारंभ आठ चरणांवर आहे. अर्थात् पहिला इ. स. २८० व दुसरा इ. स. ५२० वर्षांचा आहे. म्हणून **पंचसिद्धान्तिकोक्त कर्कारंभ हा वराहकालचा नसून प्राचीन कालचा आहे, हें सिद्ध.** (पहा लें. २१०, पृ. ९७)

## खगोलाशीं अपरिचय : नामधारी आक्षेप.
## अर्थात् प्रत्युत्तराला अनर्ह.
## तरीही बंधुभावनेनें प्रत्युत्तरें दिलीं आहेत.

वास्तविक पहातां साहित्यपटूंनीं काढलेले **खगोलीय आक्षेप** किंवा **खगोलीय तर्क** हीं दोन्ही **नामधारी** असल्यानें त्यांचीं उत्तरे देण्याची आवश्यकता नव्हती. तरीही आपल्या आक्षेपांचें **नामधारित्व** किंवा तर्कांतील **असमंजसत्व** व तज्जन्य धृष्ट खगोलीय निर्णयांतील अविचारितरमणीयत्व त्यांना परस्पर कळून अपरिचित शास्त्रांत अविवेकी ढवळाढवळ हास्यास्पदत्व मात्र निर्माण करितें, हें पटविण्याकरितां आम्हीं,

## अपरिचय हा त्यांचा दोष नव्हे–

या बंधुभावनेनें त्यांच्या विधानांना शास्त्रोक्त, सप्रमाण, साकृति उत्तरें दिलीं आहेत. आगामी आक्षेपकांना मार्गदर्शक होतील. कारण खगोल-परिचित साहित्यप्रवीण असले बनावट आक्षेप कधींच काढणार नाहीत, अशी कित्येक उदाहरणांवरून प्रतीति आली.

**सूचना–** साहित्यिक किंवा खगोलीय– कोणत्याही शंकेला पटेपर्यंत उत्तर देण्यास आम्हीं सिद्ध आहों, हें नम्रपणें सूचवून ठेवितो.

# प्रकरण १८ वें :

## कालिदास गुप्तकालीं नव्हता. ( विनाभिनिवेश ).

### अनेक विवाद्य स्थळें.

२८६ अ) क्षेमेंद्राच्या औ. वि. चर्चेंत आलेल्या कालिदासाच्या कुंतलेश्वर दौत्य या ग्रंथोक्त श्लोकांतील स्थान-वर्णनाचें औचित्य क्षेमेंद्राच्या मतें—

> " सम्राटाचा दूत मांडलिक राजाच्या सभेंत गेला असतां आपल्या प्रभूच्या पदवीला अनुरूप अशी मानाची जागा मिळाली नाही. तेव्हां तो कार्यवशात् भूमीवरच बसला व (इतर मानकऱ्यांनीं चेष्टा केली तेव्हां) धीरगंभीर स्वरानें म्हणतो— हें भूमितलच आम्हांला योग्य स्थान आहे. (धरणितलमिहैव स्थानमस्मद्विधानाम्) असें आहे.

ब) शृंगार-प्रकाशांत कालिदासाच्या तोंडीं—

**पिबति मधुसुगंधीन्याननानि प्रियाणाम् ।**
**त्वयि विनिहितभारः कुंतलानामधीशः ॥**

म्हणजे— तुझ्यावर भार टाकून कुंतलेश्वर प्रियांचीं मुखें चुंबीत आहे. असा रिपोर्ट कालिदासानें द्वितीय चंद्रगुप्ताला दिला आहे.

२८७ हा दूत कोण व कोणत्या सम्राटाचा हें वरील आधाराद्वयावरून समजतें, असें प्रा. मिराशी यांचें मत आहे. त्यांच्या मतें— कालिदास हाच दूत (वकील) म्हणून कुंतलेश्वर सामंताच्या दरबारीं गेला होता व परत उज्जैनीस गेल्यावर विक्रमादित्यानें— कुंतलेश काय करीत आहे ? असें विचारतांच, कालिदासानें वरील उत्तर दिलें. क) सरस्वतीकंठाभरणांत व काव्य-मीमांसेंत हा श्लोक आला आहे. राजशेखरानें—मयि विनिहितभारः— म्हणजे ' माझ्यावर भार टाकून कुंतलेश अनेक प्रियांचीं मुखें चुंबो—' असें विक्रमादित्याचें उत्तर दाखविलें आहे.

## या अनुमानांतील आभास व विवाद्यता.

२८८ कुंतलेश्वरदौत्य हें काव्य असूं शकेल. परंतु कालिदास या नाममात्रेंच तो रघुकार मानणें निराधार आहे. कारण श्री. भांडारकर(नंदुर्गीकर रघु. प्रस्तावना, पृ. १२६) म्हणतात—

> हस्तलिखितांतील श्लोकाचें मागचें नांव– इतर पुराव्याचें अभावीं– खरें समजून दूरगामी ऐतिहासिक निर्णय घेऊं नये वरतनु संप्रवदंति हा चरण आपल्या पोथीच्या आधारें मल्लिनाथ कुमारदासाच्या, तर रायमुकुट आपल्या पोथींतील आधारें भारवीच्या नांवावर देतो.

म्हणून प्रा. मिराशींचा हा नाममात्रजन्य निर्णय **विवाद्य आहे.**

२८९ **दुसरें उदाहरण–** काव्यमाला ४ गच्छ, पृ. १२९ वर– रक्तस्त्वं नवपल्लवै.... हा श्लोक हस्तलिखितानुसारें कालिदासाचा खरा यशोधर्माचा आहे. सारांश– लेखकांचे हस्तदोष विपुल सांपडतात म्हणून दुसरा पोषक पुरावा सांपडेपर्यंत कुंतलेश्वरदौत्य-कर्ता रघुकार— हा निर्णय **विवाद्य**.

२९० **आभास दुसरा–** द्वितीय चंद्रगुप्त-सम्राटाच्या दूताचा (कालिदासाचा) मांडलिक वाकाटक राजसभेंत, सम्राटकन्या प्रभावतीगुप्तेच्या डोळयांदेखत अपमान होणें केवळ अशक्य कोटींतील आहे-- आलेल्या सम्राट्दूताला अनुरूप स्थान नाहीं, उलट इतर मानकरी चेष्टा करतात– तो एक तर अडाणी असंस्कृत दरबार असला पाहिजे किंवा तत्कालीन वाकाटक नृपति बलिष्ठ अतएव त्याला वचकून मैत्रीच्या भिक्षेला आलेल्या दूताची चेष्टा करणें हें मात्र संभवतें म्हणून हा श्लोक द्वितीय चंद्रगुप्तकालीन नव्हे.

२९१ वाकाटक-नृपति बलशाली प्रवरसेन याच्या वेळीं **घटोत्कच**-गुप्तानें मैत्रीसाठीं दूत पाठविला असेल. या पराभूत दूताची हकीकत कालिदासानें

विडंबन-नाटक-रूपानें लिहिली असेल. कालिदास दौत्य करणारा नव्हता.

२९२ **आभास तिसरा**– इ. स. ४०० मध्यें द्वि० चंद्र० विक्रमादित्य झाला. त्याची कन्या प्रभावती गुप्ता द्वि० रुद्रसेनास दिली. त्याच वर्षी (इ.स.४००) तिला पुत्र झाला, असें समजूं द्वि०चंद्र० इ. स. ४१३ मध्यें वारला. या वेळीं द्वि० प्रवर० १३ वर्षांचा होता. समजा, कालिदास वकील म्हणून इ स.४१२ मध्यें तेथें गेला. या बारा वर्षांच्या बाल वयांत द्वि० प्रवरसेन सुगंधी मुखांचीं चुंबनें घेत असणें हें अशक्य आहे. अर्थात् हा रिपोर्ट (श्लोक) द्वितीय चंद्रगुप्त-कालचा मुळींच नव्हे.

२९३ **राजशेखराच्या** पाठाप्रमाणें– मयि विनिहितभारः– म्हणजे कुंतलेश्वर.द्वि० प्र० सेन माझा नातू माझ्यावर भार टाकून खुशाल अनेक प्रियाधर– चुंबन करो– असें म्हणण्याइतका निस्त्रप द्वि० चंद्रगुप्त होता काय ? विक्रमादित्य पदवीला हा कलंक आहे. अर्थात् तें काव्य या काळचें नव्हें व कालिदासही त्या काळीं मुळींच नव्हता.

२९४ **आभास चवथा**– मेघदूतारंभीं रामगिरि आहे, हें सत्य आहे. यात्रेच्या निमित्तानें राणी प्रभावतीगुप्ताही तेथें जात असेल. पण तिच्या बरोबरच कालिदास होता किंवा पाहिजे हा तर्क, किंवा त्याच वेळीं त्यानें रामगिरि पाहिला, हे दोन्ही तर्क निराधार आहेत. कारण यात्रेचें स्थान या नात्यानें रामगिरीची प्रसिद्धि पूर्वीही होती. गुप्तकालांतच तो तेथें गेला, हा आभास आहे.

२९५ **आभास पांचवा**– मैत्री टिकविणें जसें कठिण, तसेंच काव्य पूर्ण करणें कठिण जात आहे– इतकेंच सेतुबंधकाव्यांत प्रवरसेन सांगतो. मित्राच्या साहाय्यानें करीत आहे, असा मुळींच निर्देश नाहीं. तरी देखील एक साहाय्यक मित्र होता व तो कालिदासच होता– या विधानामध्यें दुहेरी आभास आहे.

२९६ **आभास सहावा**– या काव्यांत कांहीं ठिकाणीं आपण कालिदासाच्या कल्पना वाचीत आहों, असें वाटतें– असें मिराशी पृ. १२३ वर म्हणतात, त्यांतही तथ्य नाहीं. कारण कालिदासाच्या कृति पाहूनही कल्पनासाम्यें उत्तम जुळवितां येतात. प्रत्यक्ष कालिदासच त्याच्या दरबारीं होता, हा आभास आहे. नाहीं तर वाल्मीकि महर्षी कालिदासाच्या घरींच सहाय्यार्थ राहिले होते, असें म्हणण्याचा प्रसंग ओढवेल.

२९७ **आभास सातवा**– सेतुबंध मीं लिहिलें असे प्रवरसेन म्हणतो, तर तें काव्य विक्रमादित्याच्या आज्ञेनें कालिदासानें लिहिलें, असें टीकाकार लिहितो. म्हणून कालिदासाच्या सहाय्यानें सेतुबन्ध लिहिलें गेलें, हा प्रा. मिराशींचा मध्यममार्ग आभासात्मक आहे

२९८ **आभास आठवा**– गुप्तसाम्राज्याच्या प्रदीर्घ ( इ स. ३२०–६०० ) अवधींत एकही दरबारी उल्लेख किंवा कोरीव लेख नसतांना द्वि० चंद्र० कालीं त्याच्या आश्रयाला कालिदास होता, ही कल्पना फार मोठा आभास होय.

२९९ **आभास नववा**– भास कवींचे अभ्यासू श्री. पुसाळकर लिहितात–

> All the Shastras that Kalidas was acquainted with belong to the Pre-Gupta period. Beyond a few isolated inscriptions there is no literary composition that can be authoritatively ascribed to the Gupta period– the Angustan period of Sanskrit Literature. ( पहा ले. ३०७ )

प्रा. मिराशी यांच्या तुरळक निर्देशावरूनही वरील गोष्टच पटते. शिवाय संहितान्तर्गत अनेक शास्त्र-ग्रंथ खिस्तोत्तर इ. स. ३०० पर्यंत सिद्ध होऊन राहिले होते, ते आम्हीं ले. ३०७ यांत पुढें सप्रमाण दाखविलें आहे.

३०० **आभास दहावा**- उदयनाच्या दिग्विजयावरून रघु-दिग्विजय बनविल्याचें स्पष्ट दिसत आहे, असें प्रा. महा. पृ ३८०- केतकर लिहितात- या कालिदासोक्त दिग्विजयावरूनच हरिषेणानें समुद्र-गुप्त-दिग्विजय लिहिला हें- गृहीतप्रतिमुक्तस्य.. । या अनुवादावरून स्पष्ट आहे. याच्या उलट कल्पना विपरीत वाटते, आभास वाटतो.

३०१ **तत्वार्थ**- अभिनंद कवीच्या- ख्यातिं कामपि कालिदासकृतयः नीताः शकारातिना । या श्लोकांतील शकारि म्हणजे द्वि० चंद्र० मानला तरी त्यानें कृति- नांवलौकिकाला चढविल्या. कारण इ. स. ३०० ते ४०० पर्यंतच्या १०० वर्षांत कालिदासाचे ग्रंथ ख्यातिमार्गारूढ झाले होते. म्हणून कालिदास तिसऱ्या शतकांत होऊन गेला. त्यानंतर तो नव्हता. गुप्तकालाशीं त्याचा संबंध पोंचत नाहीं.

## ३०२ अपाणिनीय प्रयोग.

तसेंच प्रा. मिराशी यांनीं अश्वघोष, भास व कालिदास यांच्या काव्यांतील कांहीं अपाणिनीय प्रयोग दाखविले आहेत. आमच्या मतें अश्वघोषाच्या महयां च चक्रुः- वगैरे प्रयोगांतील लकबीच्या कौतुकानेंच जणों कालिदासानें- ही- प्रभ्रंशयां यो नहुश्चकार- असें ७-८ प्रयोग केले आहेत. यावरून कालिदास अश्वघोषाच्या चांगलाच जवळ होता.

३०३ अश्वघोष व कालिदास यांच्या काव्यांत डोळ्यांत भरण्याइतका परस्परानुप्रवेश झालेला आहे. त्यावरून परस्परसांनिध्य स्पष्ट होतें. तरी प्रा. मिराशी कालिदासाला अश्वघोषापासून ३०० वर्षें दूर लोटीत आहेत. आमच्या मतें, गुप्तकालांतील इतर कवीप्रमाणें कालिदासानें अपाणिनीय प्रयोग केलेही नसते व अनुप्रवेशही झाला नसता. म्हणून कालिदास अश्वघोषाच्या फार समीप होता. चन्द्रगुप्तापासून फार दूर मागे होता.

३०४ **हरिषेणाच्या**- आर्यो हीत्युपगुह्य भावपिशुनैरुत्कर्णितै रोमभिः ।

या श्लोकांत कालिदासाच्या सहज प्रासादिक शैलीची ऐट उमटली आहे. अर्थात् कालिदास हरिषेणाच्या पूर्वींचा आहे. ओज:समास भूयस्त्वं–वगैरेंचा उगम हरिषेणाच्या ‘ प्रशस्तींत ’ दिसतो. कालिदासांत हा गोंधळ नाहीं.

**प्रा. मिराशी यांची आणखी एक विचित्र कल्पना–**

३०५ इ. स. ४५७ च्या गिरनार शिलालेखांत दोन अपाणिनीय प्रयोग आहेत, यावरून ते प्रयोग त्या काली शिष्टसंमत होते, असें ते समजतात. पण तें चूक आहे. अपाणिनीय प्रयोग शिष्टसंमत कधींच नसतात. उलट मम्मटाच्या मताप्रमाणें– **स्थितेषु प्रयोगेषु समर्थनम् ।** करायचें इतकेंच. दुसरें असें कीं, इ. स. ४५७ च्या आसपासच कालिदास देखील असलाच पाहिजे, हा तर्क कोठला ? तर मग अश्वघोष व आर्यशूरांनी काय पाप केलें आहे ? अश्वघोष, भास व कालिदास हे तीघेही इ. स. ४५७ च्या आसपास कां मानूं नयेत ? इ. स. ३५० च्या सुमाराच्या हरिषेण आणि कौमुदीमहोत्सवांत देखील अपाणिनीय प्रयोग नाहींत. अर्थात्च ते शिष्ट-संमत नव्हते. या अपाणिनीय प्रयोगांचा काल गुप्तकालाच्या फार पूर्वीं होता. गुप्तकालांत ले. २५– थ वर्गांतील काव्यगुण वाढीस लागले होते. त्यांचीं उगवती किरणें हरिषेणाच्या लेखनांत दिसतात.

## ३०६ शास्त्रांच्या ऊर्जितावस्थाविषयक गैरसमज.

## वराहाची कामगिरी.

वराहमिहिरानें ( इ. स. ५०५–५८७ ) एक प्रशंसनीय कामगिरी केली, ती अशी कीं– अतिविस्तृतत्वामुळें व प्राचीनत्वामुळें नाशोन्मुख अशा प्राचीन ऋषिप्रणीत संहितांतर्गत सर्व शास्त्रांचें संक्षिप्तीकरण करून त्यानें बृहत्संहिता नांवाचा उत्कृष्ट ग्रंथ रचिला. त्या ग्रंथावर भट्टोत्पलानें एक प्रचंड टीका लिहिली. या संहितेंत प्राचीन मुनिलेखक व नृ-लेखक या दोहोंचा अन्तर्भाव आहे.

## ३०७ इ. स. ३०० पर्यंतचे व पूर्वीचे लेखक.

गर्ग, पराशर, वृद्धगर्ग, वसिष्ठ, काश्यप, देवलऋषि, बृहस्पति, यम, शालिहोत्र, भारद्वाज, विश्वकर्मा, हस्तिवैद्यककार वीरसोम, खगोलीय ग्रंथ, वास्तुविद्या, किरणावलितंत्र, समुद्र, नंदी, सारस्वत, ऋषिपुत्र, कामंदकी, वात्सायनसदृशसूत्रें, मनुस्मृति, अश्वलक्षणकार वररुचि, ललितकलावान् मांडव्य-- वगैरे मुनिलेखक व नृ-लेखक यांचे संहितान्तर्गत ( प्रा. मिराशी यांनीं निर्दिष्ट केलेल्या ) स्थापत्य, शिल्पकला, चित्रकला व त्याशिवाय गंधयुक्ति, वास्तुप्रकरण, दकार्गल वगैरे अखिल विषययुक्त शास्त्रांचा संक्षेप संहितेंत आला आहे. आपल्या गुणगंभीर टीकेंत भट्टोत्पलानें पुष्कळशा प्राचीन कर्त्यांचीं नांवें व भरपूर अवतरणें दिलीं आहेत. हीं सर्व शास्त्रें पूर्णावस्थेला पोंचून त्यांचा अधिकारही चालू होता. या ग्रंथांच्या विस्तारामुळें परंपरेनें ( मुनिभिः पारंपर्येण संक्षिप्तीकृतम्- पृ. ४, बृ. सं. ) वृद्धगर्ग गर्ग, वृद्धवसिष्ठ, वसिष्ठ असे कांहीं मुनि त्यांचें संक्षिप्तीकरणही करीत होते. सारांश- इ. स. ३०० या कालींच त्यांची ऊर्जितावस्था होती.

### " तस्योच्छित्तिभयात् " भट्टोत्पल.

३०८ शास्त्रांचें प्राचीनत्व, उच्छेदसंभव व वराहाची संक्षेपचिकीर्षा या सूचक शब्दांवरून व गणितवैषम्य गोचर झाल्यावर दृक्सम ग्रंथांची निर्मिति होण्यास लागणाऱ्या कालावरून पहातां उपर्युक्त प्राचीन ग्रंथ-कर्त्यांचीं शास्त्रें इ.स.३००पासून मागें पडूं लागलीं कारण त्यानंतर क्रमानें नवीन(अर्वाचीन) संक्षिप्त ग्रंथांचा प्रभाव पडूं लागला. (ले. ३०७)

या आमच्या निर्णयाला पोषक असा बलिष्ठ आधार आहे, तो असा.

### पंचसिद्धांतिकोक्त मघानक्षत्र.

३०९ पं. सि. अध्या. १४- **पित्र्यस्य स्वक्षेत्रे षष्ठे चांशे समायोगः ।** म्हणजे मघानक्षत्र-विभागांत ६ व्या अंशावर चंद्राचा मघेशीं समागम होतो.

३१० ले. २२४ यांत दाखविल्याप्रमाणें प्रा. सेनगुप्तांनाही या मघास्थानाचें महत्त्व पटलेलें आहे. आतां ग्रहलाघवकारानें शक ४४४ या वर्षीची स्व-विभागांत ९ अंशावर मघा दिली आहे. या तीन अंशांच्या अंतराला २१६ वर्षे लागतात. म्हणून—

शक ४४४ – २१६ = २२८ + ७८ = इ. स. ३०६.

म्हणजे **इ. स. ३०० पर्यंत या स्पष्टतर सूर्यसिद्धांताचा अंमल होता.**

३११ ले. ४१(५) यांत सांगितल्याप्रमाणें हा प्राचीन सूर्यसिद्धांत देखील वराह कालीं(इ. स. ५२०) प्राचीनच झाला होता. म्हणूनच वराहानें पंचसिद्धांतिकेंत त्याचा संक्षेप केला आहे.

३१२ यावरून वराहानें **संक्षिप्त केलेले ग्रंथ इ. स. ३०० किंवा तत्पूर्वीचे होत— असें निश्चित म्हणतां येतें.** सारांश— पं. सिद्धांतिका व बृहत्संहिता यांत साररूपानें संक्षेपिलेले खगोलशास्त्रासह सर्व शास्त्रग्रंथ इ. स. ३०० नंतर वराहकालापर्यंतच्या २२५ वर्षांच्या अवधींत— प्राचीन अतएव संक्षेप-योग्य— झालें, हें सहज पटण्यासारखें आहे. अर्थात् पं. सि. सूर्यसिद्धांताचा आधार घेणारा (ले. ११९-१२३) कालिदास— वराहापूर्वी २२५ वर्षां-पूर्वीच्या पूर्वशास्त्रयुगांत होऊन गेला, हें स्पष्ट आहे. हीं शास्त्रें गुप्तकालांत मुळींच खेंचतां येत नाहींत. तो फार मोठा प्रमाद होईल.

३१३ प्रा. मिराशी, जॉन बेंटलीप्रमाणें या पूर्वशास्त्रांना द्वि० चंद्रगुप्त-कालांत खेंचतात. पण तो अव्यापार आहे. कारण द्वि० चंद्रगुप्त व वराह या दोहोंत अंतर केवळ १००, १२५वर्षांचेंच आहे. वरील पूर्वशास्त्रें द्वि० चंद्रगुप्त-कालांत खेंचली तर पुढील १००, १२५ वर्षांच्या अल्प कालावधींत त्यांची उच्छेदावस्था येणें शक्य नाहीं. उलट त्यांना क्रमानें प्रचारांत येण्यासच १००, १२५ वर्षें लागणार, म्हणून द्वि० चंद्रगुप्तापूर्वी १००, १२५ वर्षें हीं शास्त्रें अधिकृत विलास करीत होतीं- हें सहज पटण्यासारखें आहे. या दृष्टीनें वर

ले. २९९ यांतील श्री. पुसाळकरांचा निर्देश अत्यन्त उचित आहे. अर्थात् हीं पूर्वशास्त्रें गुप्तकालांत (इ. स. ४०० ) मुळींच खेंचतां येत नाहींत.

## प्रासादिक वाङ्मय.

३१४ कालिदासाच्या ज्या ज्या कृतींत अनेक शास्त्रांचा संदर्भ आला आहे, तीं तीं सर्व शास्त्रें इ. स.३०० च्या आंतबाहेर सिद्ध होतीं, हें वर दाखविलें. आतां त्या शास्त्रांतील श्री. भट्टोत्पलानें दिलेले उतारे वाचले तर त्या सर्व ललितेतर ग्रंथांची देखील भाषा, कल्पना व शैली पूर्ण व्यक्त होऊन–

**जें कलां कौतुकां जन्मस्थान ।**
**कीं अभिनव उद्यान । विवेकतरूचें ।।** ज्ञानेश्वर.

अशी खात्री पटतें, इतकेंच नव्हे तर–

**ना तरी उद्यानीं माधवी घडे ।**
**तें वनशोभेची खाणी उघडे ।।** ज्ञानेश्वर.

इतका ज्ञान-प्रेमी त्यांत रमून जातो कालिदास त्यांत नितांत रमला तर काय नवल ! त्यायोगें हरिषेणाला अनायासें कालिदासाचें मार्गदर्शन लाभलें.

कालिदास– पृ. ९१ वरील प्रा. मिराशींची हरिषेणानंतर कालिदास–कल्पना अत्यंत विपर्यस्त आहे, हें आतां भट्टोत्पलाच्या प्राचीन उताऱ्यांवरूनच स्पष्ट होतें.

३१५ अश्वलक्षणकार वररुचीचे लक्षण-ग्रंथांतील श्लोक किंवा मांडव्याचे श्लोक, सारस्वत व समुद्राचार्यांचे सहजशैलीचे श्लोक वाचले तर– कालिदासाच्या नजरेसमोरील ललित व ललितेतर वराहसंक्षिप्त पूर्वशास्त्रीय ग्रंथांतील रम्य लालित्यापुढें **हरिषेणाच्या रचनेची बाल-काव्यांतच गणना** होईल.

३१६ **पूर्व शास्त्रांचे सहाय्य**– भाषा सौष्ठव, भाषा संपत्ति पाहतां कालि-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 23024 दि: 1/2/91
क्रमांक 9972 इतर अग्राह्य नोंद दि. 29/3/82



दासानें या ' पूर्वशास्त्रांचें ' साहाय्य घेतल्यामुळेंच त्याच्या कृतींत उपमा रूपकें, दृष्टांत या रूपानें इतर कोणाच्याही काव्यांत दृष्टीस न पडणारें असें अनेक शास्त्र परिचयाचें पूर्ण प्रतिबिंब पडलेलें आहे. अश्वघोष-भास यांचीही मुद्रा स्पष्ट दिसतें, हें मागें दाखविलेंच आहे.

## सारांश.

३१७ आदर्शभूत अशा या पूर्वशास्त्रग्रंथांचा भर जोरांत असतांनाच महाकवि कालिदासाचा उदय व उत्कर्ष झाला. इ. स. ३०० नंतर हा भर ओसरूं लागला, हें वर ३१२ यांत दाखविलें आहे. म्हणून इ. स. ३०० नंतर कालिदास नव्हता. गुप्तकालांत कालिदासाच्या कृति होत्या. कालिदास नव्हता, हें अभिनंदकवीच्या उक्तीवरूनच निर्णीत होतें.

३१८-अ

## इतर मतें–

### १ उदयन कथा.

रामकथा-कोविद ग्रामवृद्ध परंपरेनें आजही अयोध्येंत व इतरत्र आहेत. तसेंच उदयन-कथा-कोविद ग्रामवृद्ध कालिदासकालीं होते. म्हणून उदयनाच्या कालींच कालिदास होता, या विधानांत तथ्य नाहीं. उदयनाच्या गुणशालित्वाचा पूर्ण पगडा त्या कालींही होता, हें स्पष्ट समजतें इतकेंच.

### २ मालविकाग्निमित्र.

अग्निमित्राच्या दरबारीं असतांना हें नाटक कवीनें रंगभूमीवर आणलें असतें तर (कुबेरानें यक्षाला दिल्याप्रमाणें) अग्निमित्रानें कालिदासाला शंभर वर्षांचा शाप दिला असता.

### पृ. ३८७. प्राचीन महाराष्ट्रांतील अभिप्राय.

" तथापि हेंच नाटक जर काल्पनिक किंवा प्रचलित समाजाचें दर्शक म्हणून दाखविलें असतें, तर तें राजदरबारास खूष करूं पहाणाऱ्या कवीस धोक्याचें होतें. "

शुंग घराण्यांतील शेवटचा राजा देवभूमि याला वासुदेव या त्याच्या मंत्र्यानें इ. स. पूर्व ७३ वर्षी ठार मारून आपण राज्य बळकाविलें. ही घटना माळव-गणनां पूर्व १६ या वर्षी येतें. पुढें २५-३० वर्षांत मालव-गणनोत्तर १२ या वर्षी शुंग घराणें नामशेष झालें. प्रदीर्घ काळ ३०० वर्षे लोटल्यानंतर वर प्राचीन महाराष्ट्रांत उल्लेखिलेला धोका पूर्ण नष्ट झाल्यावर स्वकालीन समाजाला खूष करण्याकरितां मालवगण स्थितीच्या ३१२ या वर्षी (पृ. ३९, ले. ७६ यांत निर्देशिल्याप्रमाणें) हें नाटक कालिदासानें लिहिलें असण्याचा उत्कृष्ट संभव आहे. मालविकाग्निमित्र या नांवांत ३१२ ही मालवगणाची स्थिति येते, म्हणून आम्हीं ३१२ म्हणतो.

## ३ विदिशा राजधानी.

कालिदासानें विदिशा राजधानीचा निर्देश केला आहे. त्यावरून इ. स. पूर्व १२० येतो, असें कांहीं पंडित प्रतिपादितात. परंतु कालिदासानें प्रत्यक्ष पाहिलेल्या, नागपूर या पांड्य राजधानीचाहीं उल्लेख केला आहे. पहा ले. ३५. पहिल्या खिस्तपूर्व पहिल्या शतकांत मदुरा ही पांड्य राजधानी होती. अर्थात् कालिदास त्या कालीं नव्हता. शिवाय– " मेघा, विदिशा राजधानींत गेल्याबरोबर तुला " पररति स्वादाचा लाभ होईल " – हें वर्णनही श्लाघनीय नाहीं. म्हणून– तें त्या कालानंतर केलेलें वर्णन– असें म्हणणेंच अधिक शोभेल.

११८ब संदर्भं कवि-कालिदास-कथितं भानोर्निवृत्यात्मकम् ।
चिन्हैः शास्त्रसमुत्थितैः समुचितैरंकैः समर्थैस्तथा ॥
उद्घाटय प्रकटार्थ-संगत-बलात् निःसंशयं निश्चितम् ।
यत्खिस्तात्परतस्तृतीय-शतकेऽभूत् कालिदासः कविः ॥

जय हिन्द !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९४५३
REFBK-0009453